महिलांचे हक्क व कल्याण समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

सिंधुदूर्ग, जिल्हापरिषदेच्या/मालवण, नगरपरिषदेच्या तसेच कोल्हापूर, जिल्हापरिषदेच्या/कोल्हापूर, महानगरपालिकेच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती आणि सिंधुदूर्ग, जिल्हापरिषदेतर्फे/मालवण, नगरपरिषदेतर्फे तसेच कोल्हापूर, जिल्हापरिषदेतर्फे/कोल्हापूर, महानगरपालिकेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा

तिसरा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१५

महिलांचे हक्क व कल्याण समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

सिंधुदूर्ग, जिल्हापरिषदेच्या/मालवण, नगरपरिषदेच्या तसेच कोल्हापूर, जिल्हापरिषदेच्या/कोल्हापूर, महानगरपालिकेच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती आणि सिंधुदूर्ग, जिल्हापरिषदेतर्फे/मालवण, नगरपरिषदेतर्फे तसेच कोल्हापूर, जिल्हापरिषदेतर्फे/कोल्हापूर, महानगरपालिकेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा

तिसरा अहवाल

महिलांचे हक्क व कल्याण समिती
सन २०१५-२०१६

समिती प्रमुख

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

समिती सदस्य

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(६) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.

(७) श्री. प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश घोलप, वि.स.स.

(९) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स.

(१०) श्रीमती संध्यादेवी कुपेकर, वि.स.स.

(११) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(१२) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(१३) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(१४) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

(१५) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री. विलास आठवले, उप सचिव,
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
श्रीमती मा. म. सुर्वे, कक्ष अधिकारी.

महिलांचे हक्क व कल्याण समिती
सन २०१३-२०१४

समिती प्रमुख

(१) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

समिती सदस्य

(२) श्रीमती नंदिनी देशमुख-पारवेकर, वि.स.स.

(३) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.

(४) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.

(५) श्रीमती शामल बागल, वि.स.स.

(६) श्री. गिल्बर्ट मेंडोसा, वि.स.स.

(७) श्रीमती संध्यादेवी देसाई ऊर्फ कुपेकर, वि.स.स.

(८) श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, वि.स.स.

(९) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(१०) श्रीमती मिरा रेंगे-पाटील, वि.स.स.

(११) डॉ.संजय रायमुलकर, वि.स.स.

(१२) ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(१३) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

(१४) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(१५) डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री. विलास आठवले, उप सचिव,
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

अनुक्रमणिका

अ.क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
(१)	प्रस्तावना	सात
(२)	अहवाल	१
	(प्रकरण १)	
(३)	सिंधुदुर्ग, जिल्हापरिषदेकडून प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेली माहिती.	२
	(प्रकरण २)	
(४)	मालवण, नगरपरिषदेकडून प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेली माहिती.	२७
	(प्रकरण ३)	
(५)	कोल्हापूर, जिल्हापरिषदेकडून प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेली माहिती.	३६
	(प्रकरण ४)	
(६)	कोल्हापूर, महानगरपालिकेकडून प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेली माहिती.	५६
(७)	परिशिष्ट-“अ” - शासन निर्णय	७५
(८)	परिशिष्ट-“ब” - बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त	१११

प्रस्तावना

मी महिलांचे हक्क व कल्याण समितीची समिती प्रमुख, समितीने आपल्या वतीने अधिकार दिल्यावरुन समितीचा हा तिसरा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

"सिंधुदुर्ग जिल्हापरिषद व मालवण नगरपरिषद तसेच कोल्हापूर जिल्हापरिषद व कोल्हापूर, महानगरपालिका यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती आणि जिल्हापरिषदेतर्फे/नगरपरिषदेतर्फे तसेच महानगरपालिकेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना" यासंबंधी समितीने माहिती जाणून घेण्याचे ठरविले. तसेच त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्हापरिषद व मालवण नगरपरिषद तसेच कोल्हापूर जिल्हापरिषद व कोल्हापूर महानगरपालिका यांच्या संदर्भातील माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी सिंधुदुर्ग जिल्हापरिषद आणि दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ रोजी मालवण नगरपरिषद येथे भेट दिली तसेच दिनांक ९ जानेवारी, २०१४ रोजी कोल्हापूर जिल्हापरिषद आणि दिनांक १० जानेवारी, २०१४ रोजी कोल्हापूर महानगरपालिका येथे भेट दिली.

जिल्हापरिषदेकडून, महानगरपालिकेकडून व नगरपरिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, नगरविकास विभाग (१) व (२), सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग व सचिव, सामाजिक न्याय विभाग यांची अनुक्रमे दिनांक २३ जून, २०१५ व दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उपलब्ध झालेल्या माहितीचा सर्वंकष विचार करुन समितीने त्या संदर्भात आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

प्रश्नावलीनुसार सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेकडून व मालवण नगरपरिषदेकडून तसेच कोल्हापूर जिल्हापरिषदेकडून व कोल्हापूर महानगरपालिकेकडून प्राप्त झालेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने प्राप्त झालेली माहिती तसेच परिशिष्ट "अ" मध्ये शासन निर्णय, परिशिष्ट "ब" मध्ये समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त दिलेले आहे.

समितीच्या दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार करुन तो संमत करण्यात आला.

साक्षीच्या वेळी सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, नगरविकास विभाग (१) व (२), सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग व सचिव, सामाजिक न्याय विभाग तसेच सिंधुदुर्ग जिल्हापरिषदेच्या व मालवण नगरपरिषदेच्या तसेच कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या व कोल्हापूर महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहाय्य केल्याबाबत समिती त्यांची आभारी आहे.

विधान भवन,
नागपूर,
दिनांक : १४ डिसेंबर, २०१५.

श्रीमती मनिषा चौधरी,
समिती प्रमुख,
महिलांचे हक्क व कल्याण समिती.

अहवाल

"सिंधुदुर्ग जिल्हा परिषद व मालवण नगरपरिषद" तसेच

" कोल्हापूर जिल्हा परिषद व कोल्हापूर महानगरपालिका "

महिलांचे हक्क व कल्याण समितीने " **सिंधुदुर्ग जिल्हापरिषद व मालवण, नगर परिषद तसेच " कोल्हापूर जिल्हा परिषद व कोल्हापूर, महानगरपालिका यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच जिल्हा परिषदेतर्फे/ नगर परिषदेतर्फे/ महानगरपालिकेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना** " यासंबंधी माहिती जाणून घेण्याचे ठरविले. सिंधुदुर्ग, जिल्हापरिषद व मालवण, नगर परिषद तसेच कोल्हापूर, जिल्हा परिषद व कोल्हापूर, महानगरपालिका येथे भेट देण्याचे ठरविले. त्यानुसार सिंधुदुर्ग, जिल्हा परिषद व मालवण, नगर परिषद तसेच कोल्हापूर, जिल्हा परिषद व कोल्हापूर, महानगरपालिका यांच्या संदर्भातील प्रश्नावलीच्या अनुषंगाने माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने अनुक्रमे दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी सिंधुदुर्ग, जिल्हा परिषद आणि दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ रोजी मालवण, नगर परिषद येथे भेट दिली. तसेच दिनांक ९ जानेवारी, २०१४ रोजी कोल्हापूर, जिल्हा परिषद आणि दिनांक १० जानेवारी, २०१४ रोजी कोल्हापूर, महानगरपालिका येथे भेट दिली. सिंधुदुर्ग, जिल्हा परिषद व मालवण, नगर परिषद तसेच कोल्हापूर, जिल्हा परिषद व कोल्हापूर, महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग, जिल्हा परिषद व मुख्याधिकारी, मालवण, नगर परिषद तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर, जिल्हा परिषद व आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी उपस्थित राहून समितीस माहिती दिली.

प्रकरण १

सिंधुदूर्ग, जिल्हा परिषद

१.१ सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेतील रिक्त पदे भरण्याबाबत.

सिंधुदुर्ग जिल्हापरिषदे संदर्भातील प्रश्नावलीच्या अनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेतील महिलांकरिता राखिव असलेल्या रिक्त पदे भरण्याबाबतचे निकष, भर्तीची पद्धत, महिलाचे ३०% आरक्षण भरण्याबाबत कार्यपद्धती याबाबत खालील प्रमाणे माहिती मागविण्यात आली होती.

(१) शासकीय, निम शासकीय व शासन अनुदानित सेवांमधील भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या सेवांमधील भरती करताना करण्यात येते काय ? असल्यास, त्याबाबतचे निकष, भरतीची पध्दत, इत्यादीबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

(२) महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपध्दती अवलंबली जाते ?

(३) जिल्हा परिषदेतील विविध पदांवर महिला उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत जिल्हा परिषदेने सेवा प्रवेश नियम तयार केले आहेत काय ?

(४) जिल्हा परिषदेकडे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची प्रत्येकी किती पदे मंजूर आहेत ? त्यापैकी महिला शिक्षकांची संख्या किती आहे ? शिक्षकांची पदे भरतांना महिलांसाठी ३०% जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत काय ? नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ? बढती देत असतांना महिलांचा आरक्षित कोटा ठेवण्यात येतो काय ? तशा प्रकारचा सेवा शर्ती आणि नियमावलीमध्ये बदल करण्यात आला आहे काय ?

उपरोक्त प्रकरणी सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :---

(१) महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक संकिर्ण १०९३/प्र.क्र.३६६/का-२, दिनांक २२-६-१९९४ तसेच दिनांक २७-५-१९९७ च्या शासन निर्णयानुसार भरतीसाठी

३०% जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर ३०% जागा आरक्षित ठेवण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. दिनांक १-८-१९९७ च्या शासन निर्णयानुसार महिलासाठी आरक्षण देण्याची कार्यवाही केली जाते. त्यानुसार दरवर्षी भरती प्रकीया राबवितांना भरती करीता निर्धारित केलेल्या पदांच्या अनुषंगाने सामाजिक आरक्षणानुसार महिलाकरिता ३०% जागा राखीव ठेवण्यात येतात.

(२) वर्ग-३ व वर्ग-४ मधील सर्व पदे महिलांसाठी राखीव असून सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक १९-१०-२००७ व २७-०६-२००८ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ती भरण्याची कार्यवाही केली जाते.

(३) याबाबत जिल्हा परिषदेने स्वतंत्र सेवा नियम तयार केलेले नाहीत. शासनाकडून निर्गमित सेवाप्रवेश नियम, १९६७ नुसार व वेळोवेळी सुधारित शासन निर्णयानुसार अंमलबजावणी केली जाते.

(४) शिक्षण विभाग (प्राथमिक शिक्षण), जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग कार्यालयाकडे माहे, जानेवारी, २०१४ अखेर शिक्षकांची एकूण ४५६९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी महिला शिक्षकांची संख्या १९४४ आहे. बढती देताना महिलांचा आरक्षित कोटा ठेवण्याबाबत शासन आदेश नाहीत.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :---

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेत एकूण ६८५४ पदे मंजूर आहेत. सन २००९-२०१० अखेरपर्यंत एकूण भरलेल्या पदांची संख्या ६२८८ इतकी आहे. रकाना ४ पैकी महिला कर्मचाऱ्यांची संख्या २५६० इतकी आहे. म्हणजे हे प्रमाण ४०.७१% असे आहे. वर्ग-१ मध्ये ४२ पदे मंजूर आहेत. यापैकी २६ पदे भरलेली आहेत. यामध्ये एकही महिला अधिकारी नाही. वर्ग-२ मध्ये १८४ पदे मंजूर आहेत. यापैकी १४८ पदे भरलेली आहेत. तर यामध्ये १४ महिला अधिकारी कार्यरत आहेत. वर्ग-३ मध्ये ५०१ पदे मंजूर आहेत. यामध्ये ४९२ पदे भरलेली आहेत. तर महिला कर्मचाऱ्यांची संख्या १२१ इतकी आहे. वर्ग-४ मध्ये ४३१ पदे मंजूर आहेत.

यामध्ये ३९१ पदे भरलेली आहेत. तर महिला कर्मचाऱ्यांची संख्या ६७ इतकी आहे. तसेच कक्ष अधिकाऱ्याची १७ पदे मंजूर आहेत. यामध्ये ५ महिला अधिकाऱ्यांची संख्या आहे. अधीक्षकाची एकूण ३१ पदे असून ७ महिला कार्यरत आहेत. वरिष्ठ सहाय्यक लिपिकाची १०१ पदे मंजूर असून त्यापैकी ३६ महिला कार्यरत आहे. कनिष्ठ सहाय्यक लिपिकामध्ये ६९ महिला कार्यरत आहेत. परिचरमध्ये ६२ महिला कार्यरत आहे. हे प्रमाण ४०.७१% असे आहे. पण काही कॅडरमध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. बांधकाम विभागात १३२ पदे मंजूर आहेत. यापैकी सन २००९-२०१० अखेरपर्यंत १०३ पदे भरलेली आहेत. यामध्ये फक्त एकाच महिला कर्मचाऱ्याचे पद भरलेले आहे. अशी माहिती समितीस दिली.

त्यावर तत्कालीन मुख्य अधिकारी यांनी याबाबत अधिक खुलासा करताना, यामध्ये संवर्ग वेगवेगळे आहेत. उदा. सामान्य प्रशासन विभागात कनिष्ठ लिपिकाचा संवर्ग आहे. नव्याने भरती करीत असताना महिला कर्मचाऱ्यांची पदे शासन निर्णयानुसार भरली जातात. पण काही पदे आरक्षण लागू होण्यापूर्वी भरलेली असल्यामुळे अनेक ठिकाणी पुरुष कर्मचाऱ्यांची पदे जास्त भरल्याचे दिसून येत आहे. नवीन भरती करताना महिला कर्मचाऱ्यांचे आरक्षण मेंटेन केले जाणार आहे. भरती प्रक्रिया सुरु आहे. जिल्हा परिषदेत दरवर्षी एकदाच भरती केली जाते. बांधकाम विभागात एकत्रित भरती करण्यात आली होती. यामध्ये संवर्ग कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक असा असतो. वर्ग-३ आणि वर्ग-४ ची भरती जिल्हा परिषदेमार्फत केली जाते. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सदर भरती प्रक्रिया पार पाडली जाते. समांतर आरक्षणानुसार पदे भरण्याची कार्यवाही केली जाणार आहे. उदा. एकूण १०० पदे असतील तर यामध्ये आरक्षणानुसार ३० पदे महिलांची भरली जाणार आहेत. अशी माहिती समितीस दिली.

वर्ग-३ मध्ये तांत्रिकची १४३ पदे आणि अतांत्रिकची ३०४ पदे रिक्त आहेत. वर्ग-१ मध्ये अतांत्रिकची ४१ पदे रिक्त आहेत. विभाग निहाय पदांचे संवर्ग आहेत. अधीक्षक, कक्ष अधिकारी, वरिष्ठ सहायक, सहायक लेखाधिकारी, स्थानिक लेखाधिकारी असे काही पदोन्नतीचे संवर्ग आहेत. वित्त विभागात एकूण १०५ पदे मंजूर आहेत.

त्यापैकी ९५ पदे भरलेली आहेत. ९५ पदांपैकी ४५ पदे सरळसेवेची आहेत. जिल्हा परिषद सरळसेवेच्या ४५ पदांच्या ३०% पदे महिलांसाठी आरक्षित ठेऊ शकते. असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. तसेच, सन २०१०-२०११ मध्ये रोटेशननुसार सर्व वर्तमानपत्रात जाहीरात दिली होती. त्यामध्ये ३४ पदांकरिता जाहीरात देण्यात आली होती. यामध्ये ४ पदे महिलांसाठी आरक्षित होती त्यानुसार ही पदे भरलेली आहेत. एका महिला कर्मचाऱ्याची आरोग्य सेवक म्हणून भरती करण्यात आलेली आहे. परिचरमध्ये एक पद महिलांसाठी आरक्षित होते, ते भरलेले आहे. यानंतर पुढील आर्थिक वर्षात म्हणजे सन २०१२-२०१३ मध्ये ४८ पदांकरिता जाहीरात देण्यात आली होती. यामधील ७ पदे महिलांकरिता आरक्षित होती, ती सर्वच्या सर्व भरलेली आहेत. सन २०१३-२०१४ मध्ये ६९ पदांकरिता जाहीरात देण्यात आली होती. यामधील १४ पदे महिलांकरिता आरक्षित होती, यापैकी १२ महिला कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आलेली आहे. पशुधन पर्यवेक्षक महिला अधिकारी उपलब्ध झाले नाही. अशी माहिती तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस दिली.

विभागीय सचिवांची साक्ष :---

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २३ जून, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गट अ व ब मधील पदे शासन स्तरावर भरण्यात येतात तसेच क व ड मधील पदे जिल्हा परिषदेकडून भरली जातात. सध्या वर्ग १ मधील १३ पदे मंजूर असून ९ भरलेली आहेत व ४ पदे रिक्त आहेत. या ४ पदांपैकी उप मुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), उप मुख्यकार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा), अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इ. पदे आहेत. इतर विभागात वर्ग १ ची २८ पदे असून त्यापैकी १८ पदे भरलेली आहेत व १० पदे रिक्त आहेत. असे समितीस सांगितले.

त्यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी ग्रामविकास विभागात वर्ग १ मधील हेड ऑफ डिपार्टमेंट व शिक्षणाधिकारी ही पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याचा प्राधान्याने प्रयत्न केला जाईल. स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात दिली होती.

क व ड वर्गातील पदांकरिता जाहिरात दिली होती. असे समितीसमोर स्पष्ट केले. नंतर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साधारणपणे ३०% पदांचे आरक्षण आहे. एखाद्या पदाकरिता महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास ते पद रिक्त ठेवले जाते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात महिलांच्या राखीव पदांवर पुरुष उमेदवाराची भरती केल्याचे एकही प्रकरण घडलेले नाही. रोस्टरनुसार भरती केली जाते. सन १९९४ नंतर जी पदे रिक्त झाली त्याकरिता ३०% आरक्षण आहे. यापूर्वी महिलांकरिता आरक्षण नव्हते. त्यामुळे पुरुषांची संख्या जास्त आहे. असा खुलासा केला. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कनिष्ठ अभियंता या पदाची ५०% पदोन्नती व ५०% सरळसेवा या प्रमाणे भरती करण्यात आली आहे. सरळसेवा व पदोन्नतीने भरती प्रक्रिया केली जाते. तसेच वर्ग ३ मधील ८४ पदे रिक्त असून त्यापैकी सरळसेवेने ३६ व पदोन्नतीने ४८ पदे रिक्त आहेत. पदोन्नती पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. अधिकाधिक पदे पदोन्नतीने भरण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. काही ठिकाणी संवर्ग उपलब्ध नाही. शाखा अभियंता इ. पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. नोव्हेंबरमध्ये ही पदे भरता येतील. पूर्वी मे महिन्यात भरती केली जात होती, आता नोव्हेंबर महिन्यात ही प्रक्रिया केली जाते. शासन निर्णयानुसार, शासनाच्या गाईडलाईन्सप्रमाणे व रोस्टरनुसार जाहिरात दिली जाते. अनेक ठिकाणी एसटी संवर्गातील उमेदवार मिळत नाहीत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात एसटी संवर्गातील उमेदवार मिळत नाही. अशी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अधिक माहिती दिली.

याप्रकरणी विभागीय सचिवांनी ३०% आरक्षण करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सेवा प्रवेश नियम शासन स्वतंत्रपणे तयार करीत नाही. समांतर आरक्षण या पूर्वी तयार केले असून एखाद्या पदाकरिता महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास पुरुष उमेदवाराला घेतले जाते. असे समितीसमोर स्पष्ट केले.

अभिप्राय व शिफारशी :---

समितीने जिल्हा परिषद सिंधुदुर्ग येथे भेट देऊन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली होती. उक्त साक्षीत राज्य शासनाच्या दिनांक २२-६-१९९४ तसेच दिनांक २७-५-१९९७ च्या शासन निर्णयानुसार महिलांसाठी शासकीय सेवेत

३०% जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत आणि उक्त शासन निर्णयानुसार महिलांना आरक्षण देण्याची कार्यवाही सदर जिल्हा परिषदेद्वारे केली जात असल्याची बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीसमोर विषद केली. उक्त साक्षीत जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ आणि वर्ग-४ ची अनेक पदे रिक्त असल्याची बाब समितीसमोर आली. त्याचप्रमाणे सदरची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याचेदेखील समितीला सांगण्यात आले. उक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक २३ जून, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली होती. उक्त साक्षीत सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ ची एकूण २८ पदे मंजूर असून त्यापैकी १८ पदे भरलेली असून १० पदे रिक्त आहेत आणि सदरची रिक्त पदे प्राधान्याने भरण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच क व ड वर्गातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात दिली असून, शासनाच्या उपरोक्त नमूद निर्णयानुसार महिलांसाठी आरक्षित असलेल्या ३०% पदांची काटेकोरपणे भरती केली जाईल असे समितीसमोर विषद केले. तसेच वर्ग-३ मधील ८४ पदे रिक्त असून त्यापैकी सरळ सेवेने ३६ व पदोन्नतीने ४८ पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. शासन निर्णयानुसार शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे व बिंदू नियमावलीनुसार सदरची पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेत केली जाते. तसेच विभागीय सचिवांनी असेही सांगितले की, महिलांकरिता ३०% आरक्षण करण्याबाबत शासन निर्णय असला तरी सेवाप्रवेश शासन स्वतंत्रपणे तयार करत नाही. समांतर आरक्षण यापूर्वी तयार केलेले असून महिला उमेदवाराची भरती न झाल्यास पुरुष उमेदवाराला त्या पदावर घेतले जाते अशी माहिती समितीसमोर विषद केली.

जिल्हा परिषद सिंधुदुर्गमध्ये मोठ्या प्रमाणावर वर्ग-१ ची पदे रिक्त असून त्यामुळे साहजिकच प्रशासनावर ताण पडतो. विभागीय सचिवांनी समितीस आश्वासीत केल्याप्रमाणे सदरची पदे तात्काळ भरण्यात यावीत. तसेच, वर्ग-१ ते वर्ग-४ ची पदे भरण्याची कार्यवाही सुरु असल्याचे समितीस सांगण्यात आले असून सदरची पदे देखील शासन निर्णयानुसार महिलांकरिता ३०% आरक्षीत ठेवण्यात यावीत व शासन निर्णयानुसार काटेकोरपणे पालन करुन कार्यवाही करावी व सदर पदे भरण्याबाबत केलेली कार्यवाही समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२ सिंधुदुर्ग, जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक :---

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे गत तीन वर्षातील अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? उक्त अंदाजपत्रकातील रक्कमेपैकी एकूण किती रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनेसाठी राखून ठेवण्यात आली आहे ? महिला अधिकारी व कर्मचारी यांचे सबलीकरण कल्याणाकरीता जिल्हा परिषदेकडून स्वतंत्र कल्याणकारी योजना/उपक्रम राबविले जातात का ? तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमाअंतर्गत कोणते विविध उपक्रम/योजना राबविण्यात आल्या आहेत ? त्यात किती महिलांनी भाग घेतला ? शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद निधीतून महिला संबंधीत कार्यक्रमासाठी १०% रक्कम खर्च करण्यात येते का? असल्यास गत ३ वर्षात किती रक्कम खर्च करण्यात आली ? अशी विचारणा करण्यात आली.

उपरोक्त प्रकरणी सिंधुदुर्ग, जिल्हापरिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :---

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे गत तीन वर्षातील अंदाजपत्रकीय तरतूद :---

अनु. क्र. (१)	वर्ष (२)			अंदाजपत्रकीय तरतूद (३)
(१)	२०१०-२०११	. .	. .	११,००,००,०००
(२)	२०११-२०१२	. .	. .	१०,९२,५२,४००
(३)	२०१२-२०१३	. .	. .	१५,३८,४८,४१५
(४)	२०१३-२०१४	. .	. .	२०,३४,००,०००

सदर अंदाजपत्रकातील रक्कमेपैकी जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी खालील रक्कम राखून ठेवण्यात आली आहे.

अनु. क्र.	वर्ष		अंदाजपत्रकातील रकमेपैकी कल्याणकारी योजनेसाठी राखून ठेवलेली रक्कम
(१)	(२)		(३)
(१)	२०१०-२०११	. .	६१,१६,३००
(२)	२०११-२०१२	. .	६६,९५,२००
(३)	२०१२-२०१३	. .	८०,०८,२००
(४)	२०१३-२०१४	. .	८३,६२,०००

महिलांचे बलशालीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना तसेच महिलांकरिता देण्यात येणाऱ्या सोई-सवलती बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे.

२. मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना.

३. महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे.

४. १० वी व १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे.

५. किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडरबाबत तसेच आरोग्य व कुटुंब नियोजनाबाबत प्रशिक्षण देणे.

६. महिलांना कायदेशीर/विधी विषयक सल्ला देणे.

७. महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल.

८. आदर्श अंगणवाडी/बालवाडी सेविकांना पुरस्कार.

९. महिलांना शिलाई मशिन/पिठाची गिरण (घरघंटी) व सौर कंदील पुरविणे.

१०. कुपोषित मुलांसाठी तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहार पुरविणे.

११. अंगणवाड्यांना गरजेनुसार साहित्य पुरविणे.

१२. कुपोषित मुलांना अर्थसहाय्य देणे.

१३. अंगणवाडीतील मुलांना गणवेश पुरविणे.

१४. अंगणवाड्यांसाठी स्वतंत्र इमारत भाडे.

शासन योजना

१. महिलांना शिलाई मशिन पुरविणे (विघयो)

२. निराधार निराश्रीत विधवांच्या मुलींच्या विवाहाकरिता विवाह भत्ता देणे.

३. स्वयंरोजगार अनुदान (विघयो)

४. देवदासी निर्वाह अनुदान देणे.

सदर योजनांवर गत तीन वर्षात वर्षनिहाय व योजनानिहाय खर्च करण्यात आलेल्या अनुदानाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अनु. क्र.	वर्ष		योजनेसाठी झालेला खर्च
(१)	(२)		(३)
(१)	२०१०-२०११	. .	५६,५२,७६८
(२)	२०११-२०१२	. .	६४,५७,५१७
(३)	२०१२-२०१३	. .	७८,७८,८३४

अ.क्र.	योजनेचे नाव	सन २०१०-२०११		सन २०११-२०१२		सन २०१२-२०१३	
		प्राप्त अनुदान	झालेला खर्च	प्राप्त अनुदान	झालेला खर्च	प्राप्त अनुदान	झालेला खर्च
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
(१)	मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे.	०.००	०.००	७.६२	६.५६	१३.५७	१३.५३
(२)	मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासाठी प्रशिक्षण योजना.	०.००	०.००	६.८०	६.८०	९.५०	९.४९
(३)	महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे.	०.९६	०.९६	१.०८	१.०८	१.०८	१.०८
(४)	दहावी व बारावी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे.	१.९८	१.९८	५.२४	५.२४	४.७०	४.६२
(५)	किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर बाबत तसेच आरोग्य व कुटुंब नियोजना-बाबत प्रशिक्षण देणे.	१.५०	१.४७	४.००	३.०९	३.००	२.७७
(६)	महिलांना कायदेशीर/विधि-विषयक सल्ला देणे.	०.००	०.००	४.००	३.७७	३.००	२.९२
(७)	महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल.	०.२०	०.२०	०.००	०.००	०.६४	०.२४
(८)	आदर्श अंगणवाडी/बालवाडी सेविकांना पुरस्कार.	०.५०	०.५०	२.००	२.००	२.००	२.००

योजना--चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
(९)	महिलांना साहित्य पुरविणे.						
	अ. महिलांना शिलाई मशिन पुरविणे.	१५.००	१४.९४	१७.००	१७.००	०.००	०.००
	ब. महिलांना पिठाची गीरण (घरघंटी) पुरविणे	०.००	०.००	८.००	७.९१	२०.००	१९.९५
	क. महिलांना सौर कंदिल पुरविणे	०.००	०.००	८.४७	८.४७	१०.००	९.९९
(१०)	कुपोषीत मुलांसाठी व तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरीक्त आहार	६.००	६.००	०.००	०.००	१०.००	१०.००
(११)	अंगणवाड्यांना गरजे नुरुप साहित्य पुरविणे.	२५.९०	२५.८४	०.००	०.००	०.००	०.००
(१२)	कुपोषित मुलांना अर्थसहाय्य देणे.	३.००	२.६५	०.००	०.००	०.००	०.००
(१३)	अंगणवाडीतील मुलांना गणवेश पुरविणे	६.१२	२.००	०.००	०.००	०.००	०.००
(१४)	अंगणवाड्यासाठी स्वतंत्र ईमारत भाडे.	०.००	०.००	२.७४	२.७१	२.५९	२.२०
	एकूण . .	६१.१६	५६.५३	६६.९५	६४.५८	८०.०८	७८.७९

दिनांक १२ ऑगस्ट, १९९४ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद निधीतून १०% रक्कम महिला व बालविकास विभागाकरिता राखून ठेवण्यात येते.

शासन निर्णय क्रमांक पीआरई/२२०३/(१७/२२०३)/प्रा.शि-४. दिनांक २० मे, २००४ नुसार गणवेश शिलाईचे काम शाळाव्यवस्थापन समितीमार्फत करण्यात येते. तालुका स्तरावरुन स्थानिक पातळीवर व्यवस्थापन समिती गावामध्ये असलेल्या कारागिराकडून शाळेतील मुलांचे गणवेश शिवून घेतात. अशी माहिती प्राप्त झाली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :---

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांनी सन २०१०-११ मध्ये उपकराच्या माध्यमातून रुपये ३,३१,८६,५०० प्राप्त झाले होते. १०% प्रमाणे रुपये ३३,१८,६५० होतात. परंतु, सन २०१०-२०११ मध्ये महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी रुपये ६१,१६,३०० राखून ठेवण्यात आले होते. महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी १०% पेक्षा जास्त रक्कम राखून ठेवण्यात आलेली आहे. तसेच सन २०११-१२ मध्ये उपकराच्या माध्यमातून रुपये ६,३७,८६,३०६ प्राप्त झाले होते. त्यापैकी रुपये ६४,९६,११८ महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी तरतूद करण्यात आली होती. सन २०११-१२ मध्ये महिलांच्या कल्याणकारी योजनांवर रुपये ६४,७५,५१७ खर्च करण्यात आलेले आहेत. महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी १०% पेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. अशी माहिती समितीस दिली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी दिनांक १० मार्च, २०११ च्या शासन निर्णयानुसार इयत्ता ४ ते ७ वी मधील मुलींना कराटेचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. स्वयंरोजगार मिळावा यासाठी मुलींना कराटेचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेचा १६३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. मुलींना व महिलांना ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. असे समितीस सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे ही योजना जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून राबविण्यात येते. सन २०१०-११ मध्ये ही योजना राबविण्यात आली नव्हती अशी माहिती दिली. ही योजना राबविण्यासाठी शासनाची मान्यता घेण्यात आलेली आहे. शासनाने मान्यता दिलेल्या योजना जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून राबविण्यात येतात. उर्वरित रक्कम पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यात आलेली आहे. सन २०१२-१३ मध्ये या योजनेचा ३३५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. लाभार्थ्यांना ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे व या वर्षापासून काजू बिया सोलण्याचे प्रशिक्षण सुरू करण्यात आलेले आहे. अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी समितीस

दिली. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमार्फत "सिंधू समाधान योजना" राबविण्यात येते. या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती अंगणवाडी कर्मचाऱ्यांमार्फत महिलांपर्यंत पोहोचविली जाते. असा जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीसमोर खुलासा केला. एमएससीआयटी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुदान दिले जाते. महिलांना कायदेशीर / विधिविषय सल्ला देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात शिबिरे आयोजित केली जातात. यामध्ये एकूण १२ हजार ४३० लाभार्थी उपस्थित होते त्यांना योग्य तो कायदेशीर सल्ला दिलेला आहे. असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सांगितले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी सदर खर्च शिबिरावर झालेला आहे. या ठिकाणी थोडीशी दुरुस्ती करण्याची गरज आहे. त्या ठिकाणी कायदेशीर/विधिविषय सल्ला देण्यासाठी शिबिरे घेणे अशी दुरुस्ती करण्याची गरज आहे. प्रत्येक समुपदेशकाला प्रती ९ हजार रुपयांचे अनुदान देत असतो. अशी समितीस माहिती दिली तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यामध्ये प्रत्येक सत्रात प्रत्येक वक्त्याला ५०० रुपयांचे मानधन दिले जाते. प्रत्येक तालुक्यात शिबिरे आयोजित केली जातात. प्रत्येक बीटमधील अंगणवाडी सेविकांना त्यांच्या कामासाठी पुरस्कार दिला जातो. एका बीटमध्ये एका अंगणवाडी सेविकेस आणि मदतनिसला पुरस्कार दिला जातो. अशी समितीस माहिती दिली.

तद्नंतर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रत्येक बीटमधून अंगणवाडीसेविकेस त्यांच्या निकषानुसार पुरस्काराचे वितरण केले जाते. कुपोषण निर्मुलनाचे काम किती चांगल्याप्रकारे केले. आदर्श अंगणवाडीचे सुशोभिकरणाचे काम किती केले. त्या ठिकाणी शौचालयाची सुविधा आहे किंवा कसे तसेच पेयजल सुविधांचा तसेच अंगणवाडीत योग्य सुविधा दिल्या जातात किंवा कसे याचाही देखील विचार केला जातो. जिल्हास्तरावर पुरस्काराचा खर्च केला जातो. यासंदर्भात प्रत्येक तालुक्यातून प्रस्ताव पाठविला जातो. त्या अनुषंगाने जिल्हास्तरावर कोणाला पुरस्कार द्यायचा ते निश्चित केले जाते. रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला जातो. पुरस्कारासाठी दीड हजार रुपये दिले जातात. प्रत्येक बीटमधून एका अंगणवाडी सेविकेस पुरस्कार दिला जातो, असे एकूण ४८ बीट आहेत. जिल्हा स्तरावर जिल्हा बाल समिती कार्यरत आहे. या समितीला पुरस्कार वाढवून देण्याचा हक्क आहे. बजेटमधील १०% निधीतून हा खर्च भागविला जातो. सन २०११-२०१२

मध्ये ८८ लाभार्थ्यांना पुरस्काराची रक्कम दिलेली आहे. दरवर्षी सदर कार्यक्रम जिल्हा स्तरावर राबविला जातो. कोणते कार्यक्रम घ्यावेत हे महिला बालविकास समिती निश्चित करते. असे समितीसमोर स्पष्ट केले. तद्नंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बालविकास समितीने शिलाई मशिन देण्याची गरज नसल्यामुळे घरघंटी आणि सौर कंदिल घेण्याबाबत शिफारस केली होती. सन २०१०-२०११ मध्ये २४१ लाभार्थ्यांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले होते. आरसीनुसार शिलाई मशिनची खरेदी केली होती. एका शिलाई मशिनची किंमत ६ हजारच्या आसपास होती. ही पिको फॉलची मशिन आहे. तथापि, हेडचे नाव शिलाई मशिन असे आहे. असा समितीसमोर खुलासा केला.

अभिप्राय व शिफारशी :---

समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला भेट देऊन शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या एकूण अंदाजपत्रकापैकी १०% रक्कम ही उक्त जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनांकरिता राखून ठेवण्यात येते किंवा कसे याबाबत विचारणा केली असता समितीस सांगण्यात आले की, सन २०१०-११ मध्ये उपकराच्या माध्यमातून रुपये ३,३१,८६,५०० प्राप्त झाले होते. १०% प्रमाणे रुपये ३३,१८,६५० होतात. परंतु, सन २०१०-२०११ मध्ये महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी रुपये ६१,१६,३०० राखून ठेवण्यात आले होते. महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी १०% पेक्षा जास्त रक्कम राखून ठेवण्यात आलेली आहे. तसेच सन २०११-१२ मध्ये उपकराच्या माध्यमातून रुपये ६,३७,८६,३०६ प्राप्त झाले होते. त्यापैकी रुपये ६४,९६,११८ महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी तरतूद करण्यात आली होती. सन २०११-१२ मध्ये महिलांच्या कल्याणकारी योजनांवर रुपये ६४,७५,५१७ खर्च करण्यात आलेले आहेत. महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी १०% पेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात आलेली आहे अशी माहिती समितीस दिली. जिल्हा परिषदेने महिलांकरिता जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नापैकी १०% रकमेची तरतूद केल्याची माहिती समितीला सांगण्यात आली. सदरची १०% रक्कम तरतूद करून ती रक्कमदेखील शासन निर्णयानुसार खर्च केली असल्याचे समितीला सांगण्यात आले.

इयत्ता चौथी ते सातवीच्या मुलींना कराटे प्रशिक्षण, मुलींना व महिलांना ब्युटीपार्लरचे प्रशिक्षण, मुलींना व महिलांना व्यावसायीक व तांत्रिक प्रशिक्षण, काजूबिया सोलण्याचे प्रशिक्षण, महिलांना कायदेशीर/विधी विषयक सल्ले देण्यासाठी तालुकानिहाय शिबीर आयोजित करणे, महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे, अंगणवाडी सेविका व मदतनीसांना प्रोत्साहन देणे, आदर्श अंगणवाड्यांचे सुशोभीकरण, शौचालय सुविधा, पेयजल सुविधा इत्यादी अंगणवाड्यात दिल्या जातात की नाही त्याची तपासणी करणे, शिलाईमशीन वाटप करणे इत्यादी बाबींवर जिल्हा परिषदेने खर्च करुन सदरच्या योजना राबविल्या असल्याचे समितीला सांगितले.

समिती उपरोक्त प्राप्त झालेल्या माहितीबाबत समाधान व्यक्त करते. सदरची बाब ही समितीला सुखावणारी आहे. परंतु समितीने राज्यात अनेक ठिकाणी भेटी दिल्या असता समितीला आढळून आले की, अनेक जिल्हा परिषदांनी त्यांच्या एकूण उत्पन्नापैकी भांडवली व वेतनेतर खर्च वगळता १०% निधी महिलांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी खर्च केल्याचे दिसून येत नाही. तथापि, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमध्ये वर्षनिहाय तरतूद करुन त्याप्रमाणे शासन निर्णयानुसार विविध महिलांकरिता असलेल्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी खर्च केला असल्यामुळे समिती समाधान व्यक्त करते व प्रत्यक्षातदेखील अशाच विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेला प्रोत्साहीत करते.

१.३ शिलाई मशीन वाटप :---

समितीने जिल्हा परिषदेस दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी माहिती घेताना जास्त मशीन खरेदी निविदा न मागवता दर करारानुसार शिलाई मशीन खरेदी केल्याचे समितीच्या निदर्शनास आले होते.

सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :---

सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेला दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लाभार्थ्यांना लक्ष्मी ब्रँड कंपनीच्या पिको फॉल

आणि एम्ब्रॉयडरी मशिनचे वाटप केलेले आहे. ज्यांनी प्रशिक्षण घेतलेले आहे त्यांनाच मशिनचे वाटप करण्यात आलेले आहे आणि महिला व बाल कल्याण समितीने लाभार्थ्यांची निवड केलेली आहे असे समितीसमोर स्पष्ट केले.

विभागीय सचिवांची साक्ष :---

सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २३ जून, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी लाभार्थ्यांना वाटप केलेल्या शिलाई मशिन निवदा न मागविता दर करारावर खरेदी करण्यात आल्या होत्या. याचा खुलासा समितीसमोर करताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर शिलाई मशिन निविदा न मागविताच खरेदी करण्याची कारणे ज्या शिलाई मशिन खरेदी केल्या होत्या त्या निविदा प्रक्रियेद्वारेच खरेदी केल्या होत्या. त्या काळामध्ये लाभार्थ्यांना अद्ययावत नवीन पिको फॉल मशिन पुरवावयाच्या होत्या. शिलाई मशिन खरेदी करण्याबाबत शासनाचा रेट कॉन्ट्रॅक्ट नसल्यामुळेच निविदा प्रक्रियेद्वारे ही खरेदी केली असे समितीसमोर स्पष्ट केले.

जिल्हापरिषदेने जर जाहिरात देऊन रितसर निविदा प्रक्रियेद्वारे शिलाई मशिन खरेदी केल्या होत्या तर समितीच्या बैठकीच्या वेळीच समितीला सविस्तर कागदपत्रे दाखविली नाहीत ? या समितीच्या प्रश्नावर खुलासा करताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित अधिकारी गोंधळल्यामुळे त्यांनी अशाप्रकारे विसंगत उत्तर दिले होते. असे समितीस सांगितले त्यावर समितीच्या बैठकीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी किंवा अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ही खरेदी जाहिरात देऊन निविदा प्रक्रियेद्वारे केली होती तर संबंधित अधिकाऱ्यांनी त्याच वेळी समितीला आवश्यक ती कागदपत्रे दाखवावयास हवी होती. या समितीच्या आक्षेपावर खुलासा करताना ज्या वस्तू रेट कॉन्ट्रॅक्ट यादीवर आहेत त्या वस्तू रेट कॉन्ट्रॅक्टनुसारच खरेदी केलेल्या आहेत. त्यावेळी सौर कंदील हे शासनाच्या रेट कॉन्ट्रॅक्टच्या यादीत होते, म्हणून ती खरेदी रेट कॉन्ट्रॅक्टनुसार करण्यात आलेली आहे. असे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले.

शिलाई मशिनच्या बाबतीत रेट कॉन्ट्रॅक्ट नव्हते म्हणून त्या काळात जाहिरात देऊन निविदा प्रक्रियेद्वारे खरेदी केली होती. या बाबतची सर्व कागदपत्रे सध्या जिल्हा परिषदेकडे उपलब्ध आहेत. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले त्यावर समितीने दौऱ्याच्या वेळी जे अधिकारी बैठकीला उपस्थित होते त्यांनी या संदर्भातील आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्याच वेळी समितीला दाखवावयास हवी होती. परंतु त्यावेळी शिलाई मशिनची खरेदी आर.सी. नुसार केल्याचे सांगितले तथापि, ती खरेदी जाहिरात देऊन निविदा प्रक्रियेद्वारे केली होती असे स्पष्ट केले.

तसेच निविदेची जाहिरात राज्यस्तरीय वर्तमानपत्रामध्ये द्यावयास हवी होती. परंतु जिल्हा परिषदेने त्यामध्ये जाहिरात न देता, जाणीवपूर्वक साप्ताहिकांमध्ये जाहिरात दिली. त्या कागदपत्रांची समितीने मागणी केल्यानुसार समितीस ती दाखविण्यात आली.

अभिप्राय व शिफारशी :---

समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना शिलाई मशिनचे वाटप केल्याप्रकरणी शिलाई मशीन खरेदीच्या बाबतीत विचारले असता सदरच्या शिलाई मशिनची खरेदी निविदा न मागविता दर करारानुसार केली असल्याचे तसेच ज्यांनी प्रशिक्षण घेतले आहे अशाच लाभार्थ्यांना शिलाई मशिनचे वाटप केले असल्याचे समितीला सांगण्यात आले आहे. शिलाई मशीन खरेदी करतेवेळी शासनाने दर करार केला नसल्यामुळेच सदरची खरेदी निविदा प्रक्रियेद्वारे करण्याबाबत नमूद केले आहे. तथापि, सदरची बाब व खरेदी प्रक्रियेची कागदपत्रे समितीला भेटीच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आली नव्हती व त्यावेळी संबंधित अधिकारी गोंधळून गेल्यामुळे समितीला माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. परंतु विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सदरची कागदपत्रे उपलब्ध असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले.

सदरच्या शिलाई मशिनची जाहिरात ही साप्ताहीकात दिली होती त्यामुळे याला कमी प्रसिध्दी मिळाली व स्पर्धक जास्त मिळाले नाहीत असे समितीचे मत झाले आहे.

शासनाचे धोरण या संदर्भात स्पष्ट आहे. साहित्य खरेदीची सदरची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात, दैनिकात तसेच राज्य स्तरावरील दैनिकात द्यावी असे नमूद आहे. असे असूनसुध्दा सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने सदरची जाहिरात साप्ताहिकात दिल्याबद्दल समिती खेद व्यक्त करते तसेच या निविदेची जाहिरात साप्ताहिकात दिली असून ती नियमानुसार नसल्यामुळे या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करावी. तसेच भविष्यात जिल्हा परिषदेतील कोणत्याही खरेदी प्रक्रियेची निविदा प्रक्रियेद्वारे कार्यवाही करावयाची असल्यास त्याची जाहिरात शासन निर्णयाप्रमाणे जिल्हा व राज्यस्तरीय दैनिकात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.४ सिंधुदूर्ग, जिल्हापरिषदेतील महिला बचत गट :---

समितीने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेस भेट देऊन तेथील अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उपस्थित राहण्याबाबत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना जिल्हापरिषदेने कळवूनही ते उपस्थित नव्हते.

सिंधुदूर्ग, जिल्हापरिषदे संदर्भातील प्रश्नावलीच्या अनुषंगाने समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्ह्यामध्ये महिलांचे एकूण किती बचत गट स्थापन झाले आहेत ? त्यापैकी किती बचत गटांना लघुउद्योग स्थापन करण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. तसेच त्यांची सद्य:स्थिती काय आहे ? याबाबतची लेखी माहिती मागविण्यात आली.

उपरोक्त प्रकरणी सिंधुदूर्ग, जिल्हापरिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :---

सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेंतर्गत द्रारिद्रय रेषेखालील महिलांचे एकूण ४५७९ स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन झाले आहेत. स्थापन महिला स्वयंसहाय्यता बचत गटांपैकी १३९७ स्वयंसहाय्यता बचत गटांना लघुउद्योग करण्यासाठी मंजूरी दिलेली आहे.

लघुउद्योग स्थापन करण्यासाठी मंजूरी दिलेले स्वयंसहाय्यता बचत गट सुरळीतपणे स्थानिक पातळीवर लघुउद्योग करत आहेत. सदर लघुउद्योगातून उत्पादित केलेल्या विविध प्रकारच्या वस्तू, हस्तकलेतून निर्माण केलेल्या कलाकृती तसेच विविध प्रकारचे खाद्यपदार्थ यांची विक्री स्थानिक पातळीवर, आठवडा बाजार, तालुका तसेच जिल्हास्तरावर केली जाते. त्याशिवाय शासनाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या जिल्हा विभाग राज्य व प्रादेशिक स्तरावरील सरस मध्ये स्वयंसहाय्यता बचत गटांनी निर्माण केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री केली जाते. उपरोक्त प्रदर्शनामध्ये स्वयंसहाय्यता बचत गटांचा उत्स्फुर्त सहभाग असतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :---

समितीने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेस भेट देऊन तेथील अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उपस्थित राहण्याबाबत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना जिल्हापरिषदेने कळवूनही ते उपस्थित नव्हते. असे समितीच्या दृष्टोत्पतीस आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेटीच्या वेळी, महिला आर्थिक विकास महामंडळाकडून महिला उद्योजकांना उद्योगधंदे उभारण्याकरिता आवश्यक ते सहाय्य दिले जाते आणि त्यांच्याकडून या संदर्भात अनेक योजना राबविल्या जातात. असे सांगितले तद्नंतर महामंडळाच्या प्रतिनिधिंनी महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत हा उपक्रम राबविण्यात येतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४,५७९ बचत गट आहेत. ६८५ बचत गटांना रुपये ५,८९,६३,३००/- एवढ्या रकमेचे बँक कर्ज मिळवून दिलेले आहे. काही बचत गटांनी पोल्ट्री फार्म सुरु केलेले आहेत. बचत गटांनी स्थापन केलेल्या उद्योगांना महामंडळ प्रतिनिधी भेटी देतात बचत गटांना पोल्ट्री फार्म, सामुहिक शेती, नर्सरी उभारण्यासाठी कर्ज मिळवून दिलेले आहे. कुडाळ तालुक्यात काही बचत गटांनी नर्सरी सुरु केलेली आहे. ४ बचत गटांना पोल्ट्री फार्म सुरु करण्यासाठी बँकेकडून कर्ज मिळवून दिलेले आहे. सावंतवाडी, वेंगुर्ला येथे बचत गटांची दुकाने आहेत. दैनंदिन कामकाजासाठी लागणाऱ्या वस्तुंची बचत गटांकडून खरेदी करण्यात येते असा खुलासा केला.

विभागीय सचिवांची साक्ष :---

सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २३ जून, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी त्यांनी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकांनी प्रत्येक वर्षी प्रशिक्षणावर जिल्हानिहाय १० ते १२ लाख रुपये खर्च केला जातो. राज्यात शासनाने ७५ हजार बचत गट स्थापन केलेले असून त्यामध्ये १० लाख महिलांना सामावून घेतले आहे आणि त्यांना विविध बँकांमार्फत ८३५ कोटी रुपयांचे कर्ज प्राप्त करुन दिलेले आहे. बचत गटांकडून मागणी आल्यानंतर विविध बँकांमार्फत त्यांना कर्ज प्राप्त करून दिले जाते. इतर महामंडळाप्रमाणे या महामंडळास सबसिडी मिळत नाही. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे त्याचा रिपेमेंट रेट ९७% आहे. या बचत गटांचे सस्टेनेबल स्ट्रक्चर तयार केलेले असून ३१५ संस्था रजिस्टर केलेल्या आहेत. बचत गटांचे फेडरेशन्स असून या फेडनेशन्सना सपोर्ट करुन ते बचत गटांना वेगवेगळ्या सर्व्हिसेस देतात. तसेच कृषी सेवा केंद्र, दूध संकलन केंद्र चालवितात. त्यांचे वेगवेगळ्या ६ सेक्टरमध्ये काम सुरू आहे. प्रत्येक वर्षी आऊटकम सर्व्हे देतो. आयफेड संस्थेने ८ वर्षासाठी ११५ कोटी रुपये सॉफ्ट लोन दिले होते. सन २०१५ मध्ये हा कार्यक्रम संपणार होता. परंतु, त्यांना २ वर्षाची मुदतवाढ देत आहोत. याबाबतची प्रोसेस वित्त व नियोजन विभागाच्या स्तरावर सुरू आहे. अशी समितीस साक्षीच्या वेळी माहिती दिली.

विभागीय सचिवांनी त्यावर आयसीआयसीआय बँकेचे कर्ज वाटपाच्या संदर्भात अतिशय कडक नियम असून सदर बँकेने देखील ३०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिलेले आहे. या समितीसमोर केलेल्या खुलाशावर माविम १४ हजार गावांमध्ये काम करीत असून ज्या महिलेचे बँकेत खाते नव्हते अशा महिलांना यामध्ये सामावून घेतलेले आहे. अशी महामंडळ प्रतिनिधींनी माहिती दिली.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकांनी, नाबार्डने ५०० गावांची निवड केली होती. तद्नंतरच्या काळात तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण योजना व इतर योजना लागू झाल्या नंतर त्यानुसार गावांची संख्या देखील वाढत

गेली. सामाजिक न्याय विभागाने सूचविल्यानुसार ज्या गावात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या जास्त आहे अशा गावांची निवड करावी. त्यानुसार आम्ही आदिवासी लोकसंख्येची गावे निवडली असून त्यासाठी आम्हाला विभागाकडून थोडा ट्रायबलचा फंड मिळाला. असे समितीसमोर स्पष्ट केले.

आयफेडकडून मिळालेल्या लोनमधील जवळपास ५६ कोटी रुपये शिल्लक आहेत. हा निधी खर्च करण्यासाठी परवानगी द्यावी, अशी वित्त विभागाला विनंती करण्यात आली असून वित्त विभागाने परवानगी दिली तर हा निधी खर्च करण्यात येईल. यामध्ये तांत्रिक अडचण अशी होती की, आयफेडने जे लोन दिले ते त्यांच्या करन्सीमध्ये दिले आणि त्याचे रुपांतर रुपयांमध्ये केले असता ही लोनची रक्कम पूर्णपणे वापरण्यात आलेली आहे. असे लक्षात येते. परंतु, मूळ करन्सीमधील रक्कम अद्याप शिल्लक आहे. असा विभागीय सचिवांनी खुलासा केला. त्यावर महामंडळ प्रतिनिधींनी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, शबरी विकास महामंडळ, इतर मागासवर्ग विकास महामंडळाला प्रत्येक वर्षी २० कोटी रुपयांची क्रॉस सबसिडी मिळते. परंतु, माविमला केवळ १ कोटी रुपयांची क्रॉस सबसिडी मिळते. माविमचे खूप चांगले मॉडेल आहे. माविमचा संपूर्ण राज्यात फक्त २७० कर्मचाऱ्यांचा स्टाफ आहे. त्यापैकी ५०% कर्मचारी कंत्राटी पद्धतीवर आहेत आणि ५०% कर्मचारी नियमित आहेत आणि त्यासाठी होणारा वार्षिक खर्च जास्तीत जास्त १८ कोटी रुपये आहे. माविमच्या कर्मचाऱ्यांकडे २० वर्षाचा अनुभव आहे. त्यांनी मध्य प्रदेशात जाऊन तेथील लोकांना या संदर्भात प्रशिक्षण दिलेले आहे. आपल्या राज्यात आयफेडचे २१ प्रोजेक्ट सुरु आहेत. माविममध्ये मागील दिड वर्षापासून आयएएस अधिकारी नाही. असा खुलासा केला.

या संदर्भात वित्त मंत्र्यांबरोबर चर्चा झाली होती. त्यावेळी एक्स्टेंशन देताना कन्व्हर्शन करण्यास नकार देण्यात आला. राज्य शासनामार्फत प्रत्येक वर्षी महालक्ष्मी सरस नावाचे प्रदर्शन आयोजित केले जाते. परंतु, ते प्रदर्शन ठराविक काळासाठी असते. त्यावेळी अनेक महिला बचत गट त्या प्रदर्शनात सहभागी होतात. या संदर्भात असे प्रदर्शन ठराविक काळासाठी न भरविता ते कायमस्वरुपी भरविले पाहिजे आणि

प्रदर्शन भरविण्यासाठी कायमस्वरुपी जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे. नागपूर, अमरावती अशा ७-८ मोठ्या शहरांमधील महिला बचत गटांसाठी कायमस्वरुपी व्यवस्था करावी. अशी मा.मुख्यमंत्र्यांची सूचना होती, त्यानूसार शासन असे नियोजन करीत आहे की, ८-९ दुकाने घ्यावयाची आणि ती त्यांना नगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन द्यावीत. शासन वर्षभर असे कार्यक्रम घेणार आहे. एका गाळ्याचे वाटप फक्त दोन आठवड्यांसाठी करण्यात येईल आणि रोटेशन पद्धतीने त्याचे वाटप होईल. यामुळे कोणताही ग्रुप दोन आठवड्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी राहणार नाही.

यावर्षी शासन ४-५ ठिकाणी असा कार्यक्रम आयोजित करणार आहे. ग्रामविकास विभाग आणि नगरविकास विभाग यासाठी एकत्रितपणे काम करीत आहे. शासन डिसेंबर अखेर पर्यंत किमान तीन ठिकाणी बचत गटांसाठी अशा प्रकारचे विक्री दालन सुरु करणार आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत ६ महामंडळे येतात. या महामंडळांकडून बचत गटांना कर्जाचे वाटप व आतापर्यंत महामंडळाने बचत गटांना कर्ज उपलब्ध करुन दिलेले नाही. या प्रकरणी माविमच्या महाव्यवस्थापकांबरोबर चर्चा करुन महिला बचत गटांनी दूध संकलनाचा खूप चांगला प्रकल्प सुरु केलेला आहे. त्याच धर्तीवर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळांनी माविमच्या एक्स्पर्टाईजचा उपयोग करुन काही करता येईल काय असा विचार शासन स्तरावर सुरु आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकांनी निधी उपलब्धतेनुसार खर्च करण्यात आला असून एका प्रवर्गातील गटाला मदत दिल्यास त्या प्रवर्गातील महिलांचाच बचत गट तयार होईल असे समितीस सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :-

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील महिलांचे एकूण ४५७९ स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन झाले असून उक्त बचत गटांपैकी १३९७ स्वयंसहाय्यता बचत गटांना लघुउद्योग करण्यासाठी मंजुरी दिली

आहे. सदरचे बचत गट सुरळीतपणे स्थानिक पातळीवर लघुउद्योग करीत असून सदर लघुउद्योगातून उत्पादित केलेल्या विविध प्रकारच्या वस्तू, हस्तकलेतून निर्माण केलेल्या कलाकृती तसेच विविध प्रकारचे खाद्यपदार्थ यांची विक्री स्थानिक पातळीवर, आठवडा बाजार, तालुका तसेच जिल्हा स्तरावर केली जाते. त्याशिवाय शासनाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या जिल्हा विभाग राज्य व प्रादेशिक स्तरावरील सरसमध्ये स्वयंसहाय्यता बचत गटांनी निर्माण केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री केली जाते. उपरोक्त प्रदर्शनामध्ये स्वयंसहाय्यता बचत गटांचा उत्स्फुर्त सहभाग असतो. सुमारे ६८५ बचत गटांना रु.५,८९,६३,३०० एवढ्या रकमेचे बँक कर्ज मिळवून दिले आहे. काही बचत गटांनी पोल्ट्री फार्म सुरु केले आहेत. बचत गटांना पोल्ट्री फार्म, सामुहिक शेती आणि नर्सरी उभारण्यासाठी कर्ज मिळवून दिले आहे. सावंतवाडी, वेंगुर्ला येथे बचत गटांची दुकाने आहेत. दैनंदिन कामकाजासाठी लागणाऱ्या वस्तूंची बचत गटांकडून खरेदी करण्यात येते इत्यादी माहिती समितीला सादर करण्यात आली.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकांनी असे सांगितले की, प्रत्येक वर्षी बचत गटातील सदस्यांच्या प्रशिक्षणावर जिल्हानिहाय १० ते १२ लाख रुपये खर्च केला जातो. राज्यात शासनाने ७५ हजार बचत गट स्थापन केले असून त्यामध्ये सुमारे १० लाख महिलांना सामावून घेतलेले आहे आणि त्यांना विविध बँकांमार्फत ८३५ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केलेले आहे. इतर महामंडळाप्रमाणे महिला आर्थिक विकास महामंडळास अनुदान मिळत नाही आणि यात सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे महिला बचत गटांनी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड सुमारे ९७% इतकी आहे. आयफेड संस्थेने ८ वर्षांसाठी ११५ कोटी रुपये सॉफ्ट लोन दिले होते. सन २०१५ मध्ये हा कार्यक्रम संपणार होता. परंतु त्यांना दोन वर्षांची मुदत वाढ देण्याबाबतची कार्यवाही वित्त व विनियोजन विभागाच्या स्तरावर सुरु आहे. विभागीय सचिवांनी असेही सांगितले की, आयसीआयसीआय बँकेचे कर्ज वाटपाच्या संदर्भात अतिशय कडक नियम असून सदर बँकेनेदेखील ३०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करुन दिले आहे. आयफेडकडून मिळालेल्या लोनमधील

जवळपास ५६ कोटी रुपयांची शिल्लक असून सदरचा निधी खर्च करण्यासाठी वित्त विभागाला विनंती करण्यात आली. तथापि, अद्यापही परवानगी प्राप्त झालेली नाही. त्याचप्रमाणे माविमचे संपूर्ण राज्यात २७० इतके कर्मचारी असून त्यापैकी ५०% कर्मचारी कंत्राटी पध्दतीने कामावर आहेत आणि त्यासाठी वार्षिक खर्च जास्तीत जास्त १८ कोटी रुपये आहे. आयफेडचे २१ प्रोजेक्ट सुरु असून मागील दीड वर्षांपासून माविमला आयएएस दर्जाचा अधिकारी मिळालेला नाही.

उपरोक्त सर्व बाबींचा सर्वंकष विचार करता सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमध्ये महिला स्वयंसहाय्यता बचत गटांचे कामकाज समितीला अत्यंत समाधानकारक सुरू असल्याचे दिसून आले आहे. या बचत गटांच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने अनेक महिलांना लघुउद्योग करण्यास मंजुरी दिली असून या बचत गटाद्वारे मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला असल्याचे दिसून येत आहे. या महिला बचत गटांनी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड सुमारे ९७% इतकी असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. ही बाबदेखील अत्यंत दखल घेण्याजोगी आहे. त्याची दुसरी बाजूदेखील विभागीय सचिवांनी सांगितल्याप्रमाणे बँकेचे कर्ज वाटपाच्या संदर्भात अतिशय कडक नियम असून त्यावर व्याजाचा दर त्याचप्रमाणे इतर काही अन्य शुल्क यामुळेदेखील बचत गटांना व्याजाचा भार सहन करावा लागतो. **बचत गटांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड ही सकारात्मक असल्यामुळे तसेच हे छोटे छोटे लघु उद्योजक छोट्या छोट्या समुहाने व्यवसाय करीत असल्याने या समुहांचे कर्ज परतफेड करण्याची वृत्ती पाहता माविम ने पुढाकार घेऊन या बचत गटांना सुलभतेने कर्ज कसे मिळेल व त्यांचा व्यवसाय कसा चालेल व त्यांच्या व्यवसायास शासनाकडून कसा हातभार लागेल यासंदर्भात एक सर्वंकष धोरण आखून ते शासनास सादर करावे व उक्त धोरणावर शासनाने सकारात्मक विचार करुन त्याची अंमलबजावणी करावी असे समितीला प्रकर्षाने वाटते. तसेच सदरच्या बचत गटांच्या संदर्भातील कार्यक्रमास दोन वर्षांची मुदतवाढ देण्याबाबतचा जो वित्त व नियोजन विभागाकडे प्रस्ताव प्रलंबित आहे त्यावर विभागाने तातडीने निर्णय घेऊन सदरची मुदतवाढ देण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे. तसेच आयफेडकडून मिळालेल्या**

कर्जामधून सुमारे ५६ कोटी रुपये निधी खर्च करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित असून या संदर्भातदेखील वित्त विभागाने सकारात्मक विचार करुन सदरचा प्रस्ताव तातडीने निकालात काढून त्यावर सकारात्मक निर्णय घेऊन सदरची रक्कम खर्च करण्यासंदर्भात आदेशीत करावे अशीही समितीची शिफारस आहे आणि याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी.

प्रकरण २

मालवण, नगरपरिषद

२.१ मालवण नगरपरिषदेचे अंदाजपत्रक :---

नगरपरिषदेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय वार्षिक अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? शासन आदेशानुसार नगरपरिषदेकडे व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बाल कल्याण विभागाकडे राखून ठेवण्यात येतो त्याअनुषंगाने आपल्या नगरपरिषदेमधील तीन वर्षात सदरहू ५% निधी कसा खर्च करण्यात आला ? नगरपरिषदेच्या एकूण उत्पन्नाच्या किती टक्के रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत खर्च करण्यात येते ?

उपरोक्त प्रकरणी मालवण नगरपरिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-

नगरपरिषदेचे अदांजपत्रक

सन	अंदाजपत्रक रक्कम
२०१०-११ . .	५,१३,९९,३१०
२०११-१२ . .	६,६५,७२,३०३
२०१२-१३ . .	६,९९,२४,६०३

महिला बालकल्याण समितीमार्फत गत तीन वर्षात नगरपरिषदेकडून गरोदर महिला व माता यांचे करिता आरोग्य शिबीर, कोळश्याचा वापर करुन कपड्यांना इस्त्री करणे, रांगोळी प्रशिक्षण, कागदी व कापडी पिशव्या तयार करणे, जागतिक महिला दिन, मेहंदी प्रशिक्षण, ब्यूटी पार्लर प्रशिक्षण, चायनिज भेल प्रशिक्षण, माक्रम वायरपासून वस्तु बनविणे इत्यादी शिबीरे व प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेली आहेत.

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण २००५/प्रक्र २५५/ ०५/ नवी-२, दिनांक ८.११.२०१० नुसार नगरपरिषदेच्या उत्पन्नाच्या ५% रक्कम महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी खर्च केली जाते. अशी माहिती प्राप्त झाली.

मुख्य अधिकारी यांची साक्ष :---

समितीने मालवण नगरपरिषदेला दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ रोजी भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा प्रकल्प अधिकारी यांनी महिला व बाल कल्याण विभागाने दिनांक १४ जुलै, १९९३ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, महिला व बाल कल्याण कार्यक्रमासाठी नगरपरिषदेने त्यांच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रकमेच्या ५% रक्कम राखून ठेवावी आणि खर्च करावी. नगरपरिषदेच्या एकूण उत्पन्नातून आस्थापना खर्च, नगरपरिषदेने शासनाकडून घेतलेले कर्ज इत्यादी बाबी वजा करुन उर्वरित रक्कमेच्या ५% रक्कम महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करावयाची आहे. असा खुलासा केला.

त्यावर मुख्याधिकारी यांनी सन २०१०-११ मध्ये रुपये १८३६३, सन २०११-१२ मध्ये रुपये २५६४३, सन २०१२-१३ मध्ये रुपये ५७२२२ महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यात आलेले आहेत. महिलांच्या कल्याणकारी योजनांवर ५% पेक्षा कमी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० च्या शासन निर्णयामध्ये एकूण १५ बाबी नमूद केलेल्या आहेत. महिला व बाल कल्याणासाठी राखीव असलेल्या ५% तरतुदीतून त्या बाबींवर खर्च करावयाचा असतो. नगरपरिषदेमार्फत महिलांसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. अंगणवाडी केंद्रातील मुलांकरिता आवश्यक शैक्षणिक साहित्य खरेदी करणे ही बाब शासन निर्णयामध्ये नमूद केलेली आहे. परंतु नगरपरिषदेच्या शाळा नसल्यामुळे या योजनेवर खर्च करण्यात आलेला नाही. ० ते ३ वर्षाच्या मुलांकरिता डे-केअर सेंटर बांधणे व कार्यान्वित करणे यासाठी नगरपरिषदेकडे जागा उपलब्ध नसल्यामुळे या योजनेवर खर्च करण्यात आलेला नाही. मुलींकरिता शिष्यवृत्ती योजना राबविणे ही योजना नगरपरिषदेच्या शाळा नसल्यामुळे राबविण्यात आलेली नाही. नगरपरिषदेमार्फत महिलांना चायनिज भेल तयार करणे, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, मेहंदी प्रशिक्षण, रांगोळी प्रशिक्षण, कागदी व कापडी पिशव्या तयार करणे इत्यादी प्रशिक्षण दिले जाते. मध्यंतरी नगरपरिषदेने प्लास्टीक पिशव्या बंदीचे धोरण स्वीकारले होते. सन २०१२-१३ मध्ये महिलांना कागदी व कापडी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते. यासाठी जुन्या वर्तमानपत्रांचा वापर करण्यात आलेला आहे. या प्रशिक्षणाच्या फी साठी

४,७७९ रुपये खर्च झालेले आहेत. स्थानिक महिलांकडून हे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. या खुलाशावर नगरपरिषदेने महिलांना दिनांक १६ मार्च, २०१३ रोजी रांगोळी प्रशिक्षण देण्यात आले होते. दरवर्षी खर्चाचे ऑडिट केले जाते. हा खर्च लोकल फंडातून केलेला आहे. मेहंदी प्रशिक्षणासाठी ९ हजार ६३ रुपये खर्च आला होता. असा समितीसमोर खुलासा केला.

तद्नंतर मुख्याधिकारी यांनी महिलांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. गुरुकृपा हे कॉस्मेटीकचे स्टोअर आहे. सुवर्ण जयंती नागरी रोजगार योजना अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या बचत गटांना त्यांनी तयार केलेल्या वस्तू विक्रीकरीता समाजविकास संस्था यांचेमार्फत फायबर स्टॉल उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

विभागीय सचिवांची साक्ष :---

मालवण नगरपरिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २३ जून, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी त्यावेळी नगरपरिषदेच्या एकूण बजेटपैकी ५% तरतूद महिलांच्या कल्याणकारी योजनेकरिता केलेली आहे. मालवण नगरपरिषदेचे वार्षिक उत्पन्न सन २०११-२०१२ मध्ये एकूण रुपये ६ कोटी ६५ लाख होते. महसुली खर्च वजा जाता शिल्लक २ कोटी ७३ लाख रुपये शिल्लक राहिले. एकूण उत्पन्नाच्या ५% म्हणजे १३.६५ लाख रुपये होतील. त्यापैकी ११.५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र केलेली तरतूद पूर्णपणे खर्च झालेली नाही, सन २०१०-११ मध्ये खर्च वजा जाता शिल्लक रक्कम १ कोटी ९२ लाख रूपये होती. सदर रकमेच्या ५ टक्के म्हणजेच ९ लाख ६० हजार रुपयांची तरतूद करणे आवश्यक असताना फक्त ८ लाख २५ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली. नगरपरिषदेमध्ये एकूण १७ वॉर्ड आहेत. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

तद्नंतर मुख्याधिकारी यांनी सन २०१० मधील शासन निर्णयामध्ये अंगणवाड्या बांधणे, सुविधा पुरवणे, प्रशिक्षण देणे, आरोग्य शिबिर भरवणे, डे केअर, कपडे पुरवणे इ. कामांकरिता खर्च करता येतो असे स्पष्ट करुन, या कामासाठी असलेली रुपये ८ लाख तरतूदीमधून फक्त रुपये १८,०००/- खर्च झालेली आहे. महिलांना रांगोळी प्रशिक्षण, कागदी व कापडी पिशव्या तयार करणे इत्यादी प्रशिक्षण दिले

जाते. असा खुलासा केला त्यावर विभागीय सचिवांनी समितीस महिला व बाल कल्याण समितीमार्फत जे विषय सुचविले जातात त्यानुसार प्रशिक्षण दिले जाते तसेच शौचालय बांधण्यासाठी किमान १% रकमेचे प्रावधान करु असे सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :---

समितीने मालवण नगर परिषद, जिल्हा सिंधुदुर्ग येथे भेट देऊन मालवण नगर परिषदेचे सन २०१०-११, २०११-१२ व २०१२-१३ या तीन वर्षातील अंदाजपत्रक किती रकमेचे आहे? शासन आदेशानुसार प्रत्येक नगरपरिषदेकडे व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बालकल्याण विभागाकडे राखून ठेवण्यात येतो त्या अनुषंगाने मालवण नगरपरिषदेमध्ये उक्त तीन वर्षात ५% निधी राखून ठेऊन महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी राबविण्यात आल्या किंवा कसे याबाबत विचारले असता, मालवण नगर परिषदेने सन २०१०-११ या वर्षाचे अंदाजपत्रक रुपये ५,१३,९९,३१० सन २०११-१२ या वर्षाचे अंदाजपत्रक रुपये ६,६५,७२,३०३ तर सन २०१२-१३ या वर्षाचे वार्षिक अंदाजपत्रक रुपये ६,९९,२४,६०३ इतक्या रकमेचे होते, शासन निर्णयानुसार नगरपरिषदेच्या उत्पन्नाच्या ५% रक्कम महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी खर्च केली जाते अशी माहिती मुख्य अधिकारी यांनी समितीस दिली. त्याचप्रमाणे अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरीत रकमेच्या ५% रक्कम राखून ठेऊन खर्च करण्यात येतो असेही मुख्य अधिकाऱ्यांनी सांगितले व अशी रक्कम सन २०१०-११ मध्ये रुपये १८३६३, सन २०११-१२ मध्ये रुपये २५६४३ तर सन २०१२-१३ मध्ये रुपये ७०२२२ इतकी तरतूद करुन महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांवर खर्च केली आहे. सदरची रक्कम समितीच्या मते फारच अल्प असून मालवण नगरपरिषदेने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० च्या शासन निर्णयामध्ये एकूण १५ बाबी नमूद केलेल्या आहेत. त्या बाबींवर खर्च करणे अशक्य आहे. या प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता मुख्य अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या अगदी विरुध्द माहिती समितीला देण्यात आली यामध्ये सन २०११-१२ मध्ये एकूण रुपये ६ कोटी ६५ लक्ष रुपयांचा अर्थसंकल्प असून महसुली खर्च वजा जाता शिल्लक २ कोटी ६३ लाख होती आणि त्याच्या उत्पन्नाच्या ५% म्हणजे १३.६५ लक्ष रुपये होतात. त्यापैकी ११.५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. तसेच सन २०१०-११ मध्ये बांधील खर्च वजा

जाता शिल्लक १ कोटी ९२ लक्ष रुपये होती. सदर रक्कम ५% म्हणजेच ९ लक्ष ६० हजार रुपयांची तरतूद करणे आवश्यक असताना फक्त ८ लक्ष २५ हजार रुपये खर्च करण्यात आले.

मुख्य अधिकारी व विभागीय सचिव यांनी दिलेल्या माहितीत प्रचंड तफावत आहे. मुख्य अधिकारी यांनी समितीची पूर्णपणे दिशाभूल केलेली आहे. त्यांनी अर्थसंकल्पाची काहीही तपासणी न करता, विविध शासन निर्णयाचे अवलोकन न करता समितीला माहिती दिल्यामुळे समितीची दिशाभूल केली असल्याने समिती अत्यंत खेद व्यक्त करते कारण या दर्जाच्या माहितीमुळे समितीला कोणत्याही निष्कर्षा पर्यंत जाता आले नाही. शासन निर्णयाप्रमाणे एकूण तरतुदीच्या ५% रक्कम इतकी तरतूद करुनही ती पूर्णपणे खर्च न होणे हा शासन निर्णयाचा अवमानच आहे व संबंधित अधिकारी, कर्मचारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहेत असे समितीला वाटते. म्हणून या प्रकरणी नगरपरिषदेच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन समितीला भेटीच्या वेळी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती का दिली या प्रकरणी सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी व अशा प्रकारे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत पाठविण्यात यावा तसेच या पुढील कालावधीत एकूण अर्थसंकल्पापैकी बांधील खर्च वजा जाता ५% रक्कम महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी प्रत्येक वर्षी राखून ठेवण्यात यावा व त्या रकमेमधून महिलांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी.

२.२ मालवण नगरपरिषदेतील रिक्त पदांबाबत :---

नगरपरिषदेतील वर्ग-१ ते वर्ग-४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पदसंख्या किती आहे. सदरच्या मंजूर पदांपैकी महिला कर्मचाऱ्यांकरिता राखीव असलेली ३०% पदे आरक्षणानुसार भरली आहेत का? तसेच रिक्त पदे भरण्यासंदर्भात नगर परिषदेने कोणती कार्यवाही केली या संदर्भात समितीने विचारणा केली असता मुख्य अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, मालवण नगरपरिषदेने पाठविलेल्या माहितीत नगर परिषदेत १ अधिकारी, ४९ कर्मचारी व १० महिला कार्यरत असल्याचे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ रोजी तांत्रिक व अतांत्रिक अशी एकूण मंजूर पदे पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहेत.---

अ.क्र.	वर्ग	तांत्रिक अधिकारी	अतांत्रिक अधिकारी	तांत्रिक कर्मचारी	अतांत्रिक कर्मचारी	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१.	०१	. .	. .	. .	. .	. .
२.	०२	. .	१	. .	. .	०१
३.	०३	. .	. .	८	१३	२१
४.	०४	. .	. .	४	२६	३०
			१	१२	३९	५२

सन २०१२-१३ पर्यंत भरणेत आलेली पदे

अ.क्र.	वर्ग	तांत्रिक अधिकारी	अतांत्रिक अधिकारी	तांत्रिक कर्मचारी	अतांत्रिक कर्मचारी	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१.	०३	-	-	०२	०७	०९
२.	०४	-	-	-	२६	२६
				०२	३३	३५

वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे या आस्थापनेवर मंजूर नाहीत तसेच लिपिक संवर्गात महिलांकरिता २ पदे आरक्षित ठेवण्यात आली असून शिपाई या पदात १ पद आरक्षित ठेवण्यात आलेले आहे. वर्ग-३ मधील पद भरतीसाठी जिल्हा निवड समिती व जिल्हा सेवायोजन कार्यालयाकडे मागणीपत्र पाठविण्यात येते व त्यानुसार जिल्हा निवड

समितीमार्फत उमेदवाराची निवड केली जाते. वर्ग-४ मधील पदभरती नगरपालिका स्तरावर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच जिल्हा सेवायोजन कार्यालयाकडून यादी मागवून शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवाराची निवड केली जाते. सन २०१२-१३ या वर्षामध्ये नगरपरिषद आस्थापनेवर पदभरती करण्यात आलेली नाही. नगरपरिषदेकडे वर्ग-३ मध्ये अखेरची भरती सन १९९८ मध्ये करण्यात आली. तसेच वर्ग-४ मध्ये अखेरची भरती १९९५ मध्ये करण्यात आली. महिला उमेदवारांकरिता राखीव ठेवण्यात आलेल्या संवर्गात पदे रिक्त नाहीत. मागील ३ वर्षांत भरती करण्यात आलेली नाही. नगर परिषदेने स्वतंत्र सेवाप्रवेश नियमावली तयार केलेली नसून शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयानुसार पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येते. त्याचप्रमाणे महिला उमेदवारांमध्ये पद भरतीसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. परंतु सरळ सेवा भरतीसाठी १०० बिंदू नामावली ठेवण्यात आली असून, त्यानुसार पदभरती करण्यात येते व पद भरतीच्या वेळी समांतर आरक्षणानुसार महिला उमेदवाराची मागणी केली जाते.

भेटीच्या वेळी समितीला असे सांगितले की, दिनांक २० डिसेंबर, २००५ रोजी आकृतीबंध मंजूर करण्यात येऊन यामध्ये सहायक कार्यालय निरिक्षक, सहायक कर निरीक्षक, सहायक लेखापाल, सहायक लेखापरीक्षक, कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक, कनिष्ठ पाणीपुरवठा जलनि:सारण व स्वच्छता, पर्यवेक्षकाची पदे आहेत. दिनांक २८ जून, २०१० मध्ये अग्निशमन दलासाठी राज्य संवर्गातील सहायक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षकाचे एक पद मंजूर आहे व वाहन चालक, फायरमनचे एक पद आहे. शासनाने दोन महिन्यांपूर्वी कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षकाचे पद भरलेले आहे. वरिष्ठ लिपिकाची दोन पदे असून ती अंतर्गत पदोन्नतीने भरली जाणार आहेत. शासन निर्णयानुसार महिलांकरिता राखीव असलेली ३०%पदांची माहिती संकलित केलेली असून लिपिकाची सात पदे असून दोन पदे महिलांकरिता आहेत. यापैकी एक पद भरलेले असून एक पद रिक्त आहे. वर्ग-४ मध्ये शिपायाची ५ पदे आहेत. यापैकी एक आरक्षण येते. परंतु पद रिक्त नसल्यामुळे महिलांचे पद भरता आले नाही. यामध्ये शिपायाची पाचही पदे पुरुष संवर्गातून भरलेली आहेत. सध्या १० महिला कार्यरत

असून त्यामध्ये स्वीपरमध्ये ५, वर्ग ३ मध्ये ३ व वर्ग ४ मध्ये २ महिला कार्यरत आहेत. समितीने १०० बिंदू नामावली नोंदवही मुख्य विभागीय आयुक्त, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून दिनांक ११-८-२००९ रोजी तपासलेली असून यामध्ये शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९७-६२-प्र.क्र.-९७-१६, दिनांक १८-१०-१९९७ च्या टक्केवारीनुसार आरक्षण काढले आहे. एकूण मंजूर पदे सात असल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाचे पत्र दिनांक १९-५-२००३ प्रमाणे कार्यवाही करावी. त्यानुसार वि.जा.भ.ज. प्रवर्गात एका पदाचा अनुशेष शिल्लक आहे. रिक्त पदे भरताना अनुशेष प्राधान्याने भरण्यात यावा. आरक्षण ५२% पेक्षा जास्त असूनही इ.मा.व. प्रवर्गामध्ये आरक्षण नसतानादेखील आठ पदे अतिरिक्त भरलेली आहेत. या आठ पदांच्या संदर्भात नगर परिषदेने अतिरिक्त पदे भरली असल्यामुळे याबाबत आपले म्हणणे काय आहे ? अशी विचारणा केली असता, जकातीचे काम सुरू असल्यामुळे सदरची पदे भरण्यात आली होती. सदरची जकात सुरू होती परंतु जकात रद्द झाल्यानंतर काही कर्मचारी अतिरिक्त ठरले होते. अतिरिक्त पदे भरण्यात आलेली नाहीत. सहायक आयुक्त (मावक), कोकण विभाग यांनी अतिरिक्त पदे भरल्याबाबतचा खुलासा करण्यात यावा असा शेरा नमूद करुनही नगरपरिषदेने उक्त माहिती समितीला सहाय्यक आयुक्त यांना पाठविली नसल्याचे दिसून येते तसेच समितीने भेटीच्या वेळी सांगूनही सदरची माहितीदेखील पाठविलेली नाही. त्याचप्रमाणे सचिवांच्या साक्षीच्या वेळीदेखील याबाबतची माहिती समितीला प्राप्त झालेली नाही.

अभिप्राय व शिफारशी :---

समितीने मालवण नगरपरिषदेला भेट दिली असता, मालवण नगर परिषदेमध्ये एकूण किती पदे आहेत त्या एकूण पदांपैकी शासन निर्णयानुसार महिलांची ३०% पदे भरली आहेत किंवा कसे तसेच किती पदे रिक्त आहेत इत्यादीबाबत मुख्य अधिकारी यांच्याकडून समितीला समाधानकारक माहिती प्राप्त झाली नाही. जी पदे भरली होती त्या पदांवर शासन निर्णयानुसार ३०% आरक्षण असल्याचेदेखील समितीला आढळून आले नाही. वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे मालवण नगर परिषदेत मंजूर नाहीत, स्वतंत्र सेवा प्रवेश नियमावली नाही, रोस्टर बिंदू नमूद करणारी नोंदवही

नाही, लिपीकांच्या ७ पदांपैकी फक्त एकच पद महिलांचे भरलेले आहे, **संपूर्ण नगर परिषदेत केवळ १० महिला कार्यरत आहेत ही बाब फारच उदासीनता दर्शविणारी आहे. त्यामुळे समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करुन यापुढील काळात मालवण नगरपरिषदेने महिलांचा असलेला अनुशेष त्वरेने भरुन शासन निणयाचे पालन करावे तसेच मालवण नगर परिषदेत महिलांकरिता ३०% जागा राखीव न ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द नियमानुसार कठोर कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी.**

प्रकरण ३

कोल्हापूर, जिल्हापरिषद

३.१ कोल्हापूर, जिल्हापरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :-

सन २००९-१० ते २०११-१२ च्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने दिनांक ९ जानेवारी, २०१४ महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हापरिषद, कोल्हापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली.

कोल्हापूर, जिल्हापरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत तसेच महिला उमेदवारासाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी कोणती कार्यपद्धती अवलंबली जाते ? अशी विचारणा करण्यात आली.

उपरोक्त प्रकरणी कोल्हापूर, जिल्हापरिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :---

कोल्हापूर, जिल्हापरिषदेतील वर्ग-१ व वर्ग-२ ची अधिकाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात आली होती. सदर मंजूर पदांपैकी वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदांच्या भरतीच्यावेळी रिक्त असणाऱ्या पदसंख्येच्या ३०% प्रमाणात महिलांची पदे भरण्यात येतात. सदर राखीव पदावर गुणवत्तेनुसार पात्र महिला उमेदवारांची निवड करण्यात येते. महिला पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास समांतर आरक्षण असल्यामुळे ते व्यपगत होते. त्यामुळे पदे रिक्त राहण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. वर्ग-३ मधील पर्यवेक्षिका, आरोग्य सहाय्यक महिला व आरोग्य सेविका यांची पदे १००% महिलांसाठी आरक्षित आहेत. वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये सन २०१०-११ अखेर १०३७ पदांवर महिलांची नियुक्ती करण्यात आली आहे. वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांची पदे जिल्हा निवड समितीमार्फत भरली जातात व वर्ग-४ कर्मचाऱ्यांची पदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निवड समितीमार्फत भरली जातात. शिक्षकांची पदे भरताना महिलांसाठी ३०% जागा आरक्षित ठेवल्या असून बढतीमध्ये महिला आरक्षित कोठा ठेवण्यात येत नाही यासाठी सेवा शर्ती व नियमावलीमध्ये बदल करण्यात आलेला नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :--

समितीने कोल्हापूर जिल्हापरिषदेला दिनांक ९ जानेवारी, २०१४ रोजी भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेमध्ये वर्ग ३ ची एकूण ७२९ पदे मंजूर असून ६४९ पदे भरलेली आहेत उर्वरित ८० पदे रिक्त असून त्यापैकी किती पदे महिलांसाठी होती ? कक्ष अधिकाऱ्यांची २० पदे मंजूर असून त्यापैकी १९ पदे भरलेली आहेत त्यापैकी किती पदे महिलांची आहेत ? या समितीच्या प्रश्नावर सरळसेवेद्वारे पदे भरण्यात येतात. त्यामध्ये महिलांसाठी ३०% पदे आरक्षित ठेवलेली आहेत. परंतु कक्ष अधिकारी हे पद पदोन्नतीद्वारे भरण्यात येते. असा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांनी खुलासा केला नंतर सन २०११-१२ मध्ये कनिष्ठ सहाय्यक या प्रवर्गाची ३७७ पदे मंजूर होती. त्यापैकी ४० पदे रिक्त होती. त्यावेळी प्रत्यक्षात ४३ महिला कनिष्ठ सहाय्यक कार्यरत होत्या. माहे डिसेंबर, २०१२ पासून ५५ महिला या पदावर कार्यरत आहेत. कनिष्ठ सहायक पदांवर ५५ महिला भरल्या असून आता फक्त महिलांची ७ पदे रिक्त आहेत. शासनाने गत तीन वर्षांपासून नोकर भरतीवर बंदी घातली होती. गत वर्षी ३०% प्रमाणे भरती सुरु केलेली आहे. यावर्षी सचिव समिती स्तरावर परवानगी मिळाली असून लवकरच परिचरांची पदे भरण्यात येतील. वैद्यकीय अधिकारी ही पदे राज्य शासनाच्या अखत्यारीत येतात. छायाचित्रकाराचे एकच पद मंजूर असून ते भरलेले आहे. असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांनी समितीस अवगत केले.

ग्रामविकास अधिकारी संवर्गात ३०% आरक्षणाप्रमाणे महिलांच्या भरतीबाबत समितीस माहिती देताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांनी १३३ महिला ग्रामसेवक अधिकारी भरलेल्या आहेत. वाहन चालक पदावर महिला भरण्यासाठी आम्ही विचार करु. असे समितीस सांगितले पुढे प्रशिक्षणामधील कार्यक्रमामध्ये महिलांना वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्यासंबंधीची बाब समाविष्ट करण्यात येईल. गटविकास अधिकारी आणि गट शिक्षणाधिकारी या वर्गवारीत महिला फार कमी प्रमाणात नियुक्त होतात. आरोग्य सहायक (महिला) या पदांसाठी वारंवार वर्तमानपत्रात जाहिरात दिली, परंतु पात्र उमेदवार मिळाले नाहीत. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले.

समितीने महिला अधिकाऱ्यांची संख्या खूप कमी असून गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), समाजकल्याण अधिकारी या पदांमध्ये एकच महिलांचे पद भरलेले दिसून येत आहे याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वर्ग-१ मध्ये ७ महिला अधिकारी असून एकूण २७ पदे आहेत. त्यापैकी २२ पदे भरलेली आहेत. या २२ पदांपैकी ७ पदांवर महिला कार्यरत आहेत. वर्ग-१ आणि वर्ग-२ ची पदे राज्य शासनाकडून भरली जातात. कोल्हापूर जिल्ह्यात अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये बरीच पदे रिक्त आहेत. गडहिंग्लज तालुक्यात १०० खाटांचे रुग्णालय आहे. अशा ठिकाणी जेथे लोड कमी आहे तेथील डॉक्टर मंडळी भेट देत असतात. तेथे पिण्याचे पाणी मिळण्याची अडचण होती ती जिल्हा परिषदेने दूर केली आहे. तेथे असलेल्या विहिरीतील गाळ काढला आणि पाणी पुरवठा सुरळीत झाला. वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत संचालक, आरोग्य संचालनालय, मुंबई यांचेशी पत्रव्यवहार सुरू आहे असा समितीस खुलासा केला.

समितीने औषध निर्माण अधिकाऱ्यांची एकूण ८८ पदे मंजूर असून ८५ पदे भरलेली आहेत आणि ३ पदे रिक्त आहेत यात एकाही पदावर महिला नाहीत याबाबत विचारलेल्या प्रश्नावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी 'औषध निर्माण अधिकारी' या पदावर पात्र महिला मिळाल्या नाहीत. सरळसेवेचे आरक्षण असून समांतर आरक्षण पध्दतीने पदे भरली आहेत. सन २००८-२००९ मध्ये 'औषध निर्माता' पदाची जाहिरात दिलेली असून पुढारी, सकाळ, तरुण भारत आणि लोकमत या वर्तमानपत्रामध्ये जाहिराती दिल्या जातात. 'औषध निर्माता' या ८८ पदांपैकी १२ पदे महिलांची भरलेली आहेत असा खुलासा केला.

विस्तार अधिकारी (कृषि) या पदावरील महिलांची संख्या, समांतर आरक्षणामुळे नियमित पदांवर होणारा परिणाम, जिल्हा परिषदेमध्ये सेवा भरतीचे नियम याबाबत समितीस माहिती देताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहे डिसेंबर, २०१३ अखेर १४०७५ पदे मंजूर असून यापैकी १३४९७ पदे भरली आहेत. या सर्व पदांमध्ये ३९७४ पदांवर महिला कार्यरत आहेत. याचे प्रमाण म्हणजेच ३९.४४% पर्यंत ही टक्केवारी गेलेली आहे. विस्तार अधिकारी (कृषि) या पदावर ५ महिला आहेत. सन १९८९

पासून सन २०१३-१४ पर्यंत २४८ महिला पदांसाठी जाहिरात दिली होती. त्यावेळी ३४७ महिला उमेदवारांची निवड झाली होती. खुल्या संवर्गातील जागा महिला उमेदवारातून भरलेल्या आहेत. राखीव प्रवर्ग व महिला प्रवर्गातील उमेदवार मिळत नाहीत. परंतु शिक्षण सेवक पदासाठी अपेक्षेपेक्षा जास्त उमेदवार मिळाले आहेत. पण कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदासाठी महिला उमेदवार उपलब्ध झाले नाहीत. भरतीच्या वेळी जिल्हा परिषदेमध्ये शासनाच्या नियमांचा अवलंब केला जातो. जिल्हा परिषदेची वेगळी नियमावली नाही. सामान्य प्रशासन विभागाचे नियम भरतीसाठी अवलंबिले जातात. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार भरतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे. त्यामुळे महिला कर्मचारी, अधिकारी यांच्या भरती सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी जिल्हा परिषदेने विशेष कक्षाची स्थापना केलेली नाही. असा खुलासा भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीसमोर केला.

समितीने साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्यांची माहिती मागविली.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ?

समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांबाबत खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.---

वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येते. वैद्यकीय अधिकारी यांची एकूण १६७ पदे मंजूर असून ११८ पदे भरलेली आहेत. तसेच त्यापैकी महिला अधिकारी एकूण ३८ इतक्या आहेत.

उपरोक्त मुद्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती पुरविली.---

वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येत आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :---

कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सन २०११-२०१२ व सन २०१३-२०१४ या कालावधीत वर्ग-१ ते वर्ग-४ ची अनेक पदे रिक्त होती. सदर रिक्त पदांची सद्य:स्थिती, वर्ग-३ व वर्ग-४ मधील रिक्त पदे भरण्याबाबतची जिल्हा परिषदेने करावयाची कार्यवाही व त्याचा कालावधी याबाबत समितीस माहिती देताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ३१ जुलै, २०१५ अखेर वर्ग-१ व वर्ग-२ ची ३०७ पदे मंजूर असून २०४ पदे भरण्यात आली आहेत व १०३ पदे रिक्त आहेत. सदरची पदे शासन स्तरावरून भरण्यात येत असतात. तसेच, वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे आरोग्य विभागाकडून भरली जाणे अपेक्षित आहे. पशुसंवर्धन विभागाच्या डॉक्टरांची देखील कमतरता आहे व या बाबतीत वारंवार शासनाला कळविण्यात आले आहे. सदरची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यामध्ये निर्माण होणाऱ्या अडचणी याबाबत माहिती देताना संचालक, आरोग्य संचालनालय यांनी राज्यात मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे. संपूर्ण राज्याचा विचार केला तर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मंजूर ७९०० पदांपैकी ६९२२ पदे भरली असून सध्या ९७८ पदे रिक्त आहेत. राज्यात विशेषज्ञ डॉक्टरांच्या एकूण पदांपैकी ५०% पदे रिक्त आहेत. ही सर्व पदे भरण्याच्या दृष्टिकोनातून शासन स्तरावर काही पावले उचलण्यात आली आहेत. ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून काढण्यात आली असून ती आता आरोग्य संचालनालयामार्फत भरण्यास शासनाने परवानगी दिली आहे अशी समितीस माहिती दिली.

प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर उपलब्ध करून देण्याची गरज व या दृष्टीने विभागाने केले प्रयत्न व त्यानुसार शासनाने डॉक्टरांचे वेतन वाढविण्याची शासनाची भूमिका स्पष्ट करताना संचालक, आरोग्य संचालनालय यांनी गत महिन्यात भरती

प्रक्रिया पूर्ण झाली असून १२०० डॉक्टर उपलब्ध झाले आहेत. ही वस्तुस्थिती आहे की, यापूर्वी केलेल्या प्रयत्नांमध्ये डॉक्टरांकडून फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. परंतु, आता असा प्रतिसाद मिळू लागला आहे. या महिन्यात एक जाहिरात देण्यात आली होती. त्यासाठी ५२५ अर्ज प्राप्त झाले आहेत. सध्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एकत्रित वेतन सुमारे ६०,०००/- एवढे आहे. शासनाने वैद्यकीय अधिकाऱ्यांना इन्सेंटिव्ह देखील देऊ केला आहे. त्याचप्रमाणे आता आपण भरतीची प्रक्रिया अधिक आकर्षक केली आहे. एका हॉलमध्ये सर्व पात्र उमेदवारांना आमंत्रित करण्यात येते व त्या ठिकाणी राज्यातील सर्व रिक्त जागा दर्शविल्या जातात, उमेदवारांनी आपल्या अपेक्षेनुसार रिक्त जागा निवडावयाची असते आणि शासन त्याच ठिकाणी त्यांना नोकरीची ऑर्डर देते. म्हणजे उमेदवार आपल्या सोयीची पोस्टिंग निवडू शकतात. आता सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मुलाखत ठेवण्यात आली आहे. एकूण ५४६ विशेषज्ज्ञ डॉक्टरांनी फॉर्म भरलेला आहे. त्यामधून किमान ३०० ते ३५० डॉक्टर उपलब्ध होतील, अशी शासनाची अपेक्षा आहे. तथापि, कोल्हापूर सारख्या डोंगराळ भागात डॉक्टर उपलब्ध नाहीत. त्या ठिकाणी प्राथम्याने डॉक्टर उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे अशी साक्षीच्या शेवटी समितीसमोर भूमिका स्पष्ट केली.

अभिप्राय व शिफारशी :---

कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये एकूण ७२९ मंजूर पदांपैकी ६४९ पदे भरलेली असून ८० पदे रिक्त आहेत. सदरची पदे सरळ सेवेद्वारे भरली जात असून शासन निर्णयानुसार महिलांकरिता ३०% आरक्षीत पदे ठेवली जातात व त्याप्रमाणे भरलीदेखील जातात. शासनाने गत ३ वर्षांपासून नोकर भरतीवर बंदी घातली असून गतवर्षी ३०% प्रमाणे भरती सुरू केलेली आहे. १३३ महिला ग्रामसेवकांची नियुक्ती केलेली आहे. औषध निर्माण पदांच्या ८८ जागांपैकी १२ जागा ह्या महिलांमधून भरलेल्या आहेत. वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे शासन स्तरावरुन भरली जात असल्याने सदरची पदे भरण्यासंदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून त्याचा पाठपुरावा सुरू आहे. त्याचप्रमाणे एकूण १४०७५ पदे मंजूर असून त्यापैकी १३४९७ इतकी पदे भरलेली

असून त्यापैकी ३९७४ इतकी पदे महिलांची असून त्याचे प्रमाण ३९.४४% इतके येते व शासन निर्णयात नमूद केलेल्या ३०% पेक्षा सदरचे प्रमाण जास्त आहे असे समितीला दिसून आले. यात शिक्षण सेवक व आरोग्य सेविकांचा समावेश आहे. राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकूण मंजूर ७९०० पदांपैकी ६९२२ पदे भरली असून सध्या ९७८ पदे रिक्त असल्याचे समितीला सांगण्यात आले आहे. सदरची पदे तसेच इतर वर्ग-१ व वर्ग-२ ची एकूण १०३ रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासन स्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे समितीला विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सांगण्यात आले आहे. मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्यामुळे सदरची पदे त्वरीत भरण्यासंदर्भात संबंधित विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून माहिती घेत असताना या जिल्हा परिषदेत महिलांची पद भरतीची संख्या ही ३९.४४% इतकी आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करीत असून जिल्हा परिषद प्रशासनाची प्रशंसा करते. त्याचबरोबर "औषध निर्माण" या पदांच्या मंजूर ८८ पदांपैकी फक्त १२ महिलांची पदे भरली असल्यामुळे या संवर्गातून ३०% पदांचे प्रमाण पाळले गेले नाही. त्यामुळे याबाबत समिती नाराजी व्यक्त करते. तसेच विभागीय सचिवांनी सांगितल्यानुसार जिल्हा परिषदेतील वर्ग-३ व वर्ग-४ ची महिलांकरिता रिक्त असलेली पदे जिल्हा परिषद स्तरावर भरली जात असून त्यात ३०% महिलांचे आरक्षणाच्या धोरणाचे पालन करण्यात यावे व सदरची भरती वेळापत्रकाप्रमाणे करावी. तसेच शासन स्तरावर वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे रिक्त असल्याने तीदेखील तातडीने भरण्यासंदर्भात विभागाने कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असून सदरची सुमारे ९७८ पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करावी कारण ही जनतेच्या आरोग्याच्यादृष्टीने महत्वाची बाब असल्याने मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त ठेवणे उचित नाही. तेव्हा आरोग्य विभागानेदेखील राज्यस्तरावर रिक्त असलेली पदे भरण्याबाबत समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करावी व उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२ महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत :---

गत ३ वर्षांत (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय महिला अधिकारी व कर्मचारी यांचेकडून त्यांचेवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भातील निवेदने जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाली आहेत काय ? असल्यास किती ? तसेच त्यांचे स्वरुप काय आहे ? अन्यायाच्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी विशेष कक्ष निर्माण करण्यात आला आहे काय ? सदर निवेदनाच्या संदर्भात पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे ?

उपरोक्त प्रकरणी कोल्हापूर, जिल्हापरिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :---

महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.मकचौ/२००६/प्रक्र१५/मकक दि.१९ सप्टेंबर, २००६ नुसार जिल्हा स्तरावर महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे तालुकास्तरावर महिला तक्रार निवारण समित्या गठीत करण्याबाबत निदेश दिलेले असून सर्व तालुक्यामध्ये महिला तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे.

सन २००८-०९, २००९-१० व २०१०-११ या कालावधीत जिल्हा स्तरावरील महिला तक्रार निवारण समितीकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. महिलांच्याकडून लैंगिक छळाबद्दल तक्रार आल्यास महिला लैंगिक छळ तक्रार निवारण समितीमार्फत नियमानुसार चौकशी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. त्याचप्रमाणे जिल्हास्तरावर वेळोवेळी याबाबत बैठका घेऊन जिल्ह्यातील त्याचप्रमाणे तालुक्यातील महिलांना व संबधित समितीतील सदस्यांना याबाबत माहिती देण्यात येते किंवा अशा प्रकारची माहिती घेण्यात येते. तक्रार निवारण समितीकडे लैंगिक छळाबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.मकचौ/२००९/प्रक्र१९/मकक दि.४ ऑक्टोबर, २०१० नुसार आखून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येते.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :---

समितीने कोल्हापूर जिल्हापरिषदेला दिनांक ९ जानेवारी, २०१४ रोजी भेट दिली. भेटीच्या वेळी महिलांवरील अत्याच्यारासंदर्भात समितीस माहिती देताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोल्हापूर जिल्ह्यात एक महिन्यापूर्वी विनयभंगाची एक घटना घडली होती. त्या घटनेतील शिक्षकाला एका दिवसात निलंबित केलेले आहे. या जिल्ह्यात मातापालक संघ अस्तित्वात आहे. या संघाची दर महिन्याला बैठक होत असते. तसेच नवचेतना शिबिरामध्ये हा विषय चर्चेसाठी घेण्यात येतो. या कालावधीत महिला कर्मचाऱ्यांकडून ३ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारी तालुका चौकशी अधिकाऱ्यांकडे पाठविल्या आहेत. ३ तक्रारींपैकी २ तक्रारींमध्ये तथ्य आढळलेले नाही. एका तक्रारीबाबत कारवाई करण्यात आली आहे. अशी माहिती दिली.

गत ३ वर्षांत महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अन्यायाच्या संदर्भात जिल्हा परिषदेकडे प्राप्त तक्रारी व त्यांचे स्वरुप याबाबत समितीस अवगत करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिला कर्मचाऱ्यांकडून ३ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. असे समितीस सांगितले त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांनी राधानगरी तालुक्यातील तहसील कार्यालयातील दुय्यम निबंधक यांच्या मुलीस पंचायत समितीचे वाहन चालक वारंवार त्रास देऊन ॲसिड टाकण्याची धमकी देत असल्याची तक्रार जिल्हा परिषदेच्या तक्रार निवारण समितीकडे दि.११-११-२०११ रोजी करण्यात आली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ९-१२-२०११ रोजी सदरची तक्रार चौकशी समितीकडे सुपूर्द केली. चौकशी समितीने दिनांक १५-१२-२०११ रोजी अहवाल सादर केला होता. या अहवालामध्ये सदर प्रकरणी एफआयआर दाखल करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले होते. त्यानंतर समितीने एफआयआर दाखल केलेला आहे.

दुसरी तक्रार पन्हाळा तालुक्यातील विस्तार अधिकाऱ्यांविरुध्द ग्रामसेविकेने केली होती. विस्तार अधिकारी वारंवार फोन करुन मानसिक त्रास देत असल्याचे तक्रारीत नमूद केलेले होते. या तक्रारीबाबत चौकशी समितीने आढावा घेतल्यानंतर तक्रारीत तथ्य आढळले नाही असा चौकशी समितीने अहवाल दिलेला आहे.

तिसरी तक्रार शाहूवाडीतील ५ अध्यापिकांनी केंद्रप्रमुख त्रास देत असल्याची तक्रार केली होती. सदरची तक्रार तालुका स्तरावर वर्ग केली आहे. असा समितीसमोर खुलासा केला.

तक्रार निवारण समितीकडे तक्रार प्राप्त झाल्याचा दिनांक व तक्रारीचे स्वरुप याबाबत समितीस खुलासा करताना विस्तार अधिकारी यांच्याविरुध्द तक्रार करणाऱ्या महिला ग्रामसेवक होत्या. सदरहू अधिकाऱ्याची चौकशी झाली असून अहवाल प्राप्त झालेला आहे. विस्तार अधिकाऱ्यांनी कामासाठी दूरध्वनी केला होता. दिनांक ९/३/२०१२ रोजी महिला ग्रामसेवकांनी विस्तार अधिकाऱ्याविरुध्द तक्रार केली होती. विस्तार अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी होऊन दिनांक २०-३-२०१२ रोजी बीडीओना अहवाल प्राप्त झाला. त्यानंतर दिनांक २३-३-२०१२ रोजी विस्तार अधिकाऱ्यांना निलंबित केले. दिनांक ४-४-२०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सुनावणी झाली आणि दिनांक १३-४-२०१२ रोजी अहवाल दिला गेला. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी महिला जिल्हा आरोग्य अधिकारी यांची नेमणूक केली होती. याबाबत महिलांमध्ये जागृती निर्माण करण्याची गरज आहे. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अवगत केले. किशोरी योजना महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यात राबविली आहे. किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन करण्यासाठी तालुकानिहाय महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांना बोलावून प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण देणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील महिला अधिकारी होत्या. या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) यांच्या खुलाशानंतर जिल्हा परिषदेमार्फत 'हिरकणी' कक्षाची स्थापना करण्यात आली आहे अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली.

विभागीय सचिवांची साक्ष :---

कोल्हापूर जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस जिल्हा परिषदेकडील विशाखा समिती असल्याप्रकरणी तसेच दोषींना निलंबित करण्याबाबत समितीस माहिती देताना मुख्य कार्यकारी

अधिकारी यांनी जिल्हा व तालुका स्तरावर विशाखा समिती असून श्री. महाले यांच्याविरुध्दच्या तक्रारीची तालुका समितीकडे ८ दिवसांत चौकशी झाली होती. ती लैंगिक छळाबाबतची तक्रार नव्हती. जोराने बोलले वगैरे अशा आशयाची ती तक्रार होती. त्यांना आता परत कामावर घेतले आहे असे समितीस सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :---

कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मकचौ/२००६/प्र.क्र.१५/मकक, दि.१९ सप्टेंबर, २००६ नुसार जिल्हा स्तरावर महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेली असून प्रत्येक तालुका स्तरावरदेखील महिला तक्रार समित्या गठीत करण्याबाबत निदेश दिलेले असून या जिल्हा परिषदेतील सर्व तालुक्यांमध्ये तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सन २००८ ते २०११ या कालावधीत जिल्हा स्तरावरील महिला तक्रार निवारण समितीकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. महिलांच्याकडून लैंगिक छळाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास महिला लैंगिक छळ तक्रार समितीमार्फत नियमानुसार चौकशी करण्याबाबत कारवाई करण्यात येते. त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर वेळोवेळी याबाबत बैठका घेऊन जिल्ह्यातील त्याचप्रमाणे तालुक्यातील महिलांना व संबंधित समितीतील सदस्यांना याबाबत माहिती देण्यात येते. त्याचप्रमाणे लैंगिक छळाबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.मकचौ/२००९/प्र.क्र.१९/मकक दिनांक ४ ऑक्टोबर, २०१० नुसार आखून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येते. जिल्हा परिषदेकडे लैंगिक छळाच्या एकूण ३ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी २ तक्रारींमध्ये तथ्य आढळले नाही व एका तक्रारीवर नियमानुसार कार्यवाही केली आहे. तसेच एका प्रकरणात तहसील कार्यालयातील दुय्यम निबंधक यांच्या मुलीला पंचायती राज समितीचा वाहन चालक वारंवार त्रास देऊन ॲसिड टाकण्याची धमकी देत असल्याची तक्रार जिल्हा परिषदेच्या तक्रार निवारण समितीकडे दिनांक ११.११.२०११ रोजी करण्यात आली होती. सदरची तक्रार चौकशी समितीकडे सुपूर्द केल्यानंतर चौकशी समितीने दिनांक १५-१२-२०११ रोजी अहवाल सादर

केला आणि सदर अहवालामध्ये या प्रकरणी एफआयआर दाखल करण्याची शिफारस समितीने केल्यानुसार तद्नुषंगाने एफआयआर दाखल करण्यात आला. तसेच तक्रारीत तथ्य आढळले नसल्याचा अहवाल समितीने दिला आहे. त्याचप्रमाणे तिसऱ्या तक्रारीत ५ अध्यापिकांनी केंद्रप्रमुख त्रास देत असल्याची तक्रार केली होती. सदरची तक्रार तालुका स्तरावर वारंवार वर्ग केली आहे. कोल्हापूर जिल्हा परिषदेतील जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर शासन निर्णयानुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने विशाखा विरुध्द राजस्थान सरकार व इतर या प्रकरणात दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने महिला तक्रार निवारण केंद्राची स्थापना करून जी तत्परता दाखविली आहे., त्या तत्परतेबद्दल व प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने कारवाई केल्याबद्दल समिती जिल्हा परिषदेच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे अभिनंदन करते व त्यांनी महिलांच्या लैंगिक छळाच्या संदर्भात जी समयसूचकता व तत्परता दाखविली याबाबतदेखील समिती त्यांचे अभिनंदन करते. एका प्रकरणात सविस्तर तक्रारीत चौकशी केल्यानंतर त्या तक्रारीत तथ्य आढळले नाही, असेदेखील समितीसमोर आढळून आले आहे. अशा प्रकरणात बारकाईने लक्ष घालण्याची गरज आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते कारण गुन्हेगाराला शासन निर्णयान्वये किंवा कायद्याद्वारे शिक्षा होणे हे आवश्यकच आहे. **तथापि, निरपराध व्यक्तीला दोषी ठरवून त्यांच्यावर कारवाई करणे हेदेखील विचारात घेणे महत्त्वाचे आहे. निरपराध व्यक्तीवर कोणत्याही प्रकारची कारवाई होऊ नये म्हणून अशा तक्रारी आल्यास त्या बारकाईने तपासण्याबाबत तक्रार निवारण समितीने दक्ष असणे आवश्यक आहे. तसेच या समितीमध्ये अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधीत्त्व देत असताना त्यात प्रमुख अधिकाऱ्यांची किंवा कर्मचाऱ्यांची कर्तव्य पारायणता, त्यांची संस्थेप्रती आसक्ती, सचोटी इत्यादी बाबींची तपासणी करून त्यांचे पुरेसे प्रतिनिधीत्त्व या समितीच्या रचनेत करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या समितीत जास्तीत जास्त जातीय प्रवर्गाचा व मागासवर्गीय व्यक्तींचा तसेच पुरुष कर्मचाऱ्यांचा कसा समावेश करता येईल याचादेखील समावेश करणे आवश्यक वाटते व तद्नुषंगाने शासनाने या संबंधात पुन्हा नव्याने कोणाकोणाचा समावेश करावा याबाबत सविस्तर परिपत्रक काढून राज्यातील सर्व संबंधितांना त्याद्वारे कळवावे अशी समितीची शिफारस आहे.**

३.३ महिलांसाठी राबविण्यात आलेल्या वित्तीय कल्याणकारी योजना :---

महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजना/उपक्रम, मातापालक योजना व त्यासाठी गत ३ वर्षात वर्षनिहाय केलेल्या रक्कमेची तरतूद, वैयक्तिक व सामूहिक विकासांच्या योजना, इंदिरा आवास घरकुल योजनेची सद्य:स्थिती या योजनेंतर्गत मागणीनुसार मंजूर करण्यात आलेली घरकुले, आर्थिकदृष्ट्या मागास महिला उद्योजकांसाठी उद्योगधंदे उभारण्याकरिता द्यावयाच्या विशेष सोयीसवलती या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी असलेली स्वतंत्र योजना, महिलांकरिता समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले असल्यास त्याची कार्यपद्धती, जिल्हामध्ये महिलांचे स्थापन झालेले एकूण बचत गट तसेच त्यातील बचत गटांना लघुउद्योग स्थापन करण्यासाठी द्यावयाच्या मंजुरीबाबत विचारणा करण्यात आली.

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :---

समितीच्या कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून महिलांकरिता राबविण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजनां संदर्भात खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

दिनांक १० मार्च, २०११ च्या शासन निर्णयातील १५ मान्य योजनांमधून महिला व बालकल्याण समितीने निवडलेल्या योजना राबवून योजनेवरील तरतूद त्या त्या वर्षात खर्च करण्याची कार्यवाही सदर विभागामार्फत केली जाते. समाजकल्याण विभागाकडून महिलांना सक्षम करण्याकरिता इयत्ता ५ ते ७ वी मध्ये व इयत्ता ८ ते १० मध्ये शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता खालील योजना राबविण्यात आलेल्या आहेत.

(१) लांबपल्ल्याच्या अंतरावर इयत्ता ५ ते ९ तील शाळेत जाणाऱ्या मुलींना लेडीज सायकल पुरविणे.

(२) सर्वसाधारण व मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगार शिवणयंत्र पुरविणे.

(३) महिलांना स्वयंरोजगारासाठी पिठाची गिरण पुरविणे.

(४) महिलांना स्वयंरोजगारासाठी शेवया मशिन पुरविणे.

(५) इयत्ता १० व १२ उत्तीर्ण मुलींना संगणक प्रशिक्षण देणे.

आर्थिकदृष्ट्या मागास महिला उद्योजकांसाठी शिवणयंत्र पुरविणे, छोटा उद्योग सूरू करण्यासाठी अर्थसहाय्य इ. योजना राबविण्यात आल्या आहेत. महिलांना स्वयं-रोजगारासाठी प्रशिक्षण देणे. त्यांना प्रोत्साहित करणे तसेच गरजू महिलांना लाभार्थीपर्यंत योजनेची माहिती व लाभ पोचविणे.

महिलांकरिता समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले आहे. ६ तालुक्याच्या ठिकाणी व १ जिल्हा कक्षामध्ये अशी एकूण ७ समुपदेशन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. त्यात २ समुपदेशक व १ विधी सल्लागार नेमण्यात आले असून पिडीत महिलांना समुपदेशक व कायदेशीर सल्ला देण्यात येतो.

महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद यांच्या उत्पन्नातून राबविण्यात आलेल्या योजनाची माहिती खालीलप्रमाणे आहे. **(रु. लाखात)**

अ.क्र	योजनेचे नाव	सन २००९-२०१०		सन २०१०-२०११		सन **२०११-२०१२**	
		तरतूद	खर्च	तरतूद	खर्च	तरतूद	खर्च
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**	**(५)**	**(६)**	**(७)**	**(८)**
(१)	इ. ५वी ते ९वीत शिकणाऱ्या मुलींना सायकल पुरविणे	१५.००	१५.००	१८.००	१७.८१	६.००	५.९८
(२)	हेल्पलाईन/महिला समुपदेशन कक्षांस अर्थसहाय्य	१.८८	१.८८	३.४८	३.४८	३.४८	३.४८
(३)	ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील / अपंग महिलांना स्वयंरोजगारासाठी पिठाची गिरण पुरविणे.	०.००	०.००	०.००	०.००	११.१६	११.१२
(४)	ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील / अपंग महिलांना स्वयरोजगारासाठी शेवया मशिन पुरविणे.	०.००	०.००	०.००	०.००	११.१६	११.००

योजनांची माहिती--चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
(५)	आदर्श अंगणवाडी/बालवाडी सेविकांना ताराराणी पुरस्कार	१.००	०.९७	१.००	०.७२	१.००	१.१९
(६)	मुलींना/महिलांना व्यावसायिक तांत्रिक प्रशिक्षण योजना.	१८.००	१८.००	१६.००	०.००	१०.८३	८.३६
(७)	महिलाशक्ती अभियानांतर्गत मार्गदर्शक केंद्र स्थापन करणे (मेळावे व प्रशिक्षण).	०.००	०.००	०.००	०.००	३.००	०.००
(८)	ग्रामीण भागतील दारिद्र्य रेषेखालील / अपंग महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवण यंत्र पुरविणे.	१३.००	१३.००	०.००	०.००	५.५३	५.५०
(९)	१० वी व १२ वी उत्तीर्ण मुलींना (MSCIT) संगणक प्रशिक्षण अनुदान.	९.००	८.९८	३.००	२.९८	१५.४०	१५.४०
(१०)	जागतिक महिला दिन ८ मार्च साजरा करणे व महिलांना कायदेविषयक / विधिविषयक सल्ला देणे.	०.७०	०.६१	०.६०	०.५३	०.००	०.००
(११)	अंगणवाडीतील ३ ते ६ वयोगटातील मुला-मुलींना तयार गणवेश पुरविणे.	३०.००	२९.०९	२५.००	२३.९६	०.००	०.००
(१२)	महिला प्रतिनिधीची अभ्यास सहल.	०.००	०.००	०.००	०.००	२.००	०.००
	एकूण . .	८८.५८	८७.५३	६७.०८	४९.४८	६९.५६	६२.**०३**

समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद यांच्या उत्पन्नातून सन २००९-१० ते २०११-१२ या कालावधीत राबविण्यात आलेल्या योजनाची माहिती खालीलप्रमाणे आहे. (रु. लाखात)

अ.क्र	योजनेचे नाव	सन २००९-२०१०		सन २०१०-२०११		सन **२०११-२०१२**	
		तरतूद	खर्च	तरतूद	खर्च	तरतूद	खर्च
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**	**(५)**	**(६)**	**(७)**	**(८)**
(१)	पिको फॉल मशिन	२४.९६	२४.९६	२४.००	२३.९८	४५.००	४४.९४
(२)	घरघंटी	. .	. .	२४.१५	२४.०७	. .	. .
(३)	जेवणाची भांडी	१९.९८	१९.९८	. .	. .	. .	. .
	एकूण . .	४४.९४	४४.९४	४८.१५	४८.०५	४५.००	४४.९४

जिल्हामध्ये दारिद्र्य रेषेखालील ७१८७ बचत गट स्थापन झालेले आहेत. त्यापैकी २७८० बचत गटांना खेळते भांडवल म्हणून व १४३३ बचत गटांना मध्य मुदतीचे कर्ज म्हणून त्यांनी निवडलेला लघु उद्योग करण्यासाठी मंजुरी दिली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :---

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिनांक ९ जानेवारी, २०१४ रोजी भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने महिला व बाल कल्याणासाठी जिल्हा परिषदेच्या कोणत्या उत्पन्नातून १०% निधीची तरतूद केली जाते याबाबत केलेल्या प्रश्नास मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सामान्य उपकर, वाढीव उपकर, सापेक्ष अनुदान, मुद्रांक शुल्क, पाणीपुरवठा या सर्व बाबींवर त्या त्या वर्षातील प्राप्त होणाऱ्या रकमेतून दहा टक्के निधी महिला व बाल कल्याणासाठी राखून ठेवला जातो. सन २०१०-२०११ मध्ये १ कोटी ६४ लाख रुपये रक्कम प्राप्त झाली होती. शासनाकडून प्राप्त होणारा निधी बजेटच्या अखेरीस मिळतो. त्यामुळे तो निधी पुढील वर्षात कॅरीफॉर्वर्ड होतो. पण सध्या कोणताही अनुशेष शिल्लक राहिलेला नाही असे विशद केले.

सन २००९-२०१२ मध्ये त्यासाठी १ कोटी १२ लाख ४० हजार रुपयांची तरतूद केली होती आणि खर्चाच्या विगतवारीमध्ये ८८ लाख ८८ हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. ८७.५३ लाख रुपये खर्च दाखविलेला आहे. बजेटमध्ये दाखविलेली रक्कम पूर्ण खर्च न करण्याचे कारणे याबाबत खुलासा करताना सन २००९-१० मध्ये महिला व बाल कल्याण विभागाच्या कल्याणकारी योजनांवर १ कोटी १२ लाख ४० हजार रुपये तरतूद केली होती. या निधीपैकी अंगणवाड्यांसाठी बौध्दिक वैज्ञानिक पेट्यांसाठी १९ लाख ९८ हजार ५२१ रुपये खर्च झाले आहेत. कुपोषित मुलांसाठी अतिरिक्त आहार देण्यासाठी खर्च झालेला आहे. गरोदर मातांना टी.एच.आर.दिला जातो. या जिल्ह्यात १६ प्रकल्प आहेत. या प्रकल्पामध्ये सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना जिल्हा परिषदेच्या कार्यक्रमाच्या वेळी पुरस्कार दिले जातात. कार्यक्रमाच्या दिवशी येणाऱ्या व्याख्यात्यांना मानधन दिले जाते. दिनांक ८ मार्च रोजी झालेल्या कार्यक्रमांची त्यांना माहिती दिली जाते. दिनांक १०.३.२०११ रोजी ग्रामविकास विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्या शासन निर्णयामध्ये जिल्हा परिषदेने सेस फंडातून कोणत्या योजना राबविल्या पाहिजेत याबाबत सूचना केलेल्या आहेत. ५८४ लेडीज सायकली पुरविण्यात आल्या असून त्यासाठी १५ लाख रुपये खर्च आला आहे. लेडीज सायकली खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. लेडीज सायकलींचे पूर्ण वाटप झालेले आहे अशी माहिती समितीस देण्यात आली.

महिलांकरिता समुपदेशन केंद्र सुरु करण्यात आले आहे काय? समुपदेशन केंद्रापर्यंत किती लाभार्थी पोहोचले ? पोलीस स्टेशनमध्ये जे समुपदेशक आहेत, त्यांना १४००० रुपयांपर्यंत मानधन दिले जाते. याप्रमाणे या समुपदेशकांचे मानधन वाढविण्याची गरज आहे. या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यामध्ये जिल्हा स्तरावर एक आणि तालुका स्तरावर सात समुपदेशन केंद्रे आहेत आणि उर्वरित पाच तालुक्यातून समुपदेशन केंद्राचे प्रस्ताव आले नव्हते. त्यानंतर तीन तालुक्यांमधून प्रस्ताव आले असून ते मान्यतेसाठी पाठविले आहेत. ४८० केसेस आल्या होत्या. ग्रामीण भागातील पीडित महिला, गोरगरीब परित्यक्त्या यांना समुपदेशन केले जाते. मुलींना व महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी १८ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. अशी माहिती समितीस देण्यात आली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पोलीस स्टेशनमध्ये समुपदेशन करणाऱ्यांना पूर्वी ८०००/- रुपये मानधन दिले जात होते. आता ते वाढवून १४०००/- रुपये केलेले आहे असे स्पष्ट केले.

विभागीय सचिवांची साक्ष :---

कोल्हापूर जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मातापालक योजनेअंतर्गत प्राथमिक शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या माता यांची शिक्षक व पालक असोसिएशनप्रमाणे एक समिती गठीत करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या बाबतीत मातांचे अधिक लक्ष असते. या दृष्टीने शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि मातांच्या प्रतिनिधी हे दोन महिन्यातून एकदा भेटतात आणि गुणवत्ता वाढ तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि शाळेच्या समस्यांवर चर्चा केली जाते. काही विद्यार्थी अभ्यासात थोडे मागे असतात. अशा विद्यार्थ्यांच्या मातांना विद्यार्थ्याच्या गुणवत्तावाढीसाठी करावयाच्या प्रयत्नांची माहिती दिली जाते. त्याचप्रमाणे मातांच्या काही अडचणी असतील तर त्या शिक्षकांच्या माध्यमातून सोडविल्या जातात.

‘ नवचेतना ’ नावाचा एक उपक्रम शिक्षण विभागाच्या माध्यमातून राबविला जातो. त्यामध्ये गट शिक्षण अधिकारी, केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी यांना तीन दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणामध्ये गुणवत्ता वाढ, ई-लर्निंग, संगणक अशा विविध विषयांचा समावेश असतो. खाजगी शाळांच्या स्पर्धेत आपल्या शाळा उत्तम ठरल्या पाहिजेत, या दृष्टीने हा उपक्रम राबविला जातो. आतापर्यंत २०० ते २५० लोकांना प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांनीच खालच्या स्तरावर प्रशिक्षण द्यावयाचे आहे. अशा प्रकारचा हा उपक्रम होता अशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली.

त्यावर समितीने इंदिरा आवास घरकुल योजनेची सद्य:स्थिती तसेच योजनेंतर्गत मागणी करण्यात आलेली घरकुले मंजूर करण्यात आली आहेत काय ? या प्रश्नावर इंदिरा आवास योजनेंतर्गत एस.सी./एस.टी. प्रवर्गाकरिता ५०%, अल्पसंख्याक प्रवर्गाकरिता १५% व ओबीसी व जनरल प्रवर्गाकरिता ३५% आरक्षण आहे. परंतु, मागणीच्या तुलनेने घरकुले कमी पडत असल्याने आता शासन यामध्ये नवीन उपक्रम

राबवित आहे. आता या योजनेचे पैसे लाभार्थ्यांच्या अकाऊंटमध्ये जमा केले जाणार आहेत. बीपीएलच्या यादीतही आता दुरुस्ती केली जाणार आहे. तसेच, सामाजिक व आर्थिक सर्व्हेक्षणाच्या आधारावर या वर्षापासून लाभार्थ्यांची निवड केली जाणार आहे असा विभागीय सचिवांनी समितीसमोर खुलासा केला.

अभिप्राय व शिफारशी :-

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या आधारे दिनांक २६.८.२०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीत समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेत राबविण्यात आलेल्या महिलांसाठी विविध कल्याणकारी योजनांसंदर्भातील माहितीबाबत विचारणा केली असता उक्त जिल्हा परिषदेत शासनाच्या दिनांक १० मार्च, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार १५ विविध योजनांमधून महिला व बालकल्याण समितीने सुचविलेल्या योजना राबवून उक्त योजनांवर शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेने १०% निधीची तरतूद करुन समाजकल्याण विभागाकडून महिलांना सक्षम करण्याकरिता इयत्ता ५ वी ते ७ वी आणि इयत्ता ८ वी ते ९ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. त्याचप्रमाणे, लेडीज सायकल, शिक्षण यंत्रे, पीठाची गिरणी, शेवया मशीन संगणक प्रशिक्षण इ. बाबींचा महिलांना लाभ देण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले. या योजनांमधून जिल्हा परिषदेने १०% निधीची तरतूद करुन लाभ दिल्याप्रकरणी समिती समाधान व्यक्त करते. परंतु जितक्या निधीची तरतूद केली ती त्या त्या वर्षी त्या त्या योजनांवर खर्च केलेली नाही. काही प्रमाणात रक्कम अखर्चित राहिल्याचे देखील समितीला आढळून आले.

या जिल्हा परिषदेत "माता पालक" योजनेअंतर्गत प्राथमिक शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या माता यांची शिक्षक व पालक असोसिएशनप्रमाणे एक समिती गठीत करण्यात आली आहे. माता लहान बालकांना शाळेत सोडण्यासाठी येत असल्यामुळे त्यांचे त्यांच्या पाल्यांवर अधिक लक्ष असते या भावनेतून शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व माता या दोन महिन्यातून एकदा एकत्र येऊन भेटतात व त्या भेटीत विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि शाळेच्या समस्यांवर चर्चा केली जाते. काही विद्यार्थी अभ्यासात थोडे मागे असतात. अशा विद्यार्थ्यांच्या

मातांना विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी करावयाच्या प्रयत्नांची माहिती दिली जाते. त्याचप्रमाणे मातांच्या काही अडचणी असतील तर त्या शिक्षकांद्वारा सोडविल्या जातात. या योजनेच्या माध्यमातून शिक्षक व विद्यार्थी यांचा संबंध तसेच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ होण्यास मदत होते व त्याचा सकारात्मक परिणाम या जिल्हा परिषदेत झाला असल्याने समिती याबाबत जिल्हा परिषदेचे कौतुक करते व शासनाच्या शालेय शिक्षण विभागास सुचवू इच्छिते की, या योजनेची फलनिष्पता तपासून अशी योजना राज्याच्या इतर भागातील जिल्हा परिषदांत सुध्दा राबविता येते किंवा कसे याची चाचपणी करुन इतर जिल्हा परिषदांनादेखील उद्युक्त करण्यात यावे व तशा प्रकारच्या सर्वंकष सूचना देण्यात याव्यात अशी समिती शिफारस करते.

त्याचप्रमाणे या जिल्हा परिषदेत " नवचेतना " नावाचा एक उपक्रम शिक्षण विभागाच्या माध्यमातून राबविला जातो त्यामध्ये गट शिक्षण अधिकारी, केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी यांना ३ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षणामध्ये गुणवत्ता वाढ, ई-लर्निंग, संगणक अशा विविध विषयाचा समावेश असतो. खाजगी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या शाळा उत्तम ठरल्या पाहिजेत या दृष्टीने हा उपक्रम राबविला जातो. आतापर्यंत २०० ते २५० कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण देण्यात आले असल्याचे व त्या प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांनी खालच्या स्तरावर प्रशिक्षण देऊन हा प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत असल्याची बाब समितीला आश्चर्यचकित करणारी आहे. अशा प्रकारे जिल्हा परिषद कोल्हापूर ने उपक्रम राबवून त्यांच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याबाबत जी सकारात्मक भूमिका घेतली त्याबाबत जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचे समिती कौतुक करते. अशा प्रकारची "नवचेतना" इतर जिल्हा परिषदांत देखील राबविली जाऊ शकते किंवा कसे याबाबत विचारविनिमय करुन योग्य तो निर्णय घ्यावा व विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसंदर्भात प्रयत्न करावा अशी समितीची शिफारस आहे.

तसेच जिल्हापरिषदने एकूण अर्थसंकल्पातील वेतनेतर अनुदान वगळता १० % रक्कम महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांवर त्या त्या वर्षी खर्चत केली नसल्याने व ती पुढील वर्षात खर्च केल्याने यात लाभार्थ्यांना लाभ मिळण्यास विलंब झाला असल्याने या पुढील काळात तरतुद केलेली रक्कम संबंधित योजनेची आखणी करुन वेळापत्रकाप्रमाणे खर्च करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण ४

कोल्हापूर, महानगरपालिका

४.१ महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :---

कोल्हापूर, महानगरपालिकेच्या संदर्भातील प्रश्नावलीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १० जानेवारी, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी त्यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

महानगरपालिकेत सेवेत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे पैकी महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या किती ? भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याबाबतचे निकष भरतीची पध्दत इत्यादीबाबतची माहिती देण्यात यावी ?

उपरोक्त प्रकरणी कोल्हापूर, महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :---

महानगरपालिकेत एकूण मंजूर पद संख्या ४६८८ असून त्यात ३० % महिला आरक्षण संख्या १३५७ आहे. कार्यरत महिला अधिकारी व कर्मचारी पद संख्या ७७५ असून ५८२ महिलांची पदे रिक्त आहेत. महिला उमेदवारांकरिता स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) सन २००० पासून अद्ययावत ठेवण्यात आलेली आहे. महानगरपालिकेत महिला अधिकारी/कर्मचारी भरती व सेवाविषयक बाबींसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला नाही. तथापि, विशेष मागासवर्गीय कक्ष उप आयुक्त यांचे नियत्रणा खाली स्थापन करण्यात आलेला आहे. महिला आधिकारी/कर्मचारी यांची भरती व सेवा विषक बाबीं हाताळण्यात येऊन कार्मिक विभागामार्फत कार्यवाही ठेवली जाते.

महानगरपालिका आयुक्त यांची साक्ष :---

समितीने कोल्हापूर महानगरपालिकेला दिनांक १० जानेवारी, २०१४ रोजी भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेले महिला अधिकारी व कर्मचारी, महानगरपालिकेमध्ये महिलांची ५८२ असलेली रिक्त

पदे, महानगरपालिकेत ४,६८८ पदे मंजूर आहेत व ३०% आरक्षणानुसार महिलांसाठी १,३५७ पदे भरणे गरजेचे असतानाही प्रत्यक्षात फक्त ७७५ पदे भरलेली आहेत आणि याबाबतचा शासनाचा निर्णय अशी माहिती विचारली.

त्यावर खुलासा करताना आयुक्तांनी महानगरपालिकेमध्ये एकूण मंजूर पदे ४,६८८ आहेत. त्यापैकी ३,४८४ पदे कार्यरत आहेत. त्यामध्ये ९६१ महिला अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. एकूण महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची १,००१ पदे कार्यरत आहेत. असे सांगितले त्यावर महानगरपालिका प्रशासनाने एकूण मंजूर पदांच्या ३०% नुसार १,३५७ पदे महिलांसाठी आरक्षित आहेत. त्यापैकी ७७५ पदांवर महिला कार्यरत आहेत. आरक्षण नसतानाही महानगरपालिकेमध्ये १८६ महिला अतिरिक्त कार्यरत आहेत. आरक्षणानुसार ५८२ पदे भरणे आवश्यक आहे. परंतु १,९९९ सालातील शासन निर्णयानुसार आस्थापनावरील खर्च ३५% असणे आवश्यक आहे. या कारणामुळे ही पदे रिक्त आहेत. १,३५७ पदे महिलांसाठी आरक्षित आहेत परंतु प्रत्यक्षात ७७५ पदे कार्यरत आहेत असा खुलासा केला.

त्यावर आयुक्तांनी आस्थापनावरील खर्च ३५% पर्यंत करण्याची अट असल्यामुळे ही पदे भरलेली नाहीत. तथापि, शासन स्तरावर अनुकंपा तत्वावरील व अनुशेषाची पदे भरण्याबाबत आढावा घेण्यात आल्यावर शासनाने ती पदे भरण्याबाबत आदेश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्ग कक्षानेही अनुशेषाची पदे रिक्त असल्याचे नमूद केलेले आहे. ४,६८८ मंजूर पदांपैकी सध्या महिलांची ७७५ पदे कार्यरत आहेत. शासनाच्या आदेशामुळे महिलांची उर्वरित पदे भरता आली नाहीत. शासन निर्णय १९९९ सालातील आहे. या शासन निर्णयामधील तरतुदीमुळे महापालिकेतील वर्ग-३ व ४ ची पदे भरलेली नाहीत. तथापि, शासनाने अनुशेषाची व अनुकंपा तत्वावरील पदे भरण्यास परवानगी दिलेली आहे असा समितीसमोर खुलासा केला.

समितीने त्यावर या ठिकाणी कंत्राटी पध्दतीने वर्ग-४ ची पदे भरण्यासाठी असलेल्या अडचणीबाबत विचारणा केली.

त्यावेळी आयुक्तांनी कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची भरती करण्याला कर्मचाऱ्यांच्या युनियनकडून हरकत घेतली जाते. युनियनचे प्रतिनिधी लेबर कोर्टाच्या आदेशाचा

आधार घेऊन कंत्राटी पध्दतीने भरती करु देत नाहीत. या ठिकाणी अनुशेषाची पदे भरत असताना समांतर आरक्षण लागू केलेले आहे. तसेच रोस्टर तपासल्याशिवाय भरती करता येत नाही. मागासवर्ग कक्षाच्या अधिकाऱ्यांनी ३ दिवस रोस्टरची तपासणी केली होती. रिक्त पदे भरण्यासाठी एमकेसीएलला आदेश दिलेले आहेत. महानगरपालिकेला वाहन चालक उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे या ठिकाणी कंत्राटी पध्दतीने वाहन चालकांची नियुक्ती केलेली आहे. डम्पर चालविण्यासाठी चालक मिळत नाहीत त्यामुळे डम्पर चालविण्यासाठी चालकांना प्रतिनियुक्तीवर नेमलेले आहे असे समितीस सांगितले.

त्यावर महानगरपालिका प्रशासनाने शासनाने अनुशेषाची व पदोन्नतीद्वारे भरती करण्यासाठी अट शिथिल केलेली आहे. त्यानंतर वर्ग-३ व वर्ग-४ च्या भरतीच्या वेळी महिला उमेदवारांना घेतलेले आहे. अनुकंपा तत्वावर सन १९९९-२००२ या कालावधीत भरती केलेली आहे. असा खुलासा केला नंतर सन २०११ पर्यंतच्या लोकांना नियुक्ती द्यावी असे नविन आदेश देण्यात आलेले आहेत. असे सांगून चर्चेचा समारोप केला.

महानगरपलिकेच्या अखत्यारित खालीलप्रमाणे ३ रुग्णालये आहेत.

१. सावित्रीबाई फुले रूग्णालय

२. पंचगंगा रुग्णालय

३. डॉ. द्वारकानाथ कोटनीस सांसर्गिक रुग्णालय

या शिवाय १० कुटूंब कल्याण केंद्रे, १४ वॉड दवाखाने, २ फिजिओथेरपी सेंटर, १ रक्तपेढी इ. मार्फत सेवा पुरविण्यात येतात. सार्वजनिक आरोग्य येथे मंजूर पदे ३३३ असून महिला आरक्षण ३०% प्रमाणे १०० आहेत. कर्यरत महिला १६४ असून महिलांची रिक्त पदे २० आहेत. अशी माहिती प्राप्त झाली.

याप्रकरणी कोल्हापूर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे लेखी माहिती पुरविली.कोल्हापूर महानगरपालिका आस्थापनेवर एकूण ४६८८ पदे मंजूर ३४८४ पदे कार्यरत आहेत कोल्हापूर महानगरपालिकेत सध्या एकूण १०१० महिला अधिकारी/ कर्मचारी कार्यरत आहेत.

कोल्हापूर महानगरपालिका वर्ग-०३ व वर्ग-०४ मधील विविध संवर्गातील एकूण ६१८ पदे निर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केलेला होता. सदर प्रस्तावाचा नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.के.एम.सी. ३०९८/२१४२/प्र.क्र.१८७/९८/ नवि-१९ दिनांक १३ मे, १९९९ नुसार खालील अटींच्या अधीन स्वीकार केलेला आहे.

" कोल्हापूर महानगरपालिकेने पुढील तीन वर्षामध्ये त्यांचे अंतर्गत उत्पन्न वाढवून आस्थापना खर्चाचे (निवृत्तीवेतनासह एकूण खर्च) प्रमाण एकूण उत्पन्नाच्या ३०% पर्यंत आणावे व आस्थापना खर्चाचे प्रमाण ३५% येईपर्यंत कोणतेही नवीन पद महानगरपालिकेच्या आस्थापनावर निर्माण करण्यात येऊ नये तसेच कोणत्याही कारणास्तव रिक्त होणारे वर्ग-०३ व वर्ग-०४ चे पद भरु नये. "

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.के.एम.सी. ३०९८/२१४२/ प्र.क्र.१८७/९८/नवि-२५ दिनांक ३० ऑक्टोबर, २००२ नुसार मागासवर्ग अनुशेष भरणे बंधनकारक असल्याने कोल्हापूर महानगरपालिका आस्थापनावरील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील रिक्त पदांपैकी मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी ३२२ पदे भरण्यास शासनाच्या दिनांक १३-५-१९९९ च्या शासन निर्णयातील अट क्र. ३ शिथिल करण्यात आलेली आहे.

कोल्हापूर महानगरपालिकेकडील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कर्मचाऱ्यांची रोस्टर तपासणी पुर्ण न झाल्याने सरळसेवा भरतीकरीता आलेली नाही. तथापि, दिनांक ६.१.२०१४ रोजी रोस्टर तपासून आलेले आहे.

वर्ग ३ व वर्ग ४ चे सरळसेवेच्या पदांची माहिती खालीलप्रमाणे

वर्ग	एकूण मंजूर पदे	मागासवर्गीय आरक्षण			
		५२% प्रमाणे मंजूर पदे	पैकी कार्यरत	रिक्त	रिक्त पदांचे ३०% महिला
३	४७९	२३२	१३८	९४	२८
४	१४५८	७४४	२७७	४६७	१४०
एकूण	१९३६	९७६	४१५	५६१	१६८

वर्ग ३ च्या मागासवर्गीय आरक्षणाच्या ९४ रिक्त पदांपैकी ३०% महिलांची २८ पदे व वर्ग ४ च्या मागासवर्गीय आरक्षणाच्या ४६७ रिक्त पदांपैकी ३०% महिलांची १४० पदे याप्रमाणे सरळसेवेच्या वर्ग ३ व वर्ग ४ च्या मागासवर्गीय आरक्षणामधील १६८ महिलांची पदे भरणेबाबत कार्यवाही करीत आहोत असे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे खालील पूर्तता करण्यात आली.

वर्ग	मागासवर्गीय आरक्षण	
	रिक्त पदांचे ३०% महिला	
३	२८	
४	१४०	५२
एकूण . .	१६८	५२

कोल्हापूर महानगरपालिका आस्थापनाकडील महिला अनुशेष भरतीकरीता दिनांक २५.७.२०१४ व दिनांक ६.९.२०१४ इ. रोजी जाहीरात पसिध्द करण्यात आलेली आहे.

वर्ग	पद संख्या	एकूण
२	५	५
३	११	११
		१६

यानूसार अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यास अनुसरुन भरतीबाबतची कार्यवाही सद्य:स्थितीमध्ये सुरु आहे.

कोल्हापूर महानगरपालिका वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गामधील पदे भरतीबाबत शासनाची उपरोक्त दिनांक १३.५.१९९९ च्या शासन निर्णयानुसार बंदी होती. खुल्या संवर्गातील पदे भरतीकरिता सदर ३५% आस्थापना खर्चाची अट शिथिल करण्याबाबत महानगरपालिकेने शासनास दिनांक २१.१२.२००५, २९.६.२०१०, २३.६.२०११, ७.१०.२०११, २३.१.२०१३ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

वर्ग ३ व वर्ग ४ मधील खुल्या संवर्गातील महिलांची रिक्त पदे भरण्याकरिता ३५% आस्थापना खर्चाची अट शिथिल झाल्यास वर्ग ३ व वर्ग ४ मधील खुल्या संवर्गातील महिलाची रिक्त पदे भरता येतील.

विभागीय सचिवांची साक्ष :---

कोल्हापूर महानगरपालिकेस दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने कोल्हापूर महानगरपालिकेत महिलांची ५८२ पदे रिक्त राहण्याची कारणे तसेच, अनुशेषाची भरलेली पदे याबाबत विचारणा केली.

त्यावर कोल्हापूर महानगरपालिकेत आजमितीला ३४८४ पदे कार्यरत आहेत. महिलांकरिताच्या आरक्षणानुसार त्यापैकी १०८४ पदे महिलांची असणे आवश्यक होते. प्रत्यक्ष कार्यरत महिलांची संख्या १०१० आहे. याचाच अर्थ २९% महिला कार्यरत आहेत. एकूण मंजूर ४६८८ पदांपैकी ३०% आरक्षणानुसार महिलांची १३५७ पदे असणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्ष कार्यरत महिलांची संख्या १०१० आहे. महिलांच्या ३४७ पदांचा अनुशेष आहे त्यापैकी १७१ पदे आस्थापना खर्चाच्या अटीमुळे भरता येत नाहीत. आरक्षित पद भरतीस मुभा देण्यात आलेली आहे. त्या अंतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेने ७३ पदांकरिता जाहीरात दिली असून नियमानुसार महिलांकरिता १६ पदे राखीव ठेवण्यात आली आहेत. या पुढे जी जी पदभरती होईल ती ती आरक्षणानुसार होणार आहे असा विभागीय सचिवांनी खुलासा केला.

अभिप्राय व शिफारशी :---

समितीने कोल्हापूर महानगरपालिकेला भेट दिली असता कोल्हापूर महानगरपालिकेतील महिलांकरिता आरक्षीत असलेल्या जागांमधून रिक्त पदांचा आढावा घेत असताना, तसेच शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या सेवेत महिलांकरिता ३०% जागा राखीव ठेवण्यात येतात किंवा कसे याबाबत माहिती घेत असता, या महानगरपालिकेमध्ये एकूण कर्मचाऱ्यांची संख्या ४६८८ इतकी असून त्यापैकी १३५७ महिलांसाठी आरक्षण आहे व ७७५ महिला कार्यरत असून ५८२ इतकी पदे रिक्त असल्याचे समितीला सांगण्यात आले. सदरची पदे रिक्त का आहेत अशी विचारणा केली असता शासन स्तरावर या बाबतचा प्रस्ताव पाठविलेला असून शासन आस्थापनेवरील खर्च ३५% पर्यंत करण्याची अट ठेवली असल्यामुळे ही पदे भरलेली नाहीत याबाबत समिती अत्यंत नाराजी व्यक्त करते. कारण महिलांकरिता आरक्षणाचा शासन निर्णय १९९७ सालातील आहे. तेंव्हापासून आतापर्यंत महानगरपालिकेने अनेक वेळा भरती केली असेल असे असताना देखील जाणीवपूर्वक महिलांकरिता राखीव असलेली पदे इतक्या मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे महिलांच्या कल्याणासाठी शासन जे धोरण राबवित आहे त्या धोरणाचीच कोल्हापूर महानगरपालिकेने पायमल्ली केली असल्याचे दिसून येते.

कोल्हापूर महापालिकेमध्ये अनेक पदे ही कंत्राटी पध्दतीने कार्यरत आहेत. कंत्राटी पध्दतीने पदांची भरती करीत असताना देखील महिलांकरिता राखीव जागा ठेवणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते कारण पुढे ह्या कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या व्यक्ती शासकीय सेवेत काम करण्यासाठी या ना त्या कारणासाठी प्रयत्न करीत असतात म्हणून कंत्राटी पध्दतीने पद भरती करीत असताना देखील महिलांकरिता ३०% राखीव जागा आरक्षीत ठेवण्यात याव्यात तसेच महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्यासंदर्भातील शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर शासनाने सदरच्या पद भरतीचा प्रस्ताव सकारात्मक दृष्टीने विचार करुन पद विशेषत: महिलांच्या अनुशेषासंदर्भातील भरतीस अनुमती द्यावी व अशी पद भरती करताना कोल्हापूर महानगरपालिकेने महिलांचा कोणत्याही पदाचा अनुशेष

राहणार नाही व महिलांकरिता राखीव असलेली संपूर्णपणे भरण्याबाबत कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

४.२ कोल्हापूर, महानगरपालिकेचे गत ३ वर्षातील अंदाजपत्रक :---

महानगरपालिकेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रकाची रक्कम, महसूल व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बाल कल्याण विभागासाठी खर्च करण्यात आला आहे. महानगरपालिकांना ३५% आस्थापना खर्चाच्या मर्यादेत सूट देण्याच्या संदर्भात शासनाचे धोरण, कोल्हापूर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याकरिता केलेल्या उपाययोजना, महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना देण्यात येणाऱ्या सोयी-सवलती त्यावर झालेला वर्षनिहाय व योजना निहाय एकूण खर्च, महिलांच्या आरोग्याबाबत महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना, महानगरपालिकेच्या अखत्यारितील रुग्णालये, त्यामध्ये ३०% महिला अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती याबाबतची माहिती मागितली.

उपरोक्त प्रकरणी कोल्हापूर, महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :---

महिला व बालकल्याण अंदाजपत्रकीय तरतुदीबाबत तपशील (अंक लाखात)

सन	एकूण उत्पन्न	आस्थापना खर्च	एकूण (२-३)	५% प्रमाणे अपेक्षित राखिव निधी	प्रत्यक्ष खर्च	राखीव निधीचे प्रमाणात खर्च व टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
२०१०-११	१९८४२.४८	७६४४.९७	१२१९७.५१	६०९.८७	६२१.५४	१०१.९१%
२०११-१२	२०९२५.६३	८३०७.२०	१२६१८.४३	६३०.९२	६६०.०८	१०४.६२%
२०१२-१३	२३८६२.००	८९११.४६	१४९५०.५४	७४७.५३	७१५.१९	९५.६७%

१. मुलींना व महिलांना व्यवसायिक व तांत्रिक प्रशिक्षण

२. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत वैयक्तिक तसेच बचत गटांना व्यवसायासाठी अनुदान

३. व्यवसायाभिमुख साहित्य (शिलाई यंत्र, घरघंटी इ.) वाटप महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या ५% रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी खर्च करण्यात येते.

महानगरपालिका आयुक्त यांची साक्ष :---

समितीने कोल्हापूर महानगरपालिकेला दिनांक १० जानेवारी, २०१४ रोजी भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने महानगरपालिकेमध्ये आस्थापनेवर येणारा खर्च उर्वरित ४०% निधीतून शहरातील नागरिकांना सोयी-सुविधा देण्याबाबत तसेच महापौरांच्या दालनामध्ये पाण्याची व्यवस्था नाही, मग शहरातील नागरिकांचे पाण्याअभावी होत असलेले हाल याबाबत विचारणा केली.

त्यावर महानगरपालिका प्रशासनाने महानगरपालिकेचे महसुली बजेट २,०५५ कोटी रुपयांचे आहे. तसेच राज्य शासनाकडून ४५० कोटी रुपयांचा विशेष निधी प्राप्त होतो. आस्थापनावर ५९% खर्च होतो. केंद्र व राज्य शासनाकडून महानगरपालिकेला भांडवली कामासाठी विशेष निधी मिळतो. त्या निधीतून प्राथमिक सुविधांवर खर्च करता येत नाही असा खुलासा केला.

या दवाखान्यांमध्ये आयसीयूची सोय नसल्यामुळे तेथे राजीव गांधी जीवनदायी योजना राबविता येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये आयसीयूची तरतूद करण्यात यावी. एस.टी.स्टॅण्डवर महिलांसाठी विश्रांतीगृहाची सोय करण्यात यावी. अशी समितीमार्फत शासनाकडे मागणी करण्यात आली.

विभागीय सचिवांची साक्ष :---

कोल्हापूर महानगरपालिकेस दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी विभागीय सचिवांची

साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महानगरपालिकांना ३५% आस्थापना खर्चाच्या मर्यादेत सूट देण्याच्या संदर्भात शासनाचे धोरण स्पष्ट करताना विभागीय सचिवांनी सध्या तरी अशा प्रकारची सूट देणे अवघड आहे. शासनाने महानगरपालिकेला त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याबाबत सांगितले आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले की, ३५% ची मर्यादा आपोआप कमी होईल असे सांगितले तसेच समितीने कोल्हापूर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याकरिता केलेल्या उपाययोजनांबाबत माहिती मागविली त्यावर खुलासा करताना उपायुक्तांनी उत्पन्न वाढीकरिता प्रयत्न सुरु केलेले आहेत. त्यातील महत्त्वाचा निर्णय म्हणजे प्रिमियम एफएसआय लागू करणे. त्यानुसार उत्पन्न वाढत आहे. मागच्या वेळेस टाऊन प्लानिंग विभागाचे उत्पन्न २०-२२ कोटी रुपये होते ते ४८-४९ कोटी रुपयांवर गेले आहे. गाळेसुध्दा रेडीरेकनरच्या दराने भाड्याने देण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. १० ते १२ कोटी रुपयांनी वाढ होण्याची अपेक्षा आहे असे समितीस सांगितले.

महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने गार्बेज पासून ब्रिक्स तयार करणे, पॉवर निर्मिती करणे, प्लेटस् तयार करणे याबाबतही विचार झाला पाहिजे. कांजूरच्या प्रोजेक्टच्या धर्तीवर काही करता आले तर पहावे. या समितीच्या सूचनेवर विभागीय सचिवांनी महाराष्ट्रातील १ लाख लोकसंख्येपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांकरिता केंद्र शासनाची अमृत शहर नावाची योजना असून त्याकरिता मोठ्या प्रमाणात निधीही उपलब्ध आहे. या शहरांनी प्रॉपर्टी टॅक्स वाढविण्याची गरज नाही. त्यांनी जीआयएस सर्व्हे व मॅपिंग करुन सर्व प्रॉपर्टीवर टॅक्स बसविला तर प्रॉपटी टॅक्स न वाढविताही महापालिकेचे उत्पन्न दुप्पट होऊ शकेल. या करिता महानगरपालिकांना पुढच्या ६ महिन्यांत मॅपिंग व जीआयएस सर्व्हे करण्याबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत. असा समितीस खुलासा केला.

पुढे महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवलेला ५% निधी अखर्चित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईबाबत समितीने विचारले असता शासन निर्णयानुसार महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी ५% निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. वास्तविक पाहता महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी जी तरतूद केलेली असते त्यानुसार ती रक्कम खर्च करणे अनिवार्य आहे. महानगरपालिकेच्या निव्वळ महसुली उत्पनातून बांधील खर्च वजा जाता जे निव्वळ उत्पन्न शिल्लक राहते

त्या रकमेच्या ५% निधी महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवून त्यानुसार खर्च करावयास पाहिजे असे उत्तर दिले.

महिला व बालकल्याण कार्यक्रमांचे अंदाजपत्रकीय तरतूद व खर्च खालीलप्रमाणे.

अ. क्र.	सन	केलेली तरतूद	झालेला खर्च
(१)	(२)	(३)	(४)
१.	२०११-१२	५५,००,०००	१९,००,०००
२.	२०१२-१३	५४,००,०००	३५,००,०००
३.	२०१३-१४	१,५६,००,०००	७८,००,०००
४.	२०१४-१५	२,००,००,०००	८०,००,०००
५.	२०१५-१६	१,८३,००,०००	१५,००,००० (आजपर्यंत खर्च)

अभिप्राय व शिफारशी :-

समितीने कोल्हापूर महानगरपालिकेला भेट देताना कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी समितीला लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत व विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीत प्रचंड तफावत आहे. कोल्हापूर महानगरपालिकेने सन २०१०-११ या वर्षात एकूण उत्पन्न १९८४२.४८ लक्ष दर्शविले असून आस्थापना खर्च ७६४४.९७ इतका दर्शविला आहे. शासन निर्णयानुसार ५% राखीव निधी म्हणून ६०९.९७ लक्ष इतका दर्शविला असून प्रत्यक्ष खर्च ६२१.५४ लक्ष इतका केला असल्याचे व तो खर्च १०१.९१% असल्याचे लेखी माहितीत नमूद केले आहे. त्याचप्रमाणे २०११-१२ मध्ये आणि १२-१३ मध्येदेखील खर्चाचे प्रमाण उपरोक्त तक्त्यात दर्शविले

आहे. तथापि, विभागीय साक्षीच्या वेळी महिला व बालकल्याण कार्यक्रमास अंदाजपत्रकीय तरतूद व खर्च पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :-

महिला व बालकल्याण कार्यक्रमांचे अंदाजपत्रकीय तरतूद व खर्च खालीलप्रमाणे.

अ. क्र.	सन	केलेली तरतूद	झालेला खर्च
(१)	(२)	(३)	(४)
(१)	२०११-१२	५५,००,०००	१९,००,०००
(२)	२०१२-१३	५४,००,०००	३५,००,०००
(३)	२०१३-१४	१,५६,००,०००	७८,००,०००
(४)	२०१४-१५	२,००,००,०००	८०,००,०००
(५)	२०१५-१६	१,८३,००,०००	१५,००,००० (आजपर्यंत खर्च)

यावरुनच कोल्हापूर महानगरपालिकेने उपरीक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे खर्चाची अंदाजपत्रकात नमूद केलेली तरतूद, आस्थापना खर्च व ५% राखीव निधी यामध्ये तफावत दिसून येते. **समितीला लेखी स्वरुपात पाठविलेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीत विभागीय सचिवांनी सादर केलेली माहिती यामध्ये प्रचंड तफावत आहे. त्यामुळे समितीला नेमक्या निष्कर्षापर्यंत जाता आले नाही. म्हणून समिती या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत असून ज्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी समितीला चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पाठविली आहे अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांच्याविरुध्द लेखी स्वरुपात पाठविलेल्या व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी दिलेल्या माहिती संदर्भात पडताळणी करुन संपूर्ण सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीत दोषी आढळून येणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा व शिस्त) नियमांतर्गत कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

४.३ महिलांकरिता शौचालयाची सुविधा :---

आयुक्त महानगरपालिका यांची साक्ष :---

महानगरपालिकेने महिलांच्या शौचालयाकरिता केलेल्या सोयी तसेच शौचालयाची सद्य:स्थिती याबाबत अशी विचारणा केली असता आयुक्त महानगरपालिका यांनी समितीस असे विशद केले की, कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये महिलांच्या अनेक समस्या आहेत. या जिल्ह्यात करवीरनिवासिनी महालक्ष्मीचे मंदिर आहे, जोतिबाचे मंदिर आहे. या मंदिरांमध्ये बाराही महिने भाविक येत असतात. त्याशिवाय सणांच्या दिवशी मोठ्या संख्येने भाविकांची गर्दी होत असते. त्यामुळे या मंदिराच्या परिसरामध्ये मोबाईल शौचालयाची आवश्यकता भासते. त्याचप्रमाणे कोल्हापूर शहरातील सरकारी दवाखान्यांची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. त्या दवाखान्यांमध्ये गर्भवती महिलांसाठी पाश्चिमात्य पध्दतीच्या शौचालयाची व्यवस्था असावयास पाहिजे. अशी समितीस माहिती प्राप्त झाली.

याप्रकरणी खुलासा करताना विभागीय आयुक्तांनी बीओटी तत्वावर मंदिराच्या आवारामध्ये शौचालयाची व्यवस्था करण्याची लोकांनी मागणी केलेली आहे. यापूर्वी मोबाईल शौचालयाची व्यवस्था केली होती. परंतु राज्य पुरातत्व विभागाने मंदिराच्या आवारात शौचालय ठेवू नये, ए.सी.लावू नये अशा सूचना केलेल्या आहेत. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांबरोबर चर्चा झालेली आहे. नवरात्री उत्सवामध्ये मोबाईल शौचालयाची व्यवस्था करण्यात येते. शहरात मोबाईल शौचालयासाठी ३४ ठिकाणच्या जागा निवडलेल्या असून त्यासाठी वर्क ऑर्डर झालेली आहे. एस.टी. महामंडळाचा परिसर आमच्या अखत्यारित येत नाही. असे समितीसमोर स्पष्ट केले.

मोबाईल शौचालयाचे पूर्णत्व तसेच देवस्थान व्यवस्थापन समितीने महानगरपालिकेकडे वर्ग केलेला निधी यावर खुलासा करताना महिलांसाठी २१ मोबाईल शौचालय एका महिन्यात पूर्ण होतील. असे आश्वासन दिले.

कोल्हापूर महानगरपालिकेने १२० कोटी रुपयांचा आराखडा तयार केलेला आहे. यामध्ये ५०% राज्य सरकार, २५% हिस्सा महानगरपालिका आणि २५% हिस्सा

देवस्थान कमिटीने द्यावयाचा आहे, परंतु देवस्थान समितीने पैसे देण्याचे नाकारले आहे. गत वर्षी देवस्थान व्यवस्थापन समितीकडे २५% हिस्स्याची मागणी करण्यात आली होती. तथापि, देवस्थान व्यवस्थापन समितीने महानगरपालिकेस २५% हिस्सा देण्याचे नाकारले आहे. बीओटी तत्वावर शौचालय करण्याचा महानगरपालिकेचा प्रस्ताव होता, परंतु मंदीर व्यवस्थापन समितीने त्यास नकार दिला आहे. असे भेटीच्या शेवटी आयुक्तांनी समितीस सांगितले.

विभागीय सचिवांची साक्ष :---

साक्षीच्या वेळी उपायुक्तांनी महालक्ष्मी मंदिर परिसरात दक्षिण दरवाज्यालगत प्रांत कार्यालयानजीक महिलांसाठी २ सीट फायबर शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच त्याच्या लगत नवीन आर.सी.सी. स्वच्छतागृह प्रस्तावित केलेले आहे. तसेच, पूर्ण शहरांमध्ये महिलांकरिता शौचालयांचे काम हाती घेण्यात आलेले आहे. १ सीट्सच्या शौचालयाची किंमत ३५ हजार रुपये असून २ सीटस्च्या शौचालयाची किंमत ६० हजार रुपये आहे. असा खुलासा केला त्यावर विभागीय सचिवांनी स्वच्छतेकरिता चौदाव्या वित्त आयोगाचा निधी देऊ असे सांगितले होते. आता त्या बाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. हा निधी देताना त्यातील ५०% निधी स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनावर खर्च करण्याबाबतचे बंधन घालण्यात आले आहे. असे सांगितले त्यावर उपायुक्तांनी ८० लाख रुपयांपैकी शौचालयाच्या कामावर १० लाख रुपये खर्च केले. असा खुलासा केला.

अभिप्राय व शिफारशी :---

समितीने कोल्हापूर महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी शौचालयाबाबतच्या सद्य:स्थितीची विचारणा केली असता, कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये महिलांच्या शौचालयांची अत्यंत दुरवस्था असून या जिल्ह्यात प्रसिध्द महालक्ष्मीचे मंदिर, ज्योतिबाचे मंदीर व इतर अन्यही मंदिरांमध्ये लाखोंच्या संख्येने महिला भावीक येत असतात. त्याचप्रमाणे कोल्हापूर शहरातील व कोल्हापूर जिल्ह्यातील महिलादेखील, शाळा, महाविद्यालये व इतर कामकाजानिमित्त कोल्हापूर शहरात येत असतात. ही बाब

विचारात घेता त्यामानाने शहरात शौचालयांची संख्या अत्यंत अल्प असल्याची माहिती समितीला देण्यात आली. शहरात मोबाईल शौचालयासाठी ३४ ठिकाणच्या जागा निवडल्या असून त्याचे बांधकामाची वर्क ऑर्डर दिली असल्याचे सांगितले. तसेच महालक्ष्मी देवस्थान व्यवस्थापन समितीने महानगरपालिकेकडे निधी वर्ग केला असून त्यासाठी महिलांसाठी २१ मोबाईल शौचालये एक महिन्यात पूर्ण होतील असे समितीला भेटीच्या वेळी आश्वासीत केले होते. आयुक्तांनी असेही सांगितले की, संपूर्ण कोल्हापूर शहरामध्ये महालक्ष्मी मंदिर परिसरात महिलांसाठी २ सीट फायबर शौचालय, तसेच नवीन RCC स्वच्छतागृहे प्रस्तावीत केली असून १४ व्या वित्त आयोगाचा निधी देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. हा निधी देताना त्यातील ५०% निधी स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन करण्याबाबतचे बंधन घालण्यात आले आहे असे सांगितले त्यावर उपायुक्तांनी ८० लाख रुपयांपैकी शौचालयांच्या कामावर १० लाख रुपये खर्च केला असाही खुलासा विभागीय साक्षीच्या वेळेस करण्यात आला.

कोल्हापूर शहर हे राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भावीक महिलांसाठी अत्यंत महत्वाचे असून येथील स्थानिक महिलांसाठीच्या शौचालयांची दूरवस्था अत्यंत दयनीय असल्याचे समितीला दिसून आले. **महानगरपालिकेच्या आयुक्तांनी तसेच विभागीय सचिवांनी समितीला विविध शौचालयांची कामे प्रस्तावीत असल्याचे सांगितले आहे. शौचालयाच्या बांधकामासाठी १४ व्या वित्त आयोगातून निधी देण्याचे विभागीय सचिवांनी आश्वासीत केल्याप्रमाणे शौचालयासाठी जास्तीत जास्त निधी देण्याबाबत कार्यवाही करावी. महानगरपालिकेचे आयुक्त यांनी महिलांच्या शौचालयाबाबत दिलेल्या बाबींचा विचार करता कोल्हापूर शहरात महिलांसाठी परिपूर्ण व पुरेसे असे शौचालये वेगवेगळ्या दर्शनीय भागामध्ये निर्माण करण्यात यावीत. प्रस्तावीत केलेल्या तसेच अर्धवट असलेल्या शौचालयांचे बांधकामदेखील त्वरेने पूर्ण करण्यात यावे व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा.**

४.४ महिलांसाठी तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्याबाबत :---

आयुक्त महानगरपालिका यांची साक्ष :---

महिला अधिकारी व कर्मचारी यांचे कडून त्याच्यावर होत असलेल्या अन्याबाबत (लैगिंक छळ, मानसिक त्रास) निवेदने प्राप्त झाली आहेत काय ? असल्यास त्यानूसार काय कार्यवाही करण्यात आली? तसेच महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष सुरू करण्यात आला आहे काय ? महिला व बालकल्याण अधिकारी आहे काय ? असल्यास त्याची कार्यकक्षा काय आहे ? अशी समितीकडून विचारणा करण्यात आली असता आयुक्त महानगरपालिका यांनी समितीसमोर असे विषद केले की, कोल्हापूर, महानगरपालिकेत सन २००८ ते २०११ या कालावधीत महिला अधिकारी / कर्मचारी यांचे संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अन्याय / छळांच्या तक्रारी नाहीत.

कोल्हापूर, महानगरपालिकेत तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. गत ३ वर्षात कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत. समितीची बैठक नोव्हेंबर २०१३ मध्ये घेण्यात आली आहे. महिला व बालविकास अधिकारी हे पद रिक्त आहे.

कोल्हापूर महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :---

तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे काय, असल्यास त्या कक्षाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत का ? या समितीच्या प्रश्नास उत्तर देताना महानगरपालिका प्रशासनाने दोन महिला कर्मचाऱ्यांनी दोन सॅनेटरी इन्स्पेक्टर विरुध्द शिवीगाळ, वाईट शब्द वापरले म्हणून सन २००४ साली तक्रार केली होती. सदरहू प्रकरणी प्राप्त झालेल्या चौकशी अहवालानुसार दिनांक २७/१०/२००४ रोजी सॅनेटरी इन्स्पेक्टर यांना निलंबित केले. दुसरे सॅनेटरी इन्स्पेक्टर यांची विभागीय चौकशी केली आणि प्राप्त झालेल्या अहवालात त्यांच्यावर दोषारोप सिध्द झाले त्यामुळे त्यांना बडतर्फीची नोटीस दिली. त्यानंतर ते सिव्हील कोर्टात, माननीय उच्च न्यालयात गेले. त्यानंतर दिनांक २७/८/२०१२ रोजी त्यांना बडतर्फ केले. त्यानंतर त्यांनी स्टॅण्डींग कमिटीकडे

अपिल केली. सदरहू कमिटीने त्यांना सेवेतून काढून टाकावे, असा ठराव केला आणि सदरचा ठराव शासनाकडे पाठविलेला आहे.

दुसरे प्रकरण प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थीनींशी अश्लील वर्तन केल्याच्या संदर्भातील आहे. सदरहू प्रकरणी दिनांक २२/१२/२०१२ रोजी संबधित प्राथमिक शिक्षकांना निलंबित केलेले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. सद्य:परिस्थतीत अपिलामध्ये ते प्रकरण आहे. असा समितीस खुलासा केला. त्यावर उपायुक्त यांनी सदरहू प्रकरणी सन २००४ मध्ये तक्रार आली. त्यानंतर सन २००६ मध्ये तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली. त्यानंतर कोठलीही तक्रारी आलेली नाही. असा खुलासा केला.

महानगरपालिकेकडे तक्रार प्राप्त झाली नसली तरी तुम्ही तक्रार निवारण रजिस्टर मेंटेन केले पाहिजे. अशी शेवटी समितीने सूचना केली.

नंतर उपायुक्तांनी रजिस्टर मेंटेन केलेले आहे. परंतु तक्रारी आल्या नसल्यामुळे त्यामध्ये नोंदी घेतलेल्या नाहीत. सन २००६ नंतर पुन्हा नव्याने तक्रार निवारण समिती स्थापन केलेली आहे. महानगरपालिकेत रजिस्टर ठेवलेले आहे, परंतु त्यामध्ये नोंदी घेतलेल्या नाहीत. असा समितीसमोर खुलासा केला.

विभागीय सचिवांची साक्ष :---

प्राथमिक शालेय शिक्षकांनी विद्यार्थीनींशी अश्लील वर्तन केल्याच्या संदर्भातील प्रकरणाबाबत अपिलामध्ये घेतलेला निर्णय व त्यानुसार संबंधितांवर केलेल्या कारवाईबाबत समितीस माहिती देताना उपायुक्त यांनी कोल्हापूर, महापालिकेमध्ये दि. २०-११-२०१३ पासून विशाखा कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. सदरहू कक्षाकडे एकूण तीन कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यातील दोन तक्रारी डॉ.परितेकर, वैद्यकीय अधिकारी यांच्याविरुध्द होत्या. पहिली तक्रार त्यांच्या रुग्णालयातील महिलेने केली होती व दुसरी तक्रार निनावी आली होती. डॉ.परितेकर यांची चौकशी केली असता तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही. त्यामुळे त्यांना भविष्यात काळजी घेण्याबाबत सक्त सूचना दिल्या आहेत. तिसरी

तक्रार श्री. दीपक बराले, लिपिक यांच्याविरुध्द निनावी स्वरुपात आली होती. या प्रकरणी श्री.बराले यांची चौकशी करण्यात आली व चौकशीमध्ये तथ्य आढळून आले नाही. श्री.मुधोळकर व श्री.कागलकर या दोन सॅनेटरी इन्स्पेक्टर विरुध्द दोन महिला कर्मचाऱ्यांनी शिवीगाळ व वाईट शब्द वापरल्याबाबतची तक्रार केली होती. श्री.मुधोळकर यांची चौकशी केल्यानंतर त्यांना निलंबित करण्यात आले. तसेच श्री.कागलकर यांच्यावर विभागीय चौकशीमध्ये दोषारोप सिध्द झाल्यामुळे त्यांना बडतर्फ करण्यात आले. असे समिती समक्ष सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :---

कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार (विशाखा विरुध्द राजस्थान सरकार) महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आलेली असून ही समिती स्थापन केल्यापासून समितीने विचारलेल्या सन २००८ ते २०११ या कालावधीत महिला तक्रार निवारण समितीकडे एकही तक्रार प्राप्त झाली नाही त्यानंतर सुमारे ३ तक्रारी प्राप्त झाल्या असून यामध्ये एक सॅनिटरी इन्स्पेक्टर यांना निलंबित केले असून त्यांची विभागीय चौकशी केली आहे. विभागीय चौकशीत ते दोषी आढळून आल्यामुळे त्यांना बडतर्फीची नोटीस दिल्यानंतर ते न्यायालयात गेले न्यायालयानेदेखील त्यांना बडतर्फ केल्यानंतर त्यांनी पुन्हा स्थायी समितीकडे अपील केल्यानंतर स्थायी समितीनेदेखील त्यांना सेवेतून काढण्याबाबतचा ठराव केला असून सदरचा ठराव शासनाकडे पाठविला असल्याचे नमूद केले आहे. दुसऱ्या प्रकरणात प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी अश्लील वर्तन केलेल्या प्रकरणात संबंधित शिक्षकांना निलंबित केले असून त्याचे प्रकरण आता अपीलामध्ये सुरु आहे. **विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी संबंधित दोषी असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर निलंबनाची तसेच बडतर्फीची कारवाई केली असल्याचे समितीला सांगितले याबाबत समिती समाधान व्यक्त करीत असून कोल्हापूर महानगरपालिकेने महिलांवरील लैगिक शोषनात दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई केल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते. त्याचप्रमाणे कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये महिलांविरोधातील लैंगिक शोषनाच्या तक्रारी जास्त वेळ प्रलंबित राहणार नाहीत याचीही दक्षता घेण्याबाबत सूचना करते.**

परिशिष्ट-- “ अ ”

शासन निर्णय

नगरपरिषदा /महानगरपालिकांनी महिलांसंदर्भात करावयाची कार्यवाही

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांक :संकीर्ण १०/२०००/११६२/प्रक्र.२७८/नवि-२७

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ८ डिसेंबर, २०००

पहा :- १) शासन पत्र क्रमांक इएसटी - २१९५/२८६४/नवि-३/आस्था/, दिनांक २४.७.१९९५

२) शासन निर्णय क्रमांक जीईएन-१०९३/११९८/नवि-१४, दिनांक १४ जुलै, १९९३

३) शासन पत्र क्रमांक जीईएम - १०९३/३२५/प्रक्र.२४/नवि-३२, दिनांक १७ एप्रिल, १९९३

परिपत्रक : राज्य शासनाने महिलांचे कल्याणासंदर्भात विविध आदेश निर्गमित केले आहेत व या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी ते नगरपरिषदा / महानगरपालिकांना पाठविले जातात. असे असुनही बहुतांशी नगरपालिका / महानगरपालिकांकडून शासन आदेशाचे योग्य प्रकारे अनुपालन होत नाही असे नागपूर महानगरपालिकेसंदर्भात राज्य विधानमंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या बैठकीदरम्यान निदर्शनास आले. सदरहू समितीने महानगरपालिका व नगरपालिका यांना सूचना देण्याचे आदेशित केले आहे व त्या अनुषंगाने राज्यातील नगरपरिषदा व महानगरपालिका यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे :-

१) ३०% जागा महिलांसाठी आरक्षित करण्याबाबत शासनाने यापूर्वीच आदेश काढलेले आहेत. त्याप्रमाणे सर्व महानगरपालिकांनी सेवाप्रवेशाच्या नियमांमध्ये दुरुस्ती करावी व त्याला शासनाची मान्यता घ्यावी.

२) ३०% महिलांच्या भरतीसंदर्भात शासनाने १९९५ साली आदेश काढलेले आहेत व त्याबाबत नगर विकास विभागाकडे नियतकालिक अहवाल पाठविण्याबाबत सूचनाही दिल्या आहेत. महानगरपालिकासंदर्भात दर तिमाही अखेर अहवाल आयुक्त, महानगरपालिका यांनी प्रधान सचिव - २ (नगर विकास) यांना सादर करावा.

३) महिला व बाल कल्याण योजनांसाठी ५ % अंदाजपत्रकीय रक्कम उपलब्ध करुन द्यावी. याबाबत शासनाने दिनांक १४.७.१९९३ रोजी आदेश काढलेले आहेत. त्याची अंमलबजावणी प्रत्येक महानगरपालिकेने न चुकता करावी.

४) प्रत्येक महानगरपालिकेत महिला व बालकल्याण विभागासाठी अधिका-याचे स्वतंत्र पद अस्तित्वात नाही . महानगरपालिकांकडील अधिकारी व कर्मचारी यांचे विनियोजन करुन, महिला व बालकल्याण विभागासाठी स्वतंत्र अधिकारी व कक्ष निर्माण करण्यात यावा. त्यात आवश्यक तेवढे कर्मचारी देण्यात यावेत.

५) महानगरपालिकेत लागणाऱ्या खडू, झाडू, डस्टर, पिना , फाईल्स इत्यादी दैनंदिन आवश्यक वस्तूंसाठी महिला संघटना व महिला संस्थांना ५० % काम देण्यात यावे. यासाठी कामधेनू योजना व सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना यांच्या माध्यमातून महिलांच्या गटांना प्रशिक्षण देऊन, त्यांनी उत्पादित केलेला माल महानगरपालिकांनी स्वतःच्या उपयोगासाठी खरेदी करावा. २००१-२००२ या वर्षाच्या अंदाजपत्रकाचे व वरील वस्तूंच्या खरेदीचे नियोजन आतापासूनच सुरु करण्यात यावे. म्हणजे प्रशिक्षण इत्यादी संपवून एप्रिल, २००१ मध्ये ५०% वस्तूंची खरेदी महिला संघटना /महिला संस्थांमार्फत करता येईल.

६) सर्व महानगरपालिका व नगरपालिका यांनी, महिला नगरसेविकांसाठी स्वतंत्र कक्ष पुरविण्याची व्यवस्था करावी. महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती व अधिकारी यांची वाहने पोलीस किंवा अन्य खात्यांना देताना महानगरपालिकेतर्फे अग्रक्रमाने देण्यात येतात, ही प्रथा बंद करावी.

वरील सूचनांचे महानगरपालिका / नगरपरिषदांनी काटेकोरपणे पालन करावे व अनुपालन अहवाल शासनास पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(पां.वि.घाडगे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) प्रधान सचिव, महिला व बाल कल्याण विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई
२) आयुक्त, महिला व बाल कल्याण, पुणे
३) आयुक्त, सर्व महानगरपालिका
४) संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वांद्रे, मुंबई
५) विभागातील सर्व कार्यासने.

सर्व शासकीय /निमशासकीय कार्यालयांतील
महिला कर्मचारीवृंदांच्या तक्रार निवारणासाठी
तक्रार निवारण कक्ष स्थापन करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२००२/प्र.क्र.३५५ /का-२
नविन प्रशासन भवन, बी विंग,
मादाम कामा रोड, मुंबई-३२.
दि. ३१.१२.०३

परिपत्रक :- कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट विनंती अर्ज (सीआरएल) क्र.६६६-७०/१९९२ (विशाखा व इतर विरुध्द राजस्थान शासन व इतर) प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयांतील मार्गदर्शक तत्वांमध्ये, लैंगिक सतावणुकीबाबत महिला कर्मचाऱ्यांकडून शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यांविरुध्द करण्यात येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी "तक्रार निवारण कक्ष" स्थापन करणे या मार्गदर्शक तत्वाचाही समावेश आहे.

२. वरील विषयासंबंधी विधानमंडळाच्या "महिलांचे हक्क व कल्याण समिती" ने शासनाकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती करुन घेण्यासाठी संबंधित विभागांच्या सचिवांच्या साक्षी घेऊन विधिमंडळास सादर केलेल्या अहवालामध्ये, वरील उल्लेखित मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने सर्व शासकीय / निम शासकीय कार्यालयांमध्ये महिलांच्या तक्रारी / समस्यांचे निराकरण करण्यासाठी "तक्रार निवारण कक्ष" स्थापन करण्याचे निर्देशित केलेले आहे.

* त्यास अनुसरुन, सर्व मंत्रालयीन विभागांना याद्वारे निर्देशित करण्यात येते कि, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख तसेच, जिल्हा स्तरावरील सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी "तक्रार निवारण कक्ष" स्थापन करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात. तसेच, सदर कक्षामार्फत सर्व महिला कर्मचाऱ्यांच्या तक्रारींची दखल घेवुन त्या सोडविण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना योजून कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(पा.वि.केरकर)
शासनाचे उपसचिव.

प्रती,
सर्व मंत्रालयीन विभाग

सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, नवी मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
मा.मंत्री (महिला व बाल विकास) यांचे स्वीय सहाय्यक
मा.राज्यमंत्री (महिला व बाल विकास) यांचे स्वीय सहाय्यक
निवड नस्ती, का.२.

शासकीय/निम शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळाच्या समस्यांची तपासणी करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी आणि त्या अनुषंगाने सर्व कार्यालयात/संस्थेत समिती स्थापन करावयाच्या महिला समितीच्या संदर्भातील सर्वसमावेशक आदेश..

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : मकचौ-२००६/प्र.क्र.१५/मकक,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ३२,
दिनांक : १९ सप्टेंबर, २००६

वाचा :-

१. शासन परिपत्रक क्रमांक : एसआरडी १०८२/सीआर ३४/१६ अ, दि.३०.८.१९८९
२. शासन निर्णय क्रमांक : एसआरडी १०९९/५३/मकअ, दिनांक १९ मे, १९९९
३. शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०००/प्र.क्र.३३६/का-०२,दिनांक ६ फेब्रुवारी, २००१
४. शासन परिपत्रक क्रमांक : सीडीआर १००२/१०९८/प्र.क्र.२/९८, दिनांक १८.९.२००२
५. शासन निर्णय क्रमांक : एसआरडी १०.०३/३९/प्र.क्र.१/२००३/मकअ,
दिनांक ५ जानेवारी, २००४
६. शासन परिपत्रक क्रमांक : मकचौ २००४/प्र.क्र.०१/२००४,दिनांक ३ ऑगस्ट, २००४
७. शासन निर्णय क्रमांक : मकचौ २००५/प्र.क्र.१६/०५, दिनांक २० जानेवारी २००६
८. शासन परिपत्रक क्रमांक : मकचौ २००६/प्र.क्र.१०/मकअ, दिनांक १७ मे, २००६
९. शासन निर्णय क्रमांक : मकअ २००६/प्र.क्र.०१/मकक, दिनांक २४ जुलै, २००६
१०. अध्यक्ष, राज्य महिला तक्रार निवारण समिती यांचे अ.शा.प.
क्रमांक: मकचौ २००६/प्र.क्र.१५/मकक, दिनांक ४.९.२००६

प्रस्तावना :-

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणूकीस प्रतिबंध करण्यासाठी १९९२ चा रिट विनंती अर्ज (सीआरएल) क्र. ६६६-७० मधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्वे भारत सरकारकडून प्रस्तुत करण्यात आली आहेत. त्यातील मार्गदर्शक तत्वांची प्रत व त्या अनुषंगाने राज्य शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांमध्ये सुधारणा केल्या आहेत.

सदरहू मार्गदर्शक तत्वे व त्या अनुषंगाने करण्यात येत असलेली कार्यवाही या संदर्भात वेळोवेळी शासनाने परिपत्रके व शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. सदरहू परिपत्रके व शासन निर्णय वाचा येथे उधृत केलेली आहेत. वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले निर्णय व परिपत्रके यांचा साकल्याने अभ्यास करुन शासकीय/निम शासकीय कार्यालयात ज्या तक्रार निवारण समित्या स्थापन झालेल्या आहेत व त्या स्थापन करण्याच्या दृष्टीने आणि त्या समित्यांना उपयोग होईल या दृष्टीने सदरहू मार्गदर्शक तत्वे आणि वरील शासन निर्णय यांचा एकत्रित सर्वसमावेशक आदेश पुढीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे :-

लैंगिक छळवादामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो आणि त्याबाबतची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे :-

अ. शारिरीक संपर्क आणि कामोद्दीपिक प्रणयचेष्टा
ब. लैंगिक सौख्याची मागणी अथवा विनंती
क. लैंगिक वासना प्रेरित करणारे शेरे
ड. कोणत्याही स्वरुपातील संभोगवर्णन/संभोगदर्शन/अश्लीलसाहित्याचे प्रदर्शन
इ. कोणतेही अन्य अशोभनीय शारिरीक तोंडी अथवा सांकेतिक आचरण

मा. सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वास अनुसरुन विशाखा जजमेंटनुसार विभाग प्रमुख (HOD) यांनी करावयाची कार्यवाही :-

१) लैंगिक छळामध्ये ज्या वरील गोष्टींचा समावेश होतो त्या संदर्भात नियुक्ती प्राधिकाऱ्याने खालील प्रकारचे गैरवर्तन करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी विरुध्द वर्तणूक नियमांचा भंग केल्याच्या कारणास्तव शिस्तभंगविषयक कारवाई म.ना.से.(शि.व अ.) नुसार करणे. जे नियमांचे पालन करणार नाहीत त्यांचे विरुध्द योग्य पेनल्टी लागू करणे.

२) कामाच्या ठिकाणी विश्रांती आरोग्य स्वच्छताविषयक सुविधा पुरविणे/तिच्या सेवेचा गैरफायदा घेतला जात नाही, अशी तिची समजूत होऊ नये यासाठी सुरक्षित वातावरण तयार करणे.

३)जर अशी एखादी कृती आयपीसी खाली किंवा एखाद्या अन्य कायद्याखाली घडली असेल तर त्या कायद्यानुसार संबंधीतांविरुध्द गुन्हा दाखल करणे.

१) तक्रार निवारण समितीची स्थापना करणे. यामध्ये ५० % महिलांचा सहभाग असणे आवश्यक व अध्यक्षपदी महिला असणे आवश्यक. या समितीत थर्ड पार्टी म्हणून एन.जी.ओ. किंवा लैंगिक छळाच्या संदर्भात जी व्यक्ती परिचित आहे, याचे त्याला ज्ञान आहे अशा व्यक्तीचा समावेश असणे आवश्यक. तक्रार निवारण समितीने वार्षिक प्रशासन अहवाल शासनाला सादर करणे आवश्यक. तक्रारींवर कोणती कार्यवाही केली आहे याबाबतचा अहवाल वरील दिलेल्या

मार्गदर्शक तत्वानुसार पालन करून राज्य शासनाच्या तक्रार निवारण समितीस अहवाल सादर करणे आवश्यक. कंप्लेंट मॅकेनिझम तयार करणे, त्यासाठी विहित कालावधी आखून त्या कालावधीतच तक्रारींचा निपटारा करणे.

२) महिलांना त्यांच्या हक्कासंबंधात जागृती निर्माण करणे (अवेरनेस) संविधानातील कलम १४,१९,२१ मधील मुलभूत हक्कांचे रक्षण करणे, जेंडर इक्वॅलिटीसंदर्भात जागृतता निर्माण करणे. त्यासाठी वरील मार्गदर्शक सूचना तसेच खालील बाबी अधिसूचित (नोटीफाईड) करून ठळकपणे फलकावर लावणे.

अ. समितीच्या अध्यक्षांचे/सदस्यांचे नांव, दूरध्वनी क्रमांक आणि पत्ते

ब. जागृती निर्माण करण्यासाठी समितीच्या कार्यक्रमे संदर्भातील माहिती

६) थर्डपार्टी हॅरासमेंटच्या संदर्भात विभाग प्रमुखांची जबाबदारी पुढीलप्रमाणे आहे. शासकीय सेवेत असलेल्या स्त्रिला अन्य पुरुष व्यक्तीकडून त्रास होत असेल तर तिला सर्व प्रकारची मदत देण्यासंदर्भात पावले उचलावीत. तिला पाठींबा द्यावा आणि प्रतिबंधात्मक उपाय योजावेत. गरज भासल्यास संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणे. (एखाद्या शासकीय सेवेत असलेल्या स्त्रिला बाहेरील गुंड त्रास देत असतील व अशा प्रकारची तक्रार आली असेल तर तिला आवश्यक ती पोलीस यंत्रणेची मदत मिळवून देण्यास मदत करणे, हे विभाग प्रमुखाचे काम आहे.

विशाखा जजमेंटच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये पुढील बाबींचा प्रामुख्याने समावेश आहे :-

१) राज्य शासनाने सर्व खाजगी/सार्वजनिक/शासकीय संस्थेच्या सेवा नियमांमध्ये सुधारणा करणे

२) शिक्षेची तरतूद करणे

३) शासकीय संस्थेमधील कर्मचाऱ्यांविरुध्द अपील नियमाखाली शिस्तभंगाची कार्यवाही करणे

४) आवश्यक वाटल्यास त्या कर्मचाऱ्यांची/अधिकाऱ्यांची बदली करणे,

५) पिडीत महिलांच्या तक्रारी नोंदवून घेऊन त्यावर कार्यवाही करण्यासाठी तक्रार निवारण समितीची स्थापना करणे,

६) शासकीय /निमशासकीय कार्यालयात कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाचा प्रतिबंध करण्याची जबाबदारी मालकाची किंवा संस्था प्रमुखाची असणे,

७) कामाच्या ठिकाणी पोषक वातावरण तयार करणे,

८) कर्मचारी संघटनांनाही अशाप्रसंगी प्रश्न उपस्थित करण्याची मुभा देणे,

९) महिला कर्मचाऱ्यांमध्ये त्यांच्या हक्काबाबत जाणीव/जागृती (अवेरनेस) निर्माण करणे.

जोपर्यंत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही केली जात नाही तोपर्यंत कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवणूकीस प्रभावीपणे प्रतिबंध होणार नाही व महिलांना संरक्षण मिळणार नाही. विशाखा जजमेंटचे पालन होत नसल्यामुळे कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणूकीस प्रतिबंध करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात

दाखल केलेल्या १७३-१७७/९९ डॉ. मेधा कोतवाल व इतर प्रकरणी दिनांक १७.१.२००६ रोजी सुप्रीम कोर्टाला आवश्यक वाटल्यामुळे पुढीलप्रमाणे आणखीन मार्गदर्शनपर आदेश दिलेले आहेत :-

We find that in order to coordinate the steps taken in this regardthere should be a State level oficer,i.e, either the Secretary of Women and Child Welfare department or any other suitable officer who is incharge and concerned with the Welfare of women and children in each State,The Chief Secrearies of each State shall see that an officer is appointed as a nodal agent to collect the details and to give suitable directions whenever necessary.

यासाठी वरील मार्गदर्शक तत्वानुसार लैंगिक सतावणूकीसंदर्भातील तक्रारींचे निवारण करण्यासाठी राज्य स्तरावर पुढील तक्रार यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे :-

संपूर्ण राज्यामध्ये पुढीलप्रमाणे राज्य महिला तक्रार निवारण समिती नियुक्त केलेली आहे. आतापर्यंत वेळोवेळी नेमण्यात आलेले अध्यक्ष व सदस्य संख्येमध्ये दिनांक २०.१.२००६ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवेतील महिला अधिकाऱ्यांचा पदाधिकारी म्हणून नांवाने (By Name) समावेश करण्यात आला आहे. याचा मुख्य उद्देश म्हणजे जास्तीतजास्त सदस्य समितीच्या बैठकीला उपस्थित राहून त्यांचे बहुमोल मार्गदर्शन राज्य महिला तक्रार निवारण समितीला मिळू शकेल. सद्यस्थितीत समितीची रचना पुढीलप्रमाणे झालेली आहे :-

१. अध्यक्ष - श्रीम. लीना मेहेंदळे, प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग
२. सदस्य - सचिव, महिला व बाल कल्याण विभाग
३. सदस्य - श्रीम. नीला सत्यनारायण, सचिव (पर्यटन), गृह विभाग
४. सदस्य - श्रीमती शर्वरी गोखले, आयुक्त, कोकण विभाग
५. सदस्य - प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग
६. सदस्य - श्रीमती शैला हिरेकर, अध्यक्ष, वायडब्ल्यूसीए
७. सदस्य - डीआयजी, सामाजिक सुरक्षा शाखा
८. सदस्य - श्रीमती कविता गुप्ता, सचिव, लेखा व कोषागरे, वित्त विभाग
९. सदस्य - श्रीमती सीमा व्यास, उपसचिव, सा.प्र विभाग
१०. सदस्य - श्रीमती राधिका रस्तोगी, उपसचिव, ग्रा. वि. विभाग
११. सदस्य - श्रीमती मेघा गाडगीळ, एम. डी., हाफकिन
१२. सदस्य - श्रीमती अश्विनी भिडे, उपसचिव, राजभवन
१३. सदस्य सचिव तथा महिला कल्याण अधिकारी -
श्रीम.प्र.प्र.चिटणीस, अवर सचिव, महिला व बाल विकास विभाग.

शासन निर्णय १९ मे ९९ नुसार या **समितीच्या कार्यकक्षा** पुढीलप्रमाणे आहेत :-

अ) केंद्र शासनाने प्रसिध्द केलेली मार्गदर्शक तत्वे तसेच शासनाचे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमात सुधारणा केलेल्या सूचनांना म्हणजेच लैंगिक सतावणुकीस प्रसिध्दी देणे.

ब) लैंगिक सतावणुकीच्या तक्रारीची दखल घेणे.

क) तक्रारीत तथ्य आढळून आल्यास त्याबाबतचा शोध घेऊन शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरीता शिफारस करणे.

ड) शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

इ) शासनाला वार्षिकी केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल सादर करणे.

शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या तक्रारीबरील समितीच्या अध्यक्षांकडे किंवा सदस्य सचिवांकडे पाठविता येईल. त्या तक्रारी या समितीकडून विचारात घेण्यात येतील आवश्यक असेल तर सदस्य सचिव ज्या कार्यालयाकडून तक्रार आलेली असेल त्या कार्यालयाच्या प्रमुखाचे अभिप्राय मागवू शकतील या तक्रार समितीस तक्रारदाराचे म्हणणे ऐकविण्यासाठी आणि तक्रारीची चौकशी करण्यासाठी पुढीलप्रमाणे चौकशी समितीची रचना करण्यासाठी मुख्य प्राधिकृत करण्यात येईल:-

अ) मंत्रालयामध्ये उद्भवलेल्या तक्रारीसाठी एक सदस्य म्हणून एका महिला अधिकाऱ्यासह एखाद्या सचिवाच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात येईल.

ब) ज्या अधिकाऱ्याविरुध्द तक्रार करण्यात आलेली असेल तो अधिकारी त्या क्षेत्रातील गट अ किंवा गट ब सेवामधील अधिकारी असेल तर चौकशी समिती, सदस्य सचिव म्हणून महिला कल्याण अधिकाऱ्यासह संबंधित विभाग आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमता येईल.

क) ज्या कर्मचाऱ्याविरुध्द तक्रार करण्यात आलेली असेल तो कर्मचारी गट क किंवा गट ड सेवेतील असेल तर चौकशी समिती, एक सदस्य म्हणून त्या जिल्ह्यातील एका महिला अधिकाऱ्यास जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली नेमता येईल.

सबब शासन निर्णयान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) (दुसरी सुधारणा) नियम १९९८ नुसार करण्यात आली आहे आणि याबाबतचा नियम २२ अ समाविष्ट करण्यात आला आहे. तो खालीलप्रमाणे आहे :-

२२-अ (१) कोणताही शासकीय कर्मचारी कोणत्याही महिलेच्या कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवादाचे कोणतेही कृत्य करणार नाही.

(२) कामाच्या ठिकाणी प्रभारी असलेला प्रत्येक शासकीय कर्मचारी त्या कामाच्या ठिकाणी कोणत्याही महिलेच्या लैंगिक छळवादास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करील.

टीप --- या नियमाच्या उद्देशासाठी लैंगिक छळवादामध्ये अशोभनीय अशा हेतुपूर्वक लैंगिक वर्तनाचा, प्रत्यक्ष या अन्यथा याचा समावेश होतो, जसे ---

१) शारीरिक संपर्क आणि कामोद्दिपक प्रणयचेष्टा,

२) लैंगिक सौख्याची मागणी अथवा विनंती.

३) लैंगिक वासना प्रेरित करणारे शेरे,

४) कोणत्याही स्वरुपातील संभोग वर्णन/संभोग दर्शन/अश्लील साहित्याचे प्रदर्शन,

५) कोणतेही अन्य अशोभनीय शारीरिक, तोंडी अथवा सांकेतिक आचरण.

दिनांक ६.२.२००१ च्या परिपत्रकान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली असलेली नीमशासकीय कार्यालये, महामंडळे या सर्वांना त्यांनी त्यांच्या आस्थापनांवर काम करणाऱ्या महिला अधिकारी व कर्मचारी यांना लैंगिक सतावणूकीपासून संरक्षण देण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे त्यांच्या सेवा नियमात सुधारणा करुन प्रत पाठविण्याबाबत योग्य ते आदेश निर्गमित केले आहेत.

दिनांक ५ जानेवारी २००४ नुसार सर्व जिल्हा तालुका पातळीवर तक्रार निवारण करण्याबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात आले आहेत.

सर्व राज्य शासकीय व निमशासकीय कार्यालयांना लैंगिक छळाबाबत महिला कर्मचाऱ्यांकडून तक्रारी प्राप्त झाल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

अ) सर्व जिल्हा / तालुका पातळीवर निम्न स्तर तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात येईल व प्रत्येक समितीवर वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येईल. तसेच समितीवरील एकूण सदस्य संख्येच्या ५० % महिला सदस्या असतील.

ब) विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी समितीची कार्यकक्षा तसेच कार्यपध्दती ठरवून त्याबाबत कालबध्द कार्यक्रमाची आखणी करावी.

क) राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीच्या सदस्यांची अधिकार कक्षा वाढविण्यात यावी.

ड) लैंगिक छळवादासारखे अनुचित प्रकार टाळण्यासाठी कालबध्द कार्यक्रम विहीत कालमर्यादेत राबवावेत. त्यासाठी समितीच्या नियतकालिक बैठका घेऊन बैठकीचा दिनांक व वेळ संबंधित कार्यालयांस पुरेशा वेळेअगोदर कळवावी व अहवाल सादर करण्यास विहीत मुदत देण्यात यावी.

इ) महिलांच्या लैंगिक शोषणासंदर्भात समितीकडून करण्यात येणारी चौकशी गुप्त स्वरुपाची (इन-कॅमेरा) करण्यात यावी.

जिल्हा व तालुका पातळीवरील तक्रार निवारण समितीस प्राप्त होणाऱ्या तक्रारीनुषंगाने कार्यवाही केल्यानंतर चौकशी अहवाल राज्य महिला तक्रार निवारण समितीकडे सादर करुन आवश्यक वाटल्यास त्यावर अधिक कार्यवाहीची शिफारस करण्याचे अधिकार राज्य तक्रार निवारण समितीस रहातील व त्यानंतर समितीच्या शिफारशीनुसार करण्यात येणारी कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल समितीस पुन्हा सादर करण्यात यावा.

शासन निर्णय दिनांक ३ ऑगस्ट २००४ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :-

तक्रारीत तथ्य आढळून आल्यास त्याबाबतचा शोध घेऊन शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरीता शिफारस करणे, याबाबी अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे :-

अ) राज्य महिला तक्रार निवारण समितीने एखाद्या प्रकरणी चौकशी करुन दिलेला चौकशी अहवाल हा **चौकशी अहवाल** मानण्यात यावा व सदर चौकशी अहवाल विचारात घेऊन संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी त्या प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणूकीस प्रतिबंध करण्यासाठी सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहिल.

दिनांक १७ मे २००६ च्या परिपत्रकानुसार वरील बाबी लक्षात घेऊन महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याच्या संदर्भात पुढील आदेश देण्यात आलेले आहेत :-

अद्यापही बऱ्याच कार्यालयात महिला तक्रार निवारण समित्या गठीत करण्यात आल्या नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने डॉ. मेधा कोतवाल लेले विरुध्द केंद्र शासन या प्रकरणी दिलेल्या आदेशात सर्व शासकीय व निम-शासकीय कार्यालयात व इतर संस्थेत अशा समित्या गठीत करणे बंधनकारक केले आहे. अन्यथा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाल्याने अवमान याचिका (Contempt of Court) दाखल होण्याची शक्यता आहे.

यास्तव अशा स्पष्ट सुचना देण्यात येत आहेत की, खालील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात व संस्थेत तातडीने महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात याव्यात.

१) सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, सर्व जिल्हा परिषदा,
२) सर्व विभागीय आयुक्त कार्यालये, इतर विभागातील सर्व आयुक्तालये, संचालनालये
३) सर्व महानगरपालिका/नगरपालिका, महाविद्यालये, विद्यापीठे, सर्व शासकीय रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, महानगरपालिका अंतर्गत येणारी रुग्णालये
४) सर्व गटविकास अधिकारी कार्यालये
५) सर्व तहसिलदार कार्यालये
६) सर्व सार्वजनिक उपक्रम (उदा. म्हाडा, सिडको, एमएमआरडीए)

अशा समित्या गठीत करण्यापूर्वी संबंधित कार्यालयाने त्या कार्यालयात काम करणाऱ्या सर्व स्त्री-पुरुष अधिकारी/कर्मचारी यांची एक बैठक घ्यावी.

सदर बैठकीत वरील विषयावर चर्चा करण्यात यावी, जेणेकरुन सर्व कर्मचारी व अधिकारी यांना सदर कायद्याची जाणीव होईल. या बैठकीत किती सदस्यांची समिती गठीत करावयाची याबाबत निर्णय घेऊन समितीतील सदस्यांची नांवे निश्चित करावी.

समितीवर शक्यतो सर्व महिला सदस्या असतील. त्या कार्यालयात वरिष्ठ महिला अधिकारी किंवा महिला अधिकारी उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही शासकीय कार्यालयातील/संस्थेतील वरिष्ठ महिलेची नेमणूक करण्यात यावी. संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी समितीची कार्यकक्षा, समितीची बैठक किती कालावधीमध्ये घेण्यात येईल याबाबत सर्वसंमतीने निर्णय घ्यावा.

समिती गठीत झाल्याबाबत कार्यालयातील सर्वांना माहिती मिळण्यासाठी कार्यालयातील दर्शनी भागातील फळ्यावर याबाबतच्या शासन आदेशाची प्रत लावावी.

वरीलप्रमाणे आदेश अद्यापि काही ठिकाणी पालन झाल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत न्यायालयीन आदेशाचे पालन करण्यात यावे. या संदर्भात अध्यक्ष, राज्य महिला तक्रार निवारण समिती यांच्या क्रमांक: मकयौ २००६/प्र.क्र.१५/मकक नुसार दिलेल्या आदेशांचे तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. जेणेकरुन महिलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच त्यांच्यावर लैंगिकदृष्ट्या अन्याय होणार नाही याची दक्षता सर्वांनी घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वन्दना कृष्णा)
सचिव

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
५. विरोधी पक्ष नेता कार्यालय, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. महिलांचे हक्क व कल्याण समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९. सचिव, महाराष्ट्र, विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती)
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद, नागपूर,
१३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
१४. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय

१५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी,
१९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२०. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२१. सर्व नगरपालिकांचे, नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी,
२२. सर्व शासकीय महामंडळे, कंपन्या, स्थानिक स्वराज्य संस्था,
२३. शासन अनुदानित मंडळे, संस्था, संचालक, सेवा योजन, मुंबई.
२४. सर्व मंत्रालयीन विभाग,
२५. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख,
२६. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.,
२७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन, लि. मुंबई,
२८. व्यवस्थापकीय संचालक, मॅफको, मुंबई,
२९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई,
३०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र हौसिंग ॲण्ड एरिया डेव्हलपमेंट ॲथोरिटी, मुंबई
३१. आयुक्त, एम.एम.आर.डी.ए. मुंबई
३२. व्यवस्थापकीय संचालक.एम. एस. आर. टी.सी., मुंबई,
३३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्मॉल स्केल इंड.डेव्ह. कार्पो. लि. मुंबई.
३४. व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम (SICOM), मुंबई
३५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट फायनेंनशियल कार्पो. मुंबई.
३६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र टूरिझम डेव्ह. कार्पो. लि. मुंबई.
३७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी बोर्ड, मुंबई
३८. व्यवस्थापकीय संचालक, मेल्ट्रॉन, मुंबई,
३९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड
४०. व्यवस्थापकीय संचालक, दि महाराष्ट्र फिशरिज् डेव्हलमेंट कॉर्पो.लि. मुंबई.
४१. व्यवस्थापकीय संचालक. एम.आय. डी. सी., मुंबई,
४२. व्यवस्थापकीय संचालक, एम. ए. आय. डी. सी. मुंबई.
४३. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मासिटीकल कार्पो.लि. मुंबई.
४४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कार्पो. लि. मुंबई,
४५. व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई,
४६. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले बॅकवर्ड क्लास डेव्ह. कार्पो. लि. मुंबई.
४७. व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे डेव्ह.कार्पो. लि. मुंबई.
४८. व्यवस्थापकीय संचालक, लेदर इंडस्ट्रीज डेव्ह. कार्पो. ऑफ महाराष्ट्र लि. मुंबई
४९. व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती ॲण्ड नॉमाडिक ट्राईब्ज डेव्ह.कार्पो.लि.मुंबई
५०. मुख्य प्रशासक, दि महा. स्टेट को-ऑप. कॉटन ग्रोवेअर्स मा.फे.लि.मुंबई
५१. व्यवस्थापकीय संचालक,, महा. स्टेट को-ऑप. मार्के.फेड.लि. मुंबई
५२. व्यवस्थापकीय संचालक, महा. राज्य सहकारी दुध महासंघ मर्या.मुंबई

५३. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट खादी ॲण्ड व्हिलेज इंड. बोर्ड, मुंबई
५४. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट टेक्सटाईल कॉर्पो. लि. मुंबई
५५. व्यवस्थापकीय संचालक, महा. फिल्म स्टेज ॲण्ड कल्चरल डेव्ह. कार्पो. लि. मुंबई
५६. व्यवस्थापकीय संचालक, डेव्हलपमेंट कार्पो. ऑफ कोकण भवन, लि. मुंबई
५७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महा. मेरीटाईम बोर्ड, मुंबई
५८. व्यवस्थापकीय संचालक, फॉरेस्ट डेव्ह. कार्पो. ऑफ महा. लि. नागपूर
५९. व्यवस्थापकीय संचालक, डेव्ह. कार्पो. ऑफ महा. विदर्भ लि. नागपूर
६०. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट मायनिंग कार्पो. लि. नागपूर
६१. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट हॅण्डलूम कार्पो. लि. नागपूर
६२. व्यवस्थापकीय संचालक, महा. एनर्जी डेव्ह. एजन्सी, पुणे
६३. महासंचालक, यशदा, पुणे
६४. व्यवस्थापकीय संचालक, वेस्टर्न महा. डेव्ह. कार्पो. लि. पुणे
६५. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट फार्मिंग कार्पो. लि. पुणे
६६. व्यवस्थापकीय संचालक, महा. मेंढी व शेळी विकास महामंडळ लि. पुणे
६७. व्यवस्थापकीय संचालक, महा. लॅण्ड डेव्ह. कार्पो. लि. पुणे
६८. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट वेअरहौसिंग कार्पो. पुणे
६९. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट सीडस् कार्पो. लि. अकोला
७०. व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा डेव्ह. कार्पो. लि. औरंगाबाद
७१. व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ लि. कोल्हापूर
७२. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट को-ऑप. ट्रायबल डेव्ह. कार्पो. लि. नासिक
७३. कार्यकारी संचालक, महा. कृष्णा व्हॅली डेव्ह. कार्पो. पुणे
७४. व्यवस्थापकीय संचालक, तापी इरिगेशन डेव्ह. कार्पो, जळगांव
७५. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट लिट् रेचर ॲण्ड कल्चरल बोर्ड, मुंबई
७६. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट रोड डेव्ह. कार्पो. लि. मुंबई
७७. व्यवस्थापकीय संचालक, महा. स्टेट हॅण्डीकॅप फाय. ॲण्ड डेव्ह. कार्पो. लि. मुंबई

[illegible] अनुदानित संस्थांमधील महाराष्ट्राची महिला धोरण [illegible] टक्के [illegible] [illegible]

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्र.[illegible]/[illegible]/[illegible]-[illegible]/[illegible] [illegible]

मंत्रालय [illegible], [illegible],

मुंबई-[illegible]

दिनांक- [illegible]

संदर्भ :- [illegible] अनुदानित [illegible] महाराष्ट्राची महिला धोरण [illegible] [illegible] [illegible]

(१३) [illegible] आरक्षित प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांना संधी [illegible] जे संबंधासाठी विहित, अटी व शर्ती लागू असतील [illegible] संधी [illegible] अटी व शर्ती तसेच त्या प्रवर्गातील महिलांसाठीच्या आरक्षणाच्याबाबतीत लागू राहतील.

(१४) महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात यावे.

(१५) महिलांच्या आरक्षित पदांच्या [illegible] महाराष्ट्र राज्याच्या सर्वसाधारणपणे लागू होतील असतील.

(विहित) प्रमाणपत्रे

(अ) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी जिल्हाधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र व त्याची तपासणी

